अनुसूचित जाती कल्याण समिती

(२०१३ - २०१४)

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

नाशिक महानगरपालिका, विभागीय समाजकल्याण कार्यालय, नाशिक, आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक, जिल्हा परिषद, नाशिक यांच्या सेवेतील अनुसूचित जातीचे अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच त्यांचेमार्फत मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांसबंधीचा

चौथा अहवाल

(सदर अहवाल विधानसभा/विधानपरिषद सभागृहाला
दिनांक जून २०१४ रोजी सादर करण्यात आला)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई
जून, २०१४

अनुसूचित जाती कल्याण समिती

(२०१३ - २०१४)

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

नाशिक महानगरपालिका, विभागीय समाजकल्याण कार्यालय, नाशिक, आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक, जिल्हा परिषद, नाशिक यांच्या सेवेतील अनुसूचित जातीचे अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच त्यांचेमार्फत मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांसबंधीचा

चौथा अहवाल

एचबी ३४५—१

अनुसूचित जाती कल्याण समिती
(सन २०१०-२०११)
(बारावी विधानसभा)

समिती प्रमुख

(१) मा. श्री. चंद्रकांत हंडोरे, वि.स.स.

समिती सदस्य

(२) श्री. रावसाहेब अंतापूरकर, वि.स.स.
(३) श्री. वामनराव कासावार, वि.स.स.
(४) श्री. हरिदास भदे, वि.स.स.
(५) श्री. दिपक चव्हाण, वि.स.स.
(६) ॲड. अशोक पवार, वि.स.स.
(७) श्री. मिलिंद (अण्णा) कांबळे, वि.स.स.
(८) श्री. हरिष पिंपळे, वि.स.स.
(९) श्री. लखन मलिक, वि.स.स.
(१०) श्री. संतोष सांबरे, वि.स.स.
(११) श्री. ज्ञानराज चौगुले, वि.स.स.
(१२) श्री. मुझफ्फर हुसेन, वि.प.स.
(१३) श्री. सुभाष चव्हाण, वि.प.स.
(१४) श्री. राम पंडागळे, वि.प.स.
(१५) श्री. चंद्रकांत पाटील, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री. भाऊसाहेब कांबळे, सह सचिव
(३) श्री. डी.पी.येवला, अवर सचिव (समिती)
(४) श्री. रविंद्र जगदाळे, कक्ष अधिकारी

अनुसूचित जाती कल्याण समिती
(सन २०१३-२०१४)
(बारावी विधानसभा)

समिती प्रमुख

(१) मा. श्री.रमेश बागवे, वि.स.स.

समिती सदस्य

(२) श्री. आनंदराव गेडाम, वि.स.स.
(३) श्री. रावसाहेब अंतापूरकर, वि.स.स.
(४) श्री. योगेंद्र भोये, वि.स.स.
(५) श्री. मिलिंद (अण्णा) कांबळे, वि.स.स.
(६) श्री. जगदीशचंद्र वळवी, वि.स.स.
(७) श्री. शंकरराव गडाख, वि.स.स.
(८) श्री. विष्णू सावरा, वि.स.स.
(९) श्री. लखन मलिक, वि.स.स.
(१०) श्री. संतोष सांबरे, वि.स.स.
(११) श्री. ज्ञानराज चौगुले, वि.स.स.
(१२) रिक्त *
(१३) रिक्त *
(१४) ॲड. जयदेव गायकवाड, वि.प.स.
(१५) श्री. नागो गाणार, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव
(३) श्री. सुभाष नलावडे, अवर सचिव
(४) श्री. श्रीकांत शेटे, कक्ष अधिकारी

*श्री.सुभाष चव्हाण, वि.प.स व श्री.एम.एम.शेख, वि.प.स. यांची विधानपरिषद सदस्यत्वाची मुदत दिनांक १२ मार्च २०१४ रोजी संपुष्टात आली असल्याने समितीवरील दोन सदस्यांच्या जागा रिक्त आहेत.

अनुक्रमणिका

अनु-क्रमांक	विषय	पृष्ठ क्रमांक
(१)	(२)	(३)
	प्रस्तावना	नऊ
	(भाग एक)	१
(१)	**महानगरपालिका, नाशिक**	
	(अ) अनुसूचित जातीच्या लोकांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच सेवाप्रवेश नियम	१
	(ब) मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी राखून ठेवलेल्या निधी व त्यातून करण्यात आलेला खर्च व दलितवस्ती सुधारणा योजनेसाठी केलेल्या खर्चाबाबत	६
	(क) महानगरपलिकेच्या मालकीच्या व्यापारी संकुलात मागासवर्गीयांना गाळेवाटप व गटई कामगारांना व्यवसायासाठी स्टॉल्स वाटपाबाबत	११
(२)	**विभागीय समाजकल्याण कार्यालय, नाशिक**	१५
	(अ) अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी आश्रमशाळा व पोस्ट बेसिक आश्रम शाळा, शासकीय निवासी शाळा व वसतिगृहाबाबत	१५
	(ब) जात वैधता प्रमाणपत्र	२४
	(क) शासनाच्या धोरणानुसार नाशिक विभागातील प्रत्येक जिल्ह्यात डॉ.बाबासाहेब आबडेकर सामाजिक न्याय भवनाच्या बांधकामाबाबत	२७
(३)	**आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक**	३१
	सेवाप्रवेश नियमावलीप्रमाणे अनुसूचित जातीकरिता राखीव असलेल्या पदांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष	३१
(४)	**जिल्हा परिषद, नाशिक**	३९
	(अ) जात वैधता प्रमाणपत्र	३९
	(ब) जिल्हा परिषद, नाशिक यांच्या अंतर्गत असलेल्या प्राथमिक/माध्यमिक शाळा व वसतिगृहे	४१
	(क) जिल्हा परिषदेच्या प्राथमिक/माध्यमिक शाळेतील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना गणवेष व लेखन साहित्य	४४
	(भाग-दोन)	
(५)	**महाराष्ट्र राज्यात दिवसेंदिवस दलितांवर होत असलेल्या अत्याचारास प्रतिबंध घालण्याबाबत**	४७
(६)	परिशिष्ट— समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त	५१

प्रस्तावना

मी, अनुसूचित जाती कल्याण समितीचा समिती प्रमुख, समितीने अधिकार दिल्यावरुन समितीचा चौथा अहवाल सभागृहाला सादर करीत आहे.

समितीने नाशिक महानगरपालिका, विभागीय समाजकल्याण कार्यालय, नाशिक, आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक, जिल्हा परिषद, नाशिक यांच्या सेवेतील अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच यांचेमार्फत मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजना व विशेष घटक योजनांबाबतची माहिती जाणून घेण्याचे ठरविले व त्यानुसार उपरोक्त विभागाच्या संदर्भात तयार केलेल्या प्रश्नावलीबाबतची माहिती शासनाच्या सामाजिक न्याय विभागामार्फत मागविण्यात आली.

समितीने उपरोक्त प्रश्नावलीच्या संदर्भात नाशिक महानगरपालिका, विभागीय समाजकल्याण कार्यालय, नाशिक, आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक, जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे अनुक्रमे दिनांक १७ व १८ जानेवारी २०११ रोजी नाशिक महानगरपालिका, विभागीय समाजकल्याण अधिकारी कार्यालय, नाशिक, आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक, जिल्हा परिषद, नाशिक येथे प्रत्यक्ष भेट देऊन तेथील संबंधित क्षेत्रीय अधिकाऱ्यांशी चर्चा केली.

समितीस पुरविण्यात आलेली लेखी माहिती व प्रत्यक्ष भेटीच्यावेळी संबंधित अधिकाऱ्यांनी समितीसमोर दिलेल्या साक्षीच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे तसेच उपस्थित झालेल्या मुद्दयावर त्यांनी केलेल्या कार्यवाहीबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने समितीने अनुक्रमे दिनांक २३ व २४ जानेवारी २०१३ व २२ मे २०१३ रोजी मंत्रालयीन विभागीय सचिवांची साक्ष घेतली व सदरसाक्षी दरम्यान समितीसमोर आलेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने काही निवडक प्रकरणांसंदर्भात काही अभिप्राय व शिफारशी नोंदविल्या आहेत. त्याच्या या अहवालात समावेश केलेला आहे. समितीने दिनांक ११ जून, २०१४ रोजी प्रारूप अहवालावर विचार करून तो संमत केला.

मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या साक्षीच्यावेळी प्रधान सचिव, नगरविकास विभाग, सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य (सामाजिक न्याय) विभाग, प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, आयुक्त, नाशिक महानगरपालिका, विभागीय समाजकल्याण अधिकारी, नाशिक, आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक व इतर संबंधित क्षेत्रीय अधिकारी यांनी समितीसमोर उपस्थित राहून समितीला आवश्यक ती माहिती देऊन जे सहकार्य केले त्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे.

विधान भवन :
मुंबई,
दिनांक ११ जून २०१४.

रमेश बागवे,
समिती प्रमुख,
अनुसूचित जाती कल्याण समिती.

अहवाल

(भाग-एक)

(१) महानगरपालिका, नाशिक

(अ) अनुसूचित जातीच्या लोकांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच सेवाप्रवेश नियम :-

समितीने अनुसूचित जातीच्या उमेदवारांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच सेवाप्रवेश नियम याबाबत नाशिक महानगरपालिकेडून खालील मुद्यांवर माहिती मागविली होती :—

(१) महापालिकेने सेवा प्रवेश नियम तयार केले आहेत काय, असल्यास केव्हा.

(२) महानगरपालिकेतील वर्ग अ ते ड मधील तांत्रिक व अतांत्रिक अधिकारी व कर्मचारी यांची मंजूर संख्या किती आहे, त्यापैकी सन २००७-२००८, २००८-२००९, २००९ ते मार्च, २०१० या कालावधीत वर्ष निहाय एकूण किती पदे भरण्यात आली आहेत.

(३) उक्त मंजूर पदांपैकी वर्ग अ ते ड मधील किती व कोणकोणती पदे अनुसूचित जातीच्या उमेदवारांसाठी राखीव ठेवण्यात आली आहेत.

(४) अनुसूचित जातींच्या उमेदवारांसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या वर्ग अ ते ड मधील कर्मचाऱ्यांपैकी सन २००७-२००८, २००८-२००९, २००९ ते मार्च, २०१० या कालावधीत वर्ष निहाय एकूण किती पदे भरण्यात आली आहेत व किती व कोणकोणती अनुशेषांची पदे अद्याप रिक्त आहेत. तसेच सदर अनुशेषाची पदे रिक्त राहण्याची कारणे काय आहेत.

उपरोक्त मुद्यासंदर्भात नाशिक महानगरपालिकेने वर्ग १ ते ४ करिता सरळ सेवेची मंजूर पदे, पदोन्नतीची पदे व अनुसूचित जातीबाबत आरक्षण तसेच बिंदू नामावलीनुसार शिल्लक असलेल्या अनुशेषाबाबत वर्गनिहाय पदासंबंधीची माहिती समितीला पुढीलप्रमाणे लेखी स्वरुपात दिली.

सन १९८५ मध्ये अधिकारी/कर्मचारी यांचेसाठी सेवाप्रवेश नियम तयार केलेले आहे. सन २००८ मध्ये शासन परिपत्रक क्रमांक ठामपा २००२/८२१/प्र.क्र.८६/नवि २३ दिनांक २ जुलै, २००८ नुसार नाशिक महानगरपालिकेने नवीन सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम-२००८ तयार करून त्यास महासभेने ठराव क्रमांक ६६१ दिनांक २१ नोंव्हेबर २००८ अन्वये मंजूरी दिलेनुसार सदर नियमांस मान्यतेसाठी शासनाकडे दिनांक ५ मार्च २००९ रोजी प्रस्ताव पाठविला असून शासन मान्यता अप्राप्त आहे.

नाशिक महानगरपालिकेतील वर्ग अ ते ड मधील तांत्रिक व अतांत्रिक अधिकारी व कर्मचारी यांची सन २००७-०८, २००८-०९ व सन २००९-१० ची एकूण मंजूर पदे कालावधीत वर्ष निहाय भरलेल्या पदांची माहिती व मंजूर पदांपैकी वर्ग अ ते ड मधील भरलेल्या अनुसूचित जातीच्या उमेदवारांची दिलेली माहिती खालील-प्रमाणे आहे.

वर्ग -१

अ.क्र	सरळसेवा/ पदोन्नती	भरती वर्षे	स्थायी मंजुर पदे	एकूण भरलेली पदे	अनुसूचित जातीची या वर्षात भरलेली पदे	अनुसुचित जाती करीता राखीव पदे	प्रत्यक्षात असलेल्या अनुसूचित जातीच्या कर्मचाऱ्यां -ची संख्या	अनुसूचित जाती करीता शिल्लक अनुशेष	शेरा
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)	(९)	(१०)
१	सरळसेवा	२००७-२००८	१०९	५६	. .	१४	०८	०६	पदोन्नतीमध्ये ६
२	पदोन्नती		२०	१८	. .	०२	०२	निरंक	पदे परसेवेची
१	सरळसेवा	२००८-२००९	१०९	८९	०२	१४	१०	०४	समाविष्ट
२	पदोन्नती		२०	२०	. .	०२	०२	निरंक	करण्यात
१	सरळसेवा	२००९-२०१०	१०३	८६	. .	१३	०९	०४	आलेली
२	पदोन्नती		२०	२०	. .	०२	०२	निरंक	आहेत.

वर्ग -२

अ.क्र	सरळसेवा/ पदोन्नती	भरती वर्षे	एकूण मंजुर पदे	एकूण भरलेली पदे	अनुसूचित जातीची या वर्षात भरलेली पदे	अनुसुचित जाती करीता राखीव पदे	प्रत्यक्षात असलेल्या अनुसूचित जातीच्या कर्मचाऱ्यां -ची संख्या	अनुसूचित जाती करीता शिल्लक अनुशेष	शेरा
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)	(९)	(१०)
१	सरळसेवा	२००७-२००८	३३	०१	. .	०४	००	०४	
२	पदोन्नती		३७	३९	०१	०५	०५	निरंक	
१	सरळसेवा	२००८-२००९	३३	०१	. .	०४	००	०४	
२	पदोन्नती		३७	३९	. .	०५	०५	निरंक	
१	सरळसेवा	२००९-२०१०	३३	०१	. .	०४	००	०४	
२	पदोन्नती		३७	३९	. .	०५	०५	निरंक	

वर्ग -३

अ.क्र	सरळसेवा/ पदोन्नती	भरती वर्षे	एकूण मंजुर पदे	एकूण भरलेली पदे	अनुसूचित जातीची या वर्षात भरलेली पदे	अनुसुचित जाती करीता राखीव पदे	प्रत्यक्षात असलेल्या अनुसूचित जातीच्या कर्मचाऱ्यां -ची संख्या	अनुसूचित जाती करीता शिल्लक अनुशेष	शेरा
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)	(९)	(१०)
१	सरळसेवा	२००७-२००८	१०५२	७८८	०१	८४	९८	निरंक	मंजूर
२	पदोन्नती		९३१	५५६	०२	१२१	११७	०४	पदानुसार काही
१	सरळसेवा	२००८-२००९	१०५२	८०३	०१	८४	९२	निरंक	संवर्गात अनुशेष
२	पदोन्नती		९३१	६३६	०३	१२१	१२०	०१	शिल्लक असुन
१	सरळसेवा	२००९-२०१०	१०५२	८०७	०	८४	१०१	निरंक	काही संवर्गात
२	पदोन्नती		९३१	७२१	३	१२१	१२३	निरंक	अनुशेष जादा भरणेत आलेला आहे.

वर्ग -४

अ.क्र	सरळसेवा/ पदोन्नती	भरती वर्षे	एकूण मंजुर पदे	एकूण भरलेली पदे	अनुसूचित जातीची या वर्षात भरलेली पदे	अनुसुचित जाती करीता राखीव पदे	प्रत्यक्षात असलेल्या अनुसूचित जातीच्या कर्मचाऱ्यां -ची संख्या	अनुसूचित जाती करीता शिल्लक अनुशेष	शेरा
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)	(९)	(१०)
१	सरळसेवा	२००७-२००८	२४५५	२१३०	२	१९६	३७७	निरंक	मंजूर
२	पदोन्नती		२६८	१९१	११	३५	५६	निरंक	पदानुसार काही
१	सरळसेवा	२००८-२००९	२४५५	२११४	०	१९६	३७९	निरंक	संवर्गात अनुशेष
२	पदोन्नती		२६८	१९४	०	३५	६७	निरंक	शिल्लक असुन
१	सरळसेवा	२००९-२०१०	२४५५	२१४०	०	१९६	३७७	निरंक	काही संवर्गात
२	पदोन्नती		२६८	१९४	०	३५	६७	निरंक	अनुशेष जादा भरणेत आलेला आहे.

या व्यतिरिक्त वर्ग-४ मधील सफाई कामगार १९४२ कार्यरत आहेत.

समितीला प्राप्त झालेल्या उपरोक्त माहितीच्या आधारे समितीने नाशिक महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांची दिनांक १७ जानेवारी, २०११ रोजी साक्ष घेतली. साक्षी दरम्यान उपायुक्त (प्रशासन) यांनी समितीला अशी माहिती दिली की, नाशिक महानगरपालिकेची स्थापना दिनांक ७ नोव्हेंबर, १९८२ रोजी झाली. शासनाचे नियम लक्षात घेऊन १९८५ मध्ये सेवाप्रवेश नियमावली तयार केली असून राज्य शासनाच्या कर्मचाऱ्यांसाठी जे नागरी सेवा नियम आहेत तसे या महानगरपालिकेमध्ये लागू केलेले आहेत. नाशिक महानगरपालिकेचे सेवाप्रवेश नियम आणि शासनाचे नागरी सेवाप्रवेश नियम यांची एकत्रितपणे सांगड घालून भरती, बढतीबाबत कार्यवाही करण्यात येते. राज्यातील सर्व महानगरपालिकांचे सेवाप्रवेश नियम सारखेच असावेत यादृष्टीने शासनाने सेवाप्रवेश नियमांचे प्रारुप पाठविले होते व त्याचे प्रारुप महासभेपुढे सादर करून महासभेने सुचविलेल्या दुरुस्तीसह ते प्रारुप शासनास दिनांक २० नोव्हेबर, २००८ रोजी सादर केले आहे.

महानगरपालिकेमध्ये वर्ग अ मध्ये १०९ पदे, वर्ग ब मध्ये ३३ पदे, वर्ग क मध्ये १०४२ पदे व वर्ग ड मध्ये २४५५ पदे असून त्यात सफाई कामगारांच्या समावेश नसून एकूण १९४२ सफाई कामगार कार्यरत आहेत. त्यांनी पुढे अशी ही माहिती दिली की, अनुसूचित जातींसाठी आरक्षण निश्चित करण्याच्या दृष्टीने बिंदू नामावली रोस्टरची सहायक आयुक्त (मावक) यांच्याकडून तपासणी करून घेतली आहे. अ व ब गटातील पदांचे आरक्षण शासनाकडून तपासून घेतले आहे. अ गटात १३ पदे, ब गटात ४ पदे, क गटात ८४ पदे आणि ड गटात १९६ पदे अनुसूचित जातीसाठी आरक्षित केलेली आहेत. सन २००९-२०१० या वर्षातील आरक्षणाच्या स्थितीनुसार वर्ग अ मधील ९ पदे भरली आहेत. वर्ग ब मधील ४ पदे भरावयाची आहेत. वर्ग क मधील १०१ आणि वर्ग ड मधील ३७७ पदे भरली असून वर्ग अ मध्ये प्रामुख्याने वैद्यकीय अधिकाऱ्यांचा अनुशेष आहे. त्याबाबत २००८ मध्ये जाहिरात देण्यात आली होती त्यानुसार मुलाखती झाल्या असून महासभेपुढे सादर करून ही पदे पुढील एक महिन्यात भरली जातील. वर्ग ब मध्ये ४ पदांचा अनुशेष असून त्यामध्ये उपअभियंता संवर्गाची ३ पदे व सहायक आयुक्ताचे एक पद रिक्त आहे. सहायक आयुक्ताचे पद पदोन्नतीने भरणार आहोत.

पदोन्नतीने अ गटामध्ये २, ब गटामध्ये ७, क गटामध्ये ९ आणि ड गटामध्ये २६८ पदे भरली असून त्यामध्ये अनुसूचित जातीची अ गटामध्ये २, ब गटामध्ये ५, क गटामध्ये १२१ व ड गटामध्ये ३५ पदे कार्यरत आहेत.

पदोन्नती आणि सरळसेवेने भरावयाच्या पदांबाबत नाशिक महानगरपालिकेमध्ये ५०:५० प्रमाणात कार्यवाही करण्याचे नियम आहेत, परंतु तांत्रिक समिती आणि महासभेने महानगरपालिकेत जोपर्यंत पात्र कर्मचारी उपलब्ध आहेत, तोपर्यंत १०० टक्के पदे पदोन्नतीने भरण्याचा निर्णय घेतला असून तो शासनाकडे पाठविण्यात आला आहे. पदोन्नतीचे सर्व पदे भरली आहेत. पदोन्नतीमध्ये अनुशेष शिल्लक राहिलेला नाही.

समितीने वर्ग १ मध्ये कोणत्या पदाचा अनुशेष शिल्लक आहे. याबाबत विचारणा केली असता असा खुलासा करण्यात आला की, वैद्यकीय अधिकाऱ्याच्या पदाचा अनुशेष शिल्लक असून पुढील तीन महिन्यात सर्व पदे भरण्यात येतील. त्यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, शासनाला सादर केलेल्या सेवाप्रवेश

नियम केव्हा मंजूर होतील यावर आयुक्तांनी असा खुलासा केली की, नगरविकास विभागाने याबाबत सुनावणी घेतली असून नाशिक महानगरपालिकेची अंतिम सुनावणी झाली असून पुढील दोन महिन्यात अंतिम आदेश प्राप्त होण्याची अपेक्षा आहे.

विभागीय सचिवांची साक्ष :-

समितीने महानगरपालिका, नाशिक येथे दिनांक १७ जानेवारी, २०११ रोजी भेट देऊन तेथील सबधित अधिकाऱ्याशी चर्चा केली होती. त्या चर्चेच्या वेळी उपस्थित झालेले मुद्यांसदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी दिनांक २३ जानेवारी, २०१३ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली.

सदर साक्षीच्या वेळी समितीने नाशिक महानगरपालिकेत वर्ग १ ते ४ च्या रिक्त असलेल्या पदांच्यासंदर्भात आश्वासित केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने अनुसूचित जातीचा अनुशेष भरण्यात आला आहे काय, अशी विचारणा केली असता, आयुक्त, महानगरपालिका यांनी नाशिक महानगरपालिकेत वर्ग १ - ची एकुण मंजुर पदे १२३ आहेत. त्यापैकी अनुसूचित जातीसाठी १५ पदे राखीव आहेत. राखीव १५ पदांपैकी १४ पदे भरली असून एका पदाचा अनुशेष आहे. वर्ग-२ साठी एकुण मंजुर पदे ७० आहेत, त्यापैकी अनुसूचित जातीसाठी मंजूर पदे ९ असून ८ पदे भरलेली आहेत, तर एका पदाचा मंजूर अनुशेष आहे. वर्ग-३ साठी एकुण मंजुर पदे १९८३ आहेत, त्यापैकी अनुसूचित जातीसाठी मंजूर पदे २०५ असून १९५ पदे भरलेली आहेत, तर ९ पदांचा अनुशेष आहे. वर्ग-४ मधील मंजुर पदांची संख्या २७२३ असून अनुसूचित जातीसाठी २३१ पदे असून २२४ पदे भरलेली आहेत. यात ७ पदांचा अनुशेष शिल्लक आहेत. तसेच वर्ग-३ मधील ९ पदे भरणे बाकी आहेत या पदांसाठी पात्र कर्मचारी नाहीत. त्यामुळे सदर पदे आता सरळसेवेने भरण्यात येतील.

समितीने पुढे नाशिक महानगरपालिकेच्या १०० टक्के पदे पदोन्नतीने भरण्यासंबंधीच्या प्रस्तावाची सद्यःस्थिती काय आहे याबाबत विचारणा केली असता असा खुलासा करण्यात आला की, त्यास शासनाकडून अद्याप मान्यता मिळालेली नाही.

समितीने पुढे सेवाप्रवेश नियमावली संदर्भातील स्थिती विचारली असता विभागीय प्रतिनिधी यांनी शासनाने सेवा नियमावली संदर्भात प्रत्येक महानगरपालिकेकडून माहिती मागविली आहे. ती आल्यानंतर त्यावर शासन विचार करणार आहे. सेवा नियमावलीमध्ये समानता असावी असे शासनास अपेक्षित असून शासनाने सर्व महानगरपालिकांकडून अतिरिक्त माहिती मागविली आहे.

अभिप्राय व शिफारशी :-

नाशिक महानगरपालिकेत वर्ग १ - ची एकुण मंजुर पदे १२३ आहेत, त्यापैकी अनुसूचित जातीसाठी मंजुर पदे १५ असून भरलेली पदे १४ आहेत, तर एका पदाचा अनुशेष आहे. वर्ग-२ साठी एकुण मंजुर पदे ७० आहेत, त्यापैकी अनुसूचित जातीसाठी मंजूर पदे ९ असून ८ पदे भरलेली आहेत, तर एका पदाचा मंजूर अनुशेष आहे. वर्ग-३ साठी एकुण मंजुर पदे १९८३ आहेत, त्यापैकी अनुसूचित जातीसाठी मंजूर पदे २०५

असून १९५ पदे भरलेली आहेत, तर ९ पदांचा अनुशेष आहे. वर्ग-४ मधील मंजुर पदांची संख्या २७२३ असून अनुसूचित जातीसाठी २३१ पदे असून २२४ पदे भरलेली आहेत. यात ७ पदांचा अनुशेष शिल्लक आहे. उपरोक्त पदापैकी वर्ग ३ व वर्ग ४ मधील अनुशेष जास्त दिसून येत असून नाशिक महानगरपालिकेत सदर पदे ही पदोन्नतीने भरण्याची कार्यपध्दत अवलंबिण्यात येत असून त्यासाठी त्यांनी शासनाकडे १००% पदे पदोन्नतीने भरण्याबाबत प्रस्ताव देखील पाठविला आहे परंतु त्यास अद्याप पर्यंत शासनाकडून संमती मिळालेली नाही. समितीने नाशिक महानगरपालिकेस भेट देवून व त्यासंदर्भात विभागीय सचिवांची साक्ष घेऊन जवळपास दोन वर्षाचा कालावधी लोटला आहे. तथापि अद्यापपर्यंत सदर रिक्त जागासंदर्भात पुढे काय कार्यवाही करण्यात आली याबाबतची माहिती समितीला मिळू शकली नाही. याबद्दल समिती तीव्र खेद व्यक्त करीत असून सदरहू शासनाची कृती समितीप्रती उदासीनता व्यक्त करणारी आहे. अशी शंका घेण्यास पुर्ण वाव घेणारी आहे व समिती याबाबत तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. वर्ग-२ ते वर्ग-४ मधील राखीव पदाचा असलेला अनुशेष तातडीने भरण्यात यावा व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांत कळविण्यात यावी, अशी समिती शिफारस करीत आहे.

तसेच राज्यातील सर्व महानगरपालिकेतील सेवाप्रवेश नियमावलीमध्ये सुसूत्रता व समानता असावी यादृष्टीने सेवाभरती नियम तयार करण्यासाठी शासनाने सर्व महानगरपालिकेकडून माहिती मागविलेली आहे. नाशिक महानगरपालिकेने सुध्दा शासनाकडे दिनांक २० नोव्हेबर, २००८ रोजी माहिती पाठविली असून त्याबाबत त्यांची अंतिम सुनावणी देखील झाली असल्याची बाब समितीच्या निदर्शनास आली आहे, परंतु अद्याप पर्यंत सेवाप्रवेश नियम तयार झालेली नाहीत. परिणामी राज्यात महानगरपालिकांमध्ये अस्तित्वात असलेल्या सेवा प्रवेश नियमान्वये महानगरपालिकेतील भरती, बढती, आरक्षण या संदर्भात निश्चित कोणती कार्यपध्दती अवलंबावी याबाबत संभ्रम निर्माण होत असून त्यामुळे राज्यातील प्रत्येक महानगरपालिकेत वेगवेगळ्या कार्यपध्दतीचे अवलंबन करण्यात येत असल्याचे दिसून येत आहे. वेळ प्रसंगी प्रकरणपरत्वे शासनाकडे मार्गदर्शनासाठी यावे लागते. त्यामुळे महानगरपालिकेस पदे भरण्यास विलंब होत आहे. सबब मागासवर्गीयांची भरती, बढती, व आरक्षण यास महानगरपालिकास्तरावर विलंब होत असल्याची बाब लक्षात घेता शासनाने लवकरात लवकर सर्व महानगरपालिकांसाठी आदर्श सेवाप्रवेश नियम तयार करावेत, अशी शिफारस समिती करीत आहे.

ब) “ मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी राखून ठेवलेला निधी व त्यातून करण्यात आलेला खर्च व दलितवस्ती सुधारणा योजनेसाठी केलेल्या खर्चाबाबत”

समितीला नाशिक महानगरपालिकेकडून मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी सन २००७-२००८, २००८-२००९, २००९ ते मार्च २०१० या कालावधीत वर्ष निहाय एकूण उत्पन्नापैकी ५ टक्के प्रमाणे येणारी रक्कम किती तसेच या रक्कमेतून अनुसूचित जातीच्या लोकांसाठी वैयक्तिक व सामुहिक विकासाच्या कोणकोणत्या योजना घेण्यात आल्या होत्या या योजनांसाठी केलेली तरतूद व झालेला खर्च किती आहे याबाबत समितीला खालील प्रमाणे माहिती प्राप्त झाली.

नाशिक महानगरपालिकेचे (सन २००७-०८, २००८-०९ व २००९-१० या कालावधीतील) वर्ष निहाय अंदाजपत्रक :-

वर्ष	अंदाजपत्रक रक्कम रुपये कोटीत
सन २००७-०८	८७०.९४
सन २००८-०९	१०२७.८८
सन २००९-१०	११०२.५०

महानगरपालिकेच्या एकूण महसुली उत्पन्नाच्या ५ टक्के मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी राखून ठेवणेत आलेली रक्कम व खर्च:—

वर्ष	मा. आयुक्त सो. यांनी शिफारस केलेले अंदाज	मा. स्थायी समितीने शिफारस केलेले अंदाज	मा. महासभेने मान्य केलेले अंदाज	प्रत्यक्ष झालेला खर्च
सन २००७-०८	२८.००	२८.४७	२८.४७	५.०२
सन २००८-०९	३७.००	३९.६०	३९.६०	५.५२
सन २००९-१०	३७.५३	४१.७८	४२.३८	१२.८२

समितीला नाशिक महानगरपालिकेकडून अनुसूचित जाती व नवबौध्द लोकांच्या विकासासाठी व विशेष घटक योजना राबविली जाते काय, असल्यास केव्हा पासून उक्त योजनेअंतर्गत दलित वस्ती सुधारणा करण्यासाठी महानगरपालिकेला सन २००७-२००८, २००८-२००९, २००९ ते मार्च २०१० या कालावधीत वर्ष निहाय किती तरतूद करण्यात आली होती त्यापैकी किती रक्कम खर्च करण्यात आली याबाबत समितीला लेखी स्वरुपात खालील माहिती पुरविण्यात आली.

सन २००७-०८, २००८-०९, २००९-१० या कालावधीत विशेष घटक योजनेअंतर्गत दलित वस्त्यांची सुधारणा करण्यासाठी वर्षनिहाय रकमेची तरतूद करण्यात आली होती व त्यापैकी खर्च करण्यात आलेली रक्कम:-

वर्ष	दलित वस्ती सुधारणा रक्कम रुपये (लाखांत)	खर्च रक्कम रुपये (लाखांत)
सन २००७-०८	३४०.५३	९.८०
सन २००८-०९	४४०.२५	२२२.०५
सन २००९-१०	२२४.८८	४३.१२

समितीला प्राप्त झालेल्या उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने सन २००७-०८ मध्ये महासभेने ५ टक्क्याप्रमाणे मान्य केलेले अंदाजपत्रक

रुपये २८.४७ कोटी असून झालेला खर्च फक्त रुपये ५.०२ कोटी आहे. सन २००८-०९ मध्ये महासभेने मान्य केलेले अंदाजपत्रक रुपये ३९.६० कोटी आणि झालेला खर्च रुपये ५.५२ कोटी आहे आणि सन २००९-१० मध्ये मान्य केलेले अंदाजपत्रक रुपये ४३.३८ कोटी असून झालेला खर्च रुपये १२.८२ कोटी इतका खर्च कमी झालेला असून वरील तीनही वर्षात रक्कम अखर्चित राहण्याची कारणे काय आहेत, अशी विचारणा केली असता, आयुक्त यांनी या तीनही वर्षामध्ये रक्कम अखर्चित दिसते. काही कामे अपूर्ण आहेत. ती वेगाने पूर्ण होत नाहीत. काही कामे पूर्ण झालेली आहेत. ५ टक्क्यातून सर्व मंजूर कामे घेतलेली आहेत. ज्या कामांचे प्रत्यक्ष देयके अदा झालेली आहेत तेवढीच कामे दाखविलेली आहेत, काही कामांच्या निविदा कार्यवाहीमध्ये आहे तर काही कामे प्रगतीपथावर आहेत. सन २०१०-११ मध्ये जेवढे अंदाजपत्रक केले तेवढे ते पुर्ण झालेले आहे. मागच्या काळामध्ये हाती घेतलेल्या ज्या कामांचे देयके अदा झालेले आहे तेवढीच कामे दाखविण्यात आलेली आहेत. काही कामे वेगवेगळ्या टप्प्यावर आहेत. एखाद्या वर्षामध्ये कामांच्या संदर्भात अनुशेष राहिला असेल तर तो पुढील वर्षांमध्ये दाखविला जातो. खर्चाचा अनुशेष दिसत असला तरी पुढील वर्षात तो अनुशेष भरून काढला जाईल. तसेच शासनस्तरावर रक्कम मार्च अखेरपर्यंत खर्च झाली तर ती लॅप्स होते. महानगरपालिकेमध्ये रक्कम लॅप्स होत नाही, मागील तीन वर्षातील कामांचा आढावा घेऊन रक्कम अखर्चित राहिली असेल तर त्या रकमेचा पुढील वर्षामध्ये विनियोग करण्यात येईल, अशी समितीला माहिती दिली.

महानगरपालिका नाशिक येथे समितीच्या बैठकीत आश्वासित केलेल्या सन २००७ - २००८ मध्ये महासभेने ५ टक्क्याप्रमाणे मान्य केलेले अंदाजपत्रक २८.४७ कोटी रुपये असून झालेला खर्च फक्त ५.२ कोटी रुपये आहे. सन २००८-२००९ मध्ये महासभेने मान्य केलेले अंदाजपत्रक ३९.६० कोटी रुपये असून झालेला खर्च ५.५२ कोटी रुपये आहे. सन २००९-१० मध्ये महासभेने मान्य केलेले अंदाजपत्रक ४२.३८ कोटी रुपये असून झालेला खर्च १२.८२ कोटी रुपये इतका खर्च कमी झाला या मुद्यासंदर्भात समितीला लेखी स्वरुपात खालील माहिती पुरविण्यात आली.

महासभेचे अर्थसंकल्पीय अंदाज हे वाढीव उत्पन्न अपेक्षित ठेऊन धरले जातात. संदर्भिय मुद्यांमध्ये दर्शविलेल्या तरतुदी या महासभेच्या अंदाजपत्रकातील नमूद तरतुदी आहेत. मात्र प्रत्यक्ष उत्पन्न बरेच कमी असते.

शासन निर्णय नगरविकास विभाग, दिनांक ३ जुलै, १९८२ नुसार प्रत्यक्ष उत्पन्नातून महसूली खर्च वजा जाता शिल्लक राहणाऱ्या रकमेतून ५ टक्के तरतूद मागासवर्गीयांसाठीच्या योजनांसाठी / कामांसाठी राखीव ठेवणे अपेक्षित आहे.

नाशिक महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात यासाठी स्वतंत्र लेखाशिर्ष ठेवणेत आले आहे. तसेच या व्यतिरिक्त अन्य लेखाशिर्षातूनही मागासवर्गीयांच्या भागांमध्ये कामे केली जातात. तसेच प्रत्येक नगरसेवकांसाठी स्वतंत्र इतर विकास निधी (स्वेच्छा निधी) उपलब्ध करणेत आलेला आहे.

अनुसूचित जातीसाठी राखीव वॉर्डामधील नगरसेवक निधी अंतर्गत खर्च, प्रत्यक्ष ५ टक्के राखीव निधी तसेच अन्य योजना / कामांवरील खर्च झालेला निधी यांची एकत्रित आकडेवारी व टक्केवारी खालील प्रमाणे आहे.

मागासवर्गीयांच्या योजनांवरील एकत्रित खर्चाचा तपशिल

र.रु.कोटीमध्ये

वर्ष	मनपाचे प्रत्यक्ष उत्पन्न	प्रत्यक्ष महसुली खर्च वजा उत्पन्न	मागासवर्गीयांसाठी अपेक्षित ५ टक्के राखीव तरतुद	मागासवर्गीयांच्या योजनावरील एकुण खर्च	खर्चाची टक्केवारी
१	२	३	४	५	५/३X१००= ६
२००७-०८	६२७.३७	२०६.०६	१०.३०	५.०२	२.४३
२००८-०९	६०२.७२	२९१.७०	१४.५९	२५.८९	८.८८
२००९-१०	६३८.३४	३२७.३४	१६.३७	२८.१३	८.५९
२०१०-११	७१५.७५	३०३.९३	१५.२०	२६.२७	८.६४
एकुण	२५८४.१८	११२९.०३	५६.४६	८५.३१	७.५५
२०११-१२	८३५.९६	३५२.२५	१८.२८	३२.०७	९.१०
२०१२-१३ अपेक्षित	१०१०.४१ (अपेक्षित)	३०१.३९ (अपेक्षित)	२५.६७ सुधारित तरतूद	३४.४४	११.४२

सदर खर्चाच्या आकडेवारीत आरोग्य व वैद्यकीय सेवा, माहिला व बालकल्याण तसेच शैक्षणिक बाबींचा खर्च अंतर्भूत नसून या बाबींचा खर्च अतिरिक्त आहे तसेच कर्मचाऱ्यांना ६ वा वेतन आयोग लागु केल्यामुळे महसुली खर्चात वाढ झालेली आहे.

यापुर्वीचा खर्चातील अनुशेष भरून काढणेसाठी सन २०११-१२ व सन २०१२-२०१३ मध्ये वाढीव तरतुदी करण्यात आल्या असून त्यानुसार वाढीव खर्च करणेत येत आहे. सन २०१२-२०१३ च्या अर्थसंकल्पात दर्शविलेली सुधारित तरतूद रुपये २५.६७ कोटी खर्च झाली आहे. मागील कामांचे देयकांचा विचार करता प्रत्यक्ष खर्च या रकमेपेक्षाही वाढण्याची शक्यता आहे.

अनुशेष भरून काढणेसाठी कामांच्या अंमलबजावणीचे नियोजन करणेत आले आहे.

विभागीय सचिवांची साक्ष :

समितीला महानगरपालिकेकडून प्राप्त झालेल्या माहिती संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक २३ जानेवारी, २०१३ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली.

साक्षी दरम्यान सचिव, नगरविकास यांनी असा खुलासा केला की, मागासवर्गीयांसाठी ५ टक्के बजेटमध्ये राखीव तरतूद केलेली आहे. अपेक्षित उत्पन्न लक्षात घेता खर्च केलेला आहे. सन २००८-२००९ च्या बजेट मध्ये १ हजार २७ कोटी मिळेल अशी अपेक्षा होती, पण प्रत्यक्षात ६०२ कोटी रुपयेच मिळाले. म्हणजे एकूण ५९ टक्के उत्पन्न मिळालेले आहे, महसूली उत्पन्न वजा करून उर्वरित ५ टक्के राखीव तरतुदीनुसार १४ कोटी ५९ लक्ष खर्च करण्याची गरज होती, परंतू २५ कोटी ८९ लक्ष रुपये खर्च झालेला आहे, सन २००९-२०१० मध्ये ५८ टक्के खर्च करण्यात आलेला आहे. ५ टक्के हिशोबात धरून १६ कोटी ६७ लक्ष रुपये खर्च व्हायला पाहिजे होता. पण त्याविरुध्द म्हणजे २८ कोटी १३ लक्ष इतका खर्च झालेला आहे.

तसेच मागासवर्गीयांच्या योजनावरील खर्चाची टक्केवारी सन २००७-२००८ मध्ये २.४३, सन २००८-२००९ मध्ये ८.८८, सन २००९-२०१० मध्ये ८.५९, सन २०१०-२०११ मध्ये ८.६४, सन २०११-२०१२ मध्ये ९.१० अशी आहे व सन २०१२-२०१३ मध्ये मागासवर्गीयांच्या योजनावरील खर्चाची टक्केवारी ११.४२ असल्याचा खुलासा केला.

दलित वस्ती सुधारणेतंर्गत प्राप्त रकमे संदर्भात समितीने विचारणा केली असता, विभागीय प्रतिनिधी यांनी सन २००७-२००८ मध्ये प्राप्त झालेल्या ३ कोटी ६ लाख रुपयांपैकी २ कोटी ७४ लाख रुपये रक्कम खर्च झाली, शिल्लक रक्कम ३२ लाख रुपये आहे. सन २००८-०९ मध्ये प्राप्त झालेल्या १ कोटी रुपयांपैकी ७२ लाख ७० हजार रुपये रक्कम खर्च झाली, शिल्लक रक्कम २७ लाख ३० हजार रुपये आहे. सदर रक्कम लॅप्स करण्यात आलेली नसून त्यातून नवीन कामे घेण्यात येतील असे समितीला सांगितले.

त्यावर समितीने दलित वस्ती अर्थिकदृष्टया दुर्बल असते. दलित वस्तीमधील लोकांचा विकास होण्याच्या दृष्टीने मागासवर्गीय विद्यार्थीनींना शाळेत जाण्यासाठी सायकल पुरविणे, घरात शौचालय बांधणे इत्यादी कामे वैयक्तिक लाभाच्या योजनांमध्ये घेण्याची आवश्यकता असताना ती न घेण्याची कारणे काय आहेत, अशी विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधी यांनी याबाबत यापुढे नक्की विचार करण्यात येईल व सदर बाबतीत महासभेपुढे प्रस्ताव पाठवून त्यांची मान्यता घेऊन अशा प्रकारच्या योजना घेण्यात येतील असे समितीला आश्वासित केले.

अभिप्राय व शिफारशी

महानगरपालिकाच्या एकूण महसुली उत्पन्नाच्या रकमेतून ५ टक्के रक्कम मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी राबविण्यात येत असलेल्या योजनासाठी खर्च करण्यात येते समितीने नाशिक महानगरपालिकेस दिलेल्या भेटीच्या वेळी पुरविण्यात आलेल्या माहितीच्या अनुषंगाने आयुक्तांनी शिफारस केलेले रकमेचे अंदाज, स्थायी समितीने शिफारस केलेले रकमेचे अंदाज व महासभेने मान्य केलेले रकमेचे अंदाज आणि प्रत्यक्षात खर्च झालेली रक्कम यावरून महासभेने मान्य केलेल्या रकमेपेक्षा प्रत्यक्षात मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी योजना राबविताना नाशिक महानगरपालिकेने खर्च अल्प प्रमाणात केल्याची बाब निदर्शनास आली आहे.

विशेष घटक योजनेअंतर्गत दलित वस्त्यांची सुधारणा करण्यासाठी सन २००७-२००८ मध्ये रु. ३४०.५३ लाख असून प्रत्यक्षात खर्च रु. ९.८० इतका आहे. सन २००८-२००९ मध्ये रु. ४४०.२५ लाख असून प्रत्यक्षात खर्च रु. २२२.०५ इतका आहे. व सन २००९-२०१० मध्ये रु.२२४.८८ लाख असून प्रत्यक्षात खर्च रू.४३.१२ इतका आहे. उपरोक्त तीनही वर्षात दलित वस्त्यांची सुधारणा करण्यासाठी उपलब्ध रकमेपेक्षा प्रत्यक्षात खर्च कमी झाल्याचे समितीच्या निदर्शनास आले. सदर रक्कम लॅप्स होत नसून पुढील वर्षाकरिता त्याचा विनियोग करण्यात येत असला तरी ज्या वर्षीची रक्कम आहे त्याच वर्षी खर्च करणे अपेक्षित आहे. दलितासाठी योजना राबविताना योजनांचे नियोजन विहित मुदतीत करून रकमेचा वापर वेळेत कसा करता येईल हे पाहणे आवश्यक असताना देखील तसे केल्याचे दिसून येत नाही. तसेच अनुसूचित जातीतील लोकांच्या कल्याणासाठी त्यांना रोजगार उपलब्ध व्हावा ह्या हेतूने वैयक्तिक योजना राबविण्यात अधिकाऱ्यांमध्ये स्वारस्य नसल्याचेही समितीला आढळून आले आहे, असेही याठिकाणी नमूद करणे समितीला आवश्यक वाटते.

तथापि मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनेसंदर्भात नाशिक महानगरपालिकेने दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने प्रत्यक्षात योजना राबविताना झालेल्या कमी खर्चासंदर्भात विभागीय प्रतिनिधी यांनी साक्षीच्या वेळी मागासवर्गीयांच्या योजनावरील खर्चाची टक्केवारी सन २००७-२००८ मध्ये २.४३ टक्के आहे, सन २००८-२००९ मध्ये ८.८८ टक्के आहे, सन २००९-२०१० मध्ये ८.५९ टक्के आहे, सन २०१०-२०११ मध्ये ८.६४ टक्के आहे. सन २०११-२०१२ मध्ये ९.१० टक्के आहे, सन २०१२-२०१३ मध्ये ११.४२ टक्के असल्याचा खुलासा केला आहे. महानगरपालिकेने दिलेली माहिती व विभागीय प्रतिनिधी यांनी साक्षीच्या वेळी केलेल्या खुलाशावरून मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांसाठी करण्यात आलेल्या तरतुदी व झालेल्या खर्चाबाबत विसंगती आढळून येते. सदर माहितीत एकमत दिसून येत नाही ही फारच गंभीर बाब आहे. परंतु विभागीय प्रतिनिधी यांनी पुढे केलेल्या खुलाशावरून असे निदर्शनास आले की, मागासवर्गीयांच्या कल्याण योजनेवर खर्च अधिक झाला आहे. त्यामुळे मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी योजनावरील खर्चाच्या टक्केवारीत वाढ झाली आहे. यावरून असे दिसून येते की, मागासवर्गीय दलित वस्तीत कामांची निकड अधिक आहे. त्यामुळे दिनांक ३ जुलै, १९८२ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयान्वये मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी करण्यात आलेल्या ५% टक्क्यांच्या तरतूदीत आता वाढ करण्याची आवश्यकता आहे. सदर बाब लक्षात घेता मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी जिल्हापरिषदेत २० टक्के रक्कम ठेवली जाते त्याप्रमाणे महानगरपालिकेत देखील ५ टक्क्याऐंवजी १५ ते २० टक्के इतकी वाढीव रक्कम राखून ठेवण्यासबंधीची तरतूद करण्यात यावी, अशी ही समिती शिफारस करीत आहे.

(क) महानगरपलिकेच्या मालकीच्या व्यापारी संकुलात मागासवर्गीयांना गाळेवाटप व गटई कामगारांना व्यवसायासाठी स्टॉल्स वाटपाबाबत

समितीने अनुसूचित जातीच्या लोकाच्या कल्याणासाठी नाशिक महानगरपालिकेने काही सवलती दिल्या आहेत काय, यासंबंधीची खालील बाबी विषयी माहिती मागविली होती.

(अ) महानगरपालिकेच्या भाजी मार्केट व अन्य वसाहतीमध्ये गाळ्यांचे वाटप करतांना,

(ब) महानगरपालिकेच्या गृह निर्माण वसाहतीमध्ये गाळ्यांचे वाटप करतांना,

(क) व्यवसाय व व्यापारासाठी दिर्घकालीन भाड्याने प्लॉट्स देतांना,

(ड) बाजारपेठांमध्ये व रस्त्यावर गाळ्यांकरीता परवाने देतांना,

उपरोक्त मुद्यांच्या अनुषंगाने नाशिक महानगरपालिकेने समितीला महानगरपालिका क्षेत्रात बाजारपेठा व रस्त्यांवर मागासवर्गीयांना गाळेवाटप व गटई कामगारांना स्टॉल वाटप याबाबतची लेखी स्वरुपातील खालील प्रमाणे माहिती पुरविण्यात आली होती.

महानगरपालिका क्षेत्रात शासनाच्या निर्देशाप्रमाणे बाजारपेठा व रस्त्यांवर गाळ्यांकरिता परवाने देताना गाळ्यांच्या ५ टक्के गाळे अनुसूचित जाती/जमातीसाठी वाटप करण्यात येतात. त्यानुसार नाशिक महानगरपालिका क्षेत्रात अनुसूचित जातीच्या लोकांसाठी व्यापारी गाळे वाटप करण्यात आल्याची माहिती पुढीलप्रमाणे आहे :—

अ.क्र	व्यापार संकुलाचे नांव	एकूण गाळ्यांची संख्या	राखीव गाळे संख्या	सन २००७-२००८	सन २००८-२००९	सन २००९-२०१०	शेरा
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)
१.	शरणपुर कॅनडा बाजार	१२४	६	-	२	१	२ रिक्त
२.	शरणपुर कॅनडा मिनी मार्केट पालिका बाजार	३२०	१७	-	१	८	सर्व गाळे वाटप
३.	शिंगाडा तलाव पालिका बाजार	४०	४	-	-	-	२ गाळे रिक्त
४.	पेटरोड वडज्ञरवाडी शनिमंदिर समोरील पालिका बाजार	३४	२	-	-	२	-
५.	महात्मानगर पालिका बाजार	६१	३	-	२	-	सर्व गाळे वाटप
६.	सरदार चौक येथील पालिका बाजार नारोशंकर मंदिरासमोर	१४	१	-	-	-	रिक्त
७.	आनंदवल्ली प्राथ.शाळा नुतन इमारत	३२	२	-	-	-	रिक्त

समितीला दिलेल्या उपरोक्त माहितीच्या आधारे समितीने नाशिक महानगरपालिकेस भेट देऊन तेथील संबंधित अधिकाऱ्यांची दिनांक १७ जानेवारी, २०११ रोजी साक्ष घेतली. सदर साक्षीच्या वेळी समितीने नाशिक महानगरपालिकेने शासनाच्या धोरणानुसार व्यापारी संकुलात अनुसूचित जातीसाठी एकूण ३५ गाळे आरक्षित ठेवले असून त्यापैकी २९ गाळे वाटप करण्यात आले आहेत उर्वरित ६ गाळे वाटप करून त्याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला कळविण्यात यावी, असे निदेश दिले.

तसेच नाशिक महानगरपालिकेच्या पदपथाच्या बाजूला व्यवसाय करणाऱ्या गटई कामगारांना ऊन व पावसापासून संरक्षण मिळणेसाठी स्टॉलचे वाटप करण्याच्या योजनेअंतर्गत किती गटई कामगारांना स्टॉलचे वाटप करण्यात आले आहे काय याबाबत समितीने विचारणा केली असता समाजकल्याण अधिकारी नाशिक यांनी १०९ गटई कामगारांना स्टॉलचे परवाने व वाटप करण्याबाबत समाजकल्याण विभागाने अनुमती दिली असल्याचे सांगितले.

नाशिक महानगरपालिका येथे समितीने दिलेल्या भेटीच्या वेळी संबंधित अधिकाऱ्यांनी आश्वासित केलेल्या मुद्यासंदर्भात महानगरपालिकेकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला लेखी स्वरूपात खालील प्रमाणे पुरविण्यात आली.

नाशिक महानगरपालिका व्यापारी संकुलातील गाळे महाराष्ट्र शासनाचे धोरणाप्रमाणे अनुसूचित जाती व जमातीच्या लोकांना ५ टक्के गाळे राखीव ठेऊन वाटप केल्याबाबतचा तक्ता खालीलप्रमाणे आहे :—

अ.क्र.	व्यापारी संकुलाचे नाव	एकुण गाळे संख्या	राखीव गाळे संख्या	अनुसूचित जाती / जमातीसाठी राखीव गाळे	
				एकुण गाळे वाटप	रिक्त गाळे
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
१	कॅनडा कॉर्नर पालिका बाजार	१२४	६	५	१
२	शरणपूर कॅनडा कॉर्नर मिनी मार्केट	३२०	१७	१७	०
३	शिंगाडातलाव पालिका बाजार	४०	४	४	०
४	पेठरोड वडारवाडी शनि मंदिरा समोर	३४	२	०	२
५	महात्मानगर पालिका बाजार	६१	३	३	०
६	सरदार चौक पालिका बाजार	१४	१	०	१
७	आनंदवली प्राथमिक शाळा नूतन इमारत	३२	२	०	२
८	बालाजी कोट शॉपिंग सेंटर	१४	१	१	०
९	भांडार शॉपिंग सेंटर	२०	१	१	०
	एकूण . . .	६५९	३७	३१	६

उपरोक्त राखीव ठेवण्यात आलेले गाळे हे अनुसूचित जाती व जमातीच्या लोकांना व्यवसायासाठी जागा दरमहा लायसेन्स फी भरणेच्या तत्त्वावर व्यवसायासाठी देणेत आले आहेत.

विभागीय सचिवांची साक्ष :

समितीने नाशिक महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांची दिनांक १७ जानेवारी २०११ रोजी घेतलेल्या साक्षीच्या वेळी उपस्थित झालेल्या मुद्यांसंदर्भात संबंधित विभागीय सचिवांची दिनांक २३ जानेवारी २०१३ रोजी साक्ष घेतली.

साक्षीच्या वेळी समितीने नाशिक येथील कार्यालयाने १०९ गटई कामगारांना स्टॉल पुरविण्यास अनुमती दिल्यानुसार किती कामगारांना स्टॉल्स पुरविण्यात आले याबाबत विचारणा केली असता आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांनी ४×३×५.५ फुटाच्या स्टॉलसाठी १०९ अर्ज आले होते. त्यांपैकी ८२ जणांना अर्ज दिलेले आहेत. अन्य लोकांना डेली बेसिसवर परवाना दिला असल्याचे सांगितले. त्यावर समितीने सगळ्या अर्जदारांना कायमस्वरूपी स्टॉल कसे देता येतील याबाबत कार्यवाही करण्यात यावी, असे निर्देश दिले.

अभिप्राय व शिफारशी :—

समितीला प्राप्त झालेल्या उपरोक्त माहितीवरून असे दिसून येते की, नाशिक महानगरपालिकेच्या व्यापारी संकुलातील अनुसूचित जातीकरिता आरक्षित असलेल्या ३५ गाळ्यांपैकी ६ गाळ्यांचे वाटप करण्यात आले नव्हते. त्या गाळ्याचे वाटप करून त्याचा अहवाल सादर करण्याचे निदेश समितीने दिले होते. तथापि, साक्षीच्या वेळी समितीच्या असे निदर्शनास आले की, समितीने दोन वर्षांपूर्वी दिलेले निदेशाचे पालन अद्यापपर्यंत करण्यात आले नव्हते. यावरून समितीने दिलेले निदेश महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांनी दुर्लक्षित केले असल्याचे स्पष्ट होत असून मागासवर्गीयांच्या कल्याणाच्या योजना राबविण्यात अधिकाऱ्यांना स्वारस्य असल्याचे दिसून येत नाही, सदरहू कृती समितीचा अवमान करणारी ठरत असून याबद्दल समिती तीव्र खेद व्यक्त करते व मागासवर्गीयांसाठी राखीव असलेले उर्वरित ६ गाळे वितरित करण्याची कार्यवाही तातडीने पूर्ण करून, त्याचा अहवाल समितीला तीन महिन्यांच्या आत विलंबाच्या कारणासह सादर करण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.

तसेच नाशिक येथील समाजकल्याण कार्यालयाने मान्यता दिलेल्या १०९ गटई कामगारांना स्टॉल पुरविण्याबाबत अनुमती दिली असताना फक्त ८२ जणांना स्टॉल देण्यात येऊन उर्वरित २७ जणांना रोजंदारीवर परवाने देण्यात आले आहेत. गटई कामगार यांच्या कामाचे स्वरूप पाहता व त्यावरच त्यांचा उदरनिर्वाह अवलंबून असल्याची बाब लक्षात घेवून त्यांचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. महानगरपालिकेकडे उपलब्ध असलेले स्टॉल सर्व अर्जदार गटई कामगारांना कायमस्वरूपी कशा पद्धतीने लवकरात लवकर उपलब्ध करून देता येतील याबाबत तातडीने कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात सादर करण्यात यावी, अशी ही समिती शिफारस करीत आहे.

(२) विभागीय समाजकल्याण कार्यालय, नाशिक

(अ) अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी आश्रमशाळा व पोस्ट बेसिक आश्रम शाळा, शासकीय निवासी शाळा व वसतिगृहाबाबत

नाशिक येथील विभागीय समाजकल्याण कार्यालयांतर्गत असलेल्या आश्रमशाळा, शासकीय निवासी शाळा व वसतिगृहातमध्ये राहणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या दृष्टीने राहण्याची, जेवणाची व शैक्षणिक साहित्य विनामूल्य पुरविण्याच्या शासनाच्या योजनेची अंमलबजावणी कशा-प्रकारे करण्यात येत आहे याची माहिती जाणून घेण्यासाठी समितीने अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी आश्रमशाळा व पोस्ट बेसिक आश्रमशाळा सुरू करण्याची योजना कोणत्या वर्षापासून राबविली जात आहे; तसेच आश्रमशाळा व पोस्ट बेसिक आश्रमशाळा योजनेचे थोडक्यात स्वरूप काय आहे तसेच या योजनेच्या अंमलबजावणीसाठी जिल्हा/क्षेत्रियस्तरावर कशा प्रकारची यंत्रणा निर्माण करण्यात आली आहे. याबाबत माहिती मागविली होती.

उपरोक्त मुद्यांच्या अनुषंगाने नाशिक येथील विभागीय समाजकल्याण कार्यालयाकडून समितीला लेखी स्वरूपात खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली :—

अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी व पोस्ट बेसिक आश्रमशाळा सुरू करण्याची योजना सन १९९६-९७ पासून राबविली जात आहे. राज्यामध्ये ज्या जिल्ह्यात अनुसूचित जाती व नवबौद्ध यांची लोकसंख्या जास्त प्रमाणात आहे. अशा जिल्ह्यात अनुसूचित जाती नवबौद्धांच्या उन्नतीसाठी स्वयंसेवी संस्थांमार्फत आश्रमशाळा योजना राबविण्याबाबत शासनाने निर्णय घेतला. आश्रमशाळेमध्ये विद्यार्थ्यांची राहण्याची, जेवणाची व शैक्षणिक साहित्य विनामूल्य पुरविण्याची सुविधा असते. या आश्रमशाळेमध्ये इयत्ता १ ली ते ७ वी पर्यंतचे वर्ग प्राथमिक विभागात असतात. निवासी विद्यार्थ्यी संख्या १२० इतकी असते. यामध्ये प्रत्येक वर्गात विमुक्त जाती, भटक्या जाती, तसेच अनुसूचित जमातीचे विद्यार्थ्यी ५% घेता येतात. प्रत्येक वर्गामध्ये निवासी व अनिवासी मिळून ६० पेक्षा अधिक विद्यार्थ्यी अनुज्ञेय नाहीत. तसेच प्रत्येक वर्गासाठी १ शिक्षक मंजूर आहेत. विमुक्त जाती भटक्या जमातीसाठी चालविल्या जाणाऱ्या आश्रमशाळांच्या धर्तीवर सदरच्या आश्रमशाळा चालविल्या जातात या योजनेच्या अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरावर विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, व विभागीयस्तरावर विभागीय समाजकल्याण अधिकारी, हे नियंत्रण अधिकारी म्हणून काम पाहतात. अनुसूचित जातीच्या मुला/मुलींसाठी महाराष्ट्रात १० प्राथमिक व ६ माध्यमिक आश्रमशाळा मंजूर आहेत. उपरोक्त माहिती संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने नाशिक येथील विभागीय समाजकल्याण कार्यालयास दिनांक १७ जानेवारी २०११ रोजी भेट देऊन संबंधित अधिकाऱ्यांची साक्ष घेतली.

साक्षीच्या वेळी समितीने सामाजिक न्याय विभागाअंतर्गत अनुसूचित जातीच्या मुला/मुलींसाठी किती नवीन शासकीय निवासी शाळा बांधण्यात येत आहेत. त्याबाबतची सद्यःस्थिती काय आहे, अशी विचारणा केली असता विभागीय समाजकल्याण अधिकारी यांनी अनुसूचित जातीच्या मुलांमुलींसाठी नाशिक विभागामध्ये एकूण १२ निवासी शाळा मंजूर झालेल्या आहेत. नाशिक विभागामध्ये नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव आणि अहमदनगर या ५ जिल्ह्यांचा समावेश होतो. नाशिक जिल्ह्यामध्ये ३, धुळे जिल्ह्यामध्ये २, नंदुरबार

जिल्ह्यामध्ये २, जळगाव जिल्ह्यामध्ये २ आणि अहमदनगर जिल्ह्यामध्ये ३ याप्रमाणे एकूण १२ निवासी शाळा मंजूर झालेल्या आहेत. १२ पैकी ९ निवासी शाळांसाठी शासकीय जमीन प्राप्त झालेली असून इगतपुरी (अडसरे खुर्द), निफाड (पिंपळगाव बसवंत) आणि अमळनेर येथील निवासी शाळांसाठी शासकीय जमीन अप्राप्त आहे. येवला (बाभुळगाव बु.), साक्री (भाडणे), धुळे (सोनगीर शिवार), नंदुरबार (होळ तर्फे हवेली), शहादा (मोहिदे शिवार) चाळीसगाव, कर्जत (गायकरवाडी), श्रीगोंदा (माडवगण) आणि जामखेड (अरोळेनगर) या ठिकाणी जमीन प्राप्त झालेली आहे. जामखेड येथील निवासी शाळेचे आरसीसी काम पूर्ण झालेले आहे. कर्जत येथील निवासी शाळेचे काम जवळजवळ पूर्ण झालेले आहे. श्रीगोंदा येथील निवासी शाळेच्या दुसऱ्या स्लॅबचे काम पूर्ण झालेले आहे. इगतपुरी (अडसरे खुर्द) येथे खाजगी जमीन घेण्याचे प्रयत्न सुरू आहेत. परंतु तेथे बऱ्याचशा जागेचे मालक हे आदिवासी असून जागेच्या मालकाने त्याच्या कुटुंबातील २ व्यक्तींना शासकीय सेवेत सामावून घेण्याच्या अटीवर जागा देण्याचे मान्य केलेले आहे. अशा प्रकारे त्याच्या कुटुंबातील व्यक्तींना शासकीय सेवेत सामावून घेता येणार नाही, असे त्यांना कळविले असल्याचे स्पष्ट केले. समितीने निवासी शाळेकरिता किमान किती जागेची आवश्यकता असते, अशी पुढे विचारणा केली असता विभागीय समाजकल्याण अधिकारी यांनी निवासी शाळेसाठी कमीत कमी ३ एकर जागेची आवश्यकता आहे. तथापि, निवासी शाळा दहावीपर्यन्त असून पुढे कॉलेजही सुरू होऊ शकेल म्हणून ५ एकर जागा मिळविण्याचा प्रयत्न करीत आहोत. अडसरे खुर्द येथील आधीच्या मालकाशी बोलणी करून जागा विकत घेण्याचे प्रयत्न सुरू आहेत. निफाड (पिंपळगाव बसवंत) येथे शासकीय जागेवर अतिक्रमण झालेले असल्यामुळे ती जागा अप्राप्त आहे. अतिक्रमण काढण्यासंबंधीचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांना सादर केला असल्याची माहिती समितीला दिली.

समितीने किती वसतिगृहे शासकीय इमारतीमध्ये आणि किती वसतिगृहे भाड्याच्या इमारतीमध्ये आहेत आणि वसतिगृहातील विद्यार्थ्यांना किती अनुदान दिले जाते, अशी विचारणा केली असता, विभागीय समाजकल्याण अधिकारी यांनी २७१ पैकी ८२ वसतिगृह शासकीय इमारतीमध्ये आणि १८९ वसतिगृहे भाड्याच्या इमारतीमध्ये आहेत. तसेच नाशिकमध्ये नव्याने ११ वसतिगृहे मंजूर झालेली आहेत. त्यांपैकी ६ वसतिगृहांना जागा उपलब्ध झाली असून ५ ठिकाणी जागा उपलब्ध झालेली नाही. ज्याठिकाणी जागा उपलब्ध झाली आहे अशा ६ पैकी ५ वसतिगृहांची कामे पूर्ण झाली असून ३ ठिकाणी वसतिगृहे सुरू झालेली आहेत. जुन्या वसतिगृहांचा आढावा घेतला तर नाशिक विभागात ३७ वसतिगृहे असून त्यांपैकी मुलांची २३ आणि मुलींची १४ वसतिगृहे आहेत. त्यापैकी शासकीय इमारतीमध्ये २० वसतिगृहे असून त्यांचा २,७११ विद्यार्थी लाभ घेत आहेत.

शासकीय वसतिगृहाच्या अनुदानाचे सूत्र वेगळे आहे. अनुदानित वसतिगृहांमध्ये प्रत्येक विद्यार्थ्यामागे दरमहा ६३० रुपये दिले जातात. त्या व्यतिरिक्त तेथील अधीक्षकांसाठी ४,५०० रुपये मानधन दिले जाते. १२ वी उत्तीर्ण झालेल्यांना अधीक्षक म्हणून नेमले जाते असे सांगितले. त्यावर समितीने डी.एड. केले आहे अशांना अधीक्षक म्हणून नेमले तर विद्यार्थ्यांना अनुकूल होईल. त्यांना शिक्षकांप्रमाणे वेतनश्रेणी लागू

करावी, अशी समितीने सूचना केली. समितीने पुढे अनुदानित वसतिगृहामध्ये प्रत्येक विद्यार्थ्यासाठी दरमहा ६३० रुपये दिले जातात. त्यानुसार शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांमागे किती खर्च येतो, यासंदर्भात तपशील देण्यात यावा तसेच नाशिक विभागामध्ये शासकीय आणि खाजगी वसतिगृहांसाठी अंदाजपत्रक किती आहे, अशी समितीने विचारणा केली असता, विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी शासकीय वसतिगृहासाठी बंधन नाही. शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या जेवणाकरिता खर्च वेगळा दिला जातो. इतर खर्चासहित वेतनावरील खर्च शासनाकडून दिला जातो. विद्यार्थ्यांना दरमहा २०० रुपये निर्वाह भत्ता दिला जातो.

तसेच नाशिकमधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुलांचे वसतिगृह यासाठी २००९-२०१० मध्ये रु. ९.८७ लाख तरतूद होती व ही संपूर्ण रक्कम खर्च झालेली आहे. १० महिन्यांचा हा खर्च आहे. मुलींच्या वसतिगृहासाठी २००९-२०१० मध्ये रु. २१.९८ लाख तरतूद होती, ही संपूर्ण रक्कम खर्च झालेली आहे. सदरची रक्कम वेतन, कार्यालयीन खर्च, प्रवास खर्च, साधनसामग्री यासाठी खर्च केली जाते, अशी माहिती दिली. त्यावर समितीने विद्यार्थ्यांसाठी जो दरडोई खर्च दिला जातो त्याप्रमाणात त्यांना सुविधा मिळत नाहीत, असा आक्षेप घेतला व समितीने पुढे वसतिगृहातील परिस्थिती फारच हृदयद्रावक असून मुलांना ६३० रुपयांच्या प्रमाणात सुविधा मिळाल्या पाहिजेत, परंतु तसे घडत नाही. महिन्यातील १५-२० दिवस जेवण दिले जाते. महिन्यातील तीन दिवस सुट्टी असते. आहारात भाजी दिली जात नसून नित्कृष्ट दर्जाचा आहार पुरविण्यात येतो. ६३० रुपये अपुरे पडत असतील तर २०० रुपये वाढवून द्यावेत. परंतु चांगल्या प्रकारचा आहार दिला पहिजे. कोचिंग क्लाससाठी जो भत्ता दिला जातो त्याचा त्यांना फायदा मिळाला पाहिजे. शासनाकडून जे अनुदान दिले जाते त्याचा विनियोग विद्यार्थ्यांसाठीच झाला पाहिजे, असे मत समितीने व्यक्त करून. अनुदान अपुरे असेल तर रक्कम वाढवून दिली जावी. एजन्सीकडून विद्यार्थ्यांना निकृष्ट दर्जाचे जेवण दिले जाते. एका पलंगावर तीन-तीन विद्यार्थी झोपतात, सध्याचे थंडीचे प्रमाण लक्षात घेता वसतिगृहांमध्ये गरम पाण्याची व्यवस्था करून विद्यार्थ्यांना गरम पाणी उपलब्ध करून दिले जात नाही, ही वस्तुस्थिती असल्याचे स्पष्ट करून याबाबत गांभीर्याने लक्ष देण्याची आवश्यकता आहे. जिल्ह्यातील समाजकल्याण अधिकाऱ्यांनी वसतिगृहांना भेटी द्याव्यात, वसतिगृहांतील सोयी-सुविधा विद्यार्थ्यांना कशा स्वरूपात मिळतात याची काळजीपूर्वक तपासणी करावी, म्हणजे एकप्रकारे अशा गोष्टींवर आळा बसेल, असे समितीला वाटते.

समितीने पुढे वार्षिक तरतूद केली जाते ती रक्कम १०० टक्के खर्च होते काय, याबाबत स्पष्टीकरण करण्यास सांगितले असता, यावर विभागीय समाजकल्याण अधिकारी यांनी महिन्याचा खर्च लक्षात घेऊन तेवढी स्लीप बीडीएसमार्फत काढली जाते. जेवढी रक्कम काढली जाते तेवढे पुढील महिन्याचे नियोजन तयार असते. तसेच अनुदानित वसतिगृहाची योजना जिल्हा परिषदांमार्फत राबविली जाते. प्रत्येक महिन्यात वसतिगृहांना अनुदान दिले जात नाही. जुलै महिन्यात ॲडव्हान्स रक्कम दिली जाते. सप्टेंबर महिन्यात ऑडिट केल्यानंतर फेब्रुवारी-मार्च महिन्यात हिशेब होऊन उर्वरित रक्कम दिली जाते. अनुदानित वसतिगृह

ज्या संस्थेचे असेल त्यांनी माल खरेदी करावयाचा आणि वापरावयाचा आहे. शासकीय वसतिगृहात काही ठिकाणी जेवणाचे करार निश्चित केले जातात. काही ठिकाणी स्वयंपाकी असतात. नाशिक विभागामध्ये जिल्ह्याच्या ठिकाणी वसतिगृहाची खानावळ आहे. तालुकास्तरावरील वसतिगृहामध्ये स्वयंपाकी आहे. जिल्हास्तरावर वस्तुंचा पुरवठा करण्याबाबत जाहिरात दिली जाते. त्याची छाननी होऊन विभाग स्तरावर अंतिम मान्यता दिली जात असल्याचे समितीला सांगितले.

समितीने वसतिगृहाच्या संदर्भात आलेल्या तक्रारीबाबत कोणती कारवाई करण्यात आलेली आहे, विद्यार्थ्यांना जेवणातून विषबाधा होण्याच्या घटना घडल्या आहेत काय, समाजकल्याण अधिकारी वसतिगृहाला अचानकपणे भेट देऊन जेवणाचा दर्जा तपासणी करतात काय; विभागातील किती अधिकाऱ्यांनी या संदर्भातील तपासणी केली आहे याबाबत समितीला माहिती देण्यात यावी. या संदर्भात विभागीय समाजकल्याण अधिकारी यांनी साक्री येथील प्रकरणी दोन स्वयंपाकी आणि गृहपालाला निलंबित केलेले आहे आणि अंमळनेर, जि. जळगांव येथील प्रकरणी गृहपालाची बदली केलेली आहे. वसतिगृहाच्या तपासणीबद्दल महिन्यातून एका ठिकाणी भेट दिली पाहिजे, असे सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकाऱ्यांना सक्त सूचना दिल्या असल्याचे स्पष्ट केले.

समितीने याठिकाणी विभागातील सर्व जिल्ह्यांचे समाजकल्याण अधिकारी उपस्थित आहेत काय, नाशिक जिल्ह्यामध्ये ६ शासकीय आणि ३ अनुदानित अशी एकूण ९ वसतिगृहे आहेत. जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी स्वतः जातीने महिन्यातून एकदा एकातरी वसतिगृहाला भेट दिली पाहिजे. ज्या प्रमाणात अनुदान दिले जाते ते विचारात घेता तुमचे नियंत्रण असणे आवश्यक आहे. शासकीय कर्मचारी दोषी असेल तर निलंबित करता येते, वेतनवाढ थांबविता येते, अधीक्षक, स्वयंपाकी यांच्यावर कारवाई करता येते. परंतु अनुदानित वसतिगृहांचे काय, तेथील मुलांची काय परिस्थिती आहे; एका विद्यार्थ्यामागे सरासरी १० हजार रुपये वार्षिक खर्च केला जातो. प्रशासकीय खर्च, वीज, पाणी, कपडे, पुस्तके, इ. तत्सम सुविधा गृहित धरता त्या योग्यप्रकारे विद्यार्थ्यांना पुरविण्यात येतात काय, या बाबीकडे विभागातील सर्व समाजकल्याण अधिकाऱ्यांनी गांभीर्याने लक्ष दिले पाहिजे. शासनाची सेवा करीत असताना दायित्वाची भावना मनामध्ये असणे आवश्यक आहे. या व्यवस्थेकडे गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे, असे समितीने मत व्यक्त केले.

समितीने नाशिक येथील विभागीय समाजकल्याण कार्यालयास दिलेल्या भेटीच्या वेळी आश्वासित केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने नाशिक विभागात नवीन शासकीय निवासी शाळा बांधण्यात येत आहेत. या संबंधीच्या सद्यःस्थितीबाबत विचारलेल्या प्रश्नाला लेखी स्वरूपात पुरविण्यात आलेली माहिती पुढीलप्रमाणे आहे.

नाशिक विभागात एकूण १२ निवासीशाळा मंजूर झाल्या होत्या. त्यापैकी दुसऱ्या दोन शाळा अनुक्रमे अडसरे ,ता. इगतपुरी, जि. नाशिक व अमळनेर, जि. जळगाव येथील शाळा या अनुक्रमे चिखलोली, जि. ठाणे व आर्णी, जि. यवतमाळ येथे स्थलांतरित झालेले आहेत. उर्वरित १० निवासी शाळांची वस्तुस्थिती

खालीलप्रमाणे १० पैकी ९ ठिकाणी शासकीय जमीन प्राप्त झाले असून ७ ठिकाणी इमारत बांधकाम पूर्ण झाली असून निवासीशाळा नियमित सुरू आहेत. खालीलप्रमाणे ठिकाणी शासकीय जमीन प्राप्त आहे :—

अ. क्र. (१)	जिल्हा (२)	निवासीशाळेचे नाव (३)	जमीन प्राप्त (४)	बांधकामपूर्ण (५)	बांधकाम अपूर्ण (६)
१.	नाशिक	मुलांचे निवासीशाळा, बाभुळगाव, ता.येवला, जि.नाशिक	होय	होय	—
		मुलींची निवासीशाळा पिंपळगांव (बसवंत) शाळा सुरू, रसलपूर (वसतिगृहात), ता. निफाड.	होय	सुरू होणे आहे.	शासकीय जमीन प्राप्त झाले असून नकाशा व अदांजपत्रक मिळणे-साठी सार्वजनिक बांधकाम विभागास पत्र दिले आहे.
२.	धुळे	मुलींची निवासीशाळा, भाडणे, ता. साक्री, जि.धुळे	होय	होय	शा.जमीन प्राप्त झाली असून सदर जागा सा.बां.विभागाकडे बांधकामासाठी वर्ग करण्यात आली आहे.
		मुलींची निवासी शाळा सोनगीर, ता. जि. धुळे	होय	सुरू होणे आहे	
३.	नंदुरबार	मुलींची निवासीशाळा, होळ तर्फे हवेली नंदुरबार	होय	होय	—
		मुलींची निवासीशाळा, मोहिदे शहादा जि. नंदुरबार	होय	होय	—
४.	जळगाव	मुलांची निवासीशाळा चाळीस गांव, जि. जळगांव	नाही	नाही	शा.जमीन अप्राप्त खाजगी जमीन मिळणेसाठी जाहिरात दिली आहे.
५.	अ.नगर	मुलींची निवासीशाळा, गायकरवाडी, ता. कर्जत	होय	होय	—
		मुलींची निवासीशाळा, अरोळेनगर, ता.जामखेड	होय	होय	—
		मुलींची निवासीशाळा, मांडवगण, ता. श्रीगोंदा	होय	होय	—

वरिल प्रमाणे ९ ठिकाणी शासकीय जमीन प्राप्त असून ७ ठिकाणी बांधकामे पूर्ण होवून नवीन इमारतीत निवासीशाळा सुरू आहेत. तसेच सोनगीर, ता., जि. धुळे येथे तात्काळ बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सुरू करण्यात येत आहे. पिंपळगांव (ब) येथील नकाशा व अंदाजपत्रक सा.बां. विभागाकडे मागविण्यात आले असून ४० गांव येथे शासकीय जमीन उपलब्ध नसल्यामुळे सहा. आयुक्त, जळगांव यांनी वर्तमानपत्रात जाहिरात देवून खाजगी जमीन मिळण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. त्यानुसार प्रस्ताव श्री. गोपाल गिरीधर अग्रवाल यांचा प्राप्त झाला होता. तथापि, सदर जागेची अडचण असल्याने पुन:श्च दुसऱ्या जागेचा शोध सुरू आहे.

१) मुलांची निवासीशाळा, अडसरे, ता. इगतपुरी, जि. नाशिक ऐवजी आर्णी जि. यवतमाळ येथे स्थलांतर शासन निर्णय शुद्धीपत्रक क्र.बसीसएच-२०११ पत्र क्र.२०८/मावक-७, दिनांक ३० ऑगस्ट २०११ नुसार (सोबत शासन निर्णय)

२) मुलींची निवासीशाळा, अमळनेर, जि. जळगांव ऐवजी चिखली (अंबरनाथ), जि. ठाणे येथे स्थलांतरित शासन निर्णय शुध्दीपत्रक बीसीच-२०११/प्रक्र २०४/मावक-७, दिनांक १४ फेब्रुवारी २०१२ नुसार सोबत शासन निर्णय प्रत.

विभागीय सचिवांची साक्ष

समितीने विभागीय समाजकल्याण कार्यालय, नाशिक येथे दिनांक १७ जानेवारी २०११ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करताना उपस्थित झालेल्या मुद्यांबाबत व आश्वासित केलेल्या मुद्यांसंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती जाणून घेण्यासाठी संबंधित विभागीय सचिवांची दिनांक २३ जानेवारी २०१३ रोजी साक्ष घेतली.

साक्षीच्या वेळी उपरोक्त प्राप्त माहितीसंदर्भात समितीने मुलांच्या शासकीय निवासी शाळा, अडसरे, ता. इगतपुरी ऐवजी आर्वी, जि.यवतमाळ व अमळनेर, जि.जळगाव ऐवजी चिखलोली (अंबरनाथ) जि.ठाणे येथे स्थलांतरित करण्यात आलेल्या शाळा सुरू करण्यात आलेल्या आहेत काय, तसेच, या शाळा नाशिक जिल्ह्यातून इतरत्र नेण्याची कारणे काय आहेत, जागेची नेमकी काय अडचण होती, त्यावेळी शासनाकडे जागा उपलब्ध नव्हती काय, याबाबत स्पष्टीकरण करण्यास सांगितले असता, विभागीय प्रतिनिधी यांनी नाशिक विभागात एकूण १२ निवासी शाळा मंजूर झाल्या होत्या. त्यापैकी दोन निवासी शाळा त्यावेळी जागेची अडचण असल्यामुळे चिखलोली, जि.ठाणे आणि आर्णी, जि. यवतमाळ येथे ट्रान्सफर झालेल्या आहेत. जळगाव येथे निवासी शाळेसाठी जागा प्राप्त झालेली नाही. उर्वरित ९ ठिकाणी निवासी शाळांसाठी जागा प्राप्त झालेली असून त्या ठिकाणी शाळेचे बांधकाम देखील पूर्ण झालेले आहे, अशी माहिती दिली, त्यावर समितीने नाशिक विभागात जागा न मिळण्याची कारणे काय आहेत, अशी विचारणा केली असता, विभागीय समाजकल्याण अधिकारी यांनी जळगाव येथे जागा उपलब्ध व्हावी यासाठी आम्ही जाहिरात सुद्धा दिली होती. त्यावेळी अडसरे येथे जागा उपलब्ध नव्हती. नंतर जागा उपलब्ध करून देण्यात आली. परंतु ज्यांनी जागा उपलब्ध करून दिली त्यांनी आमच्या कुटुंबातील दोन लोकांना शासकीय सेवेत सामावून घ्यावे, अशी अट टाकली होती. शासनस्तरावर तसे पत्र आले होते.

समितीने ज्यावेळी अडसरे गावात निवासी शाळा सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला, त्यावेळी निवासी शाळेसाठी विद्यार्थी उपलब्ध होतील, असे गृहीत धरण्यात आले असेल. अडसरे येथे निवासी शाळा सुरू होणार असल्यामुळे विद्यार्थ्यांची शैक्षणिक सोय होईल, असे तेथील लोकांना वाटले असेल. परंतु अडसरे येथील निवासी शाळेचे स्थळ बदलून ती शाळा दुसरीकडे सुरू करण्यात आली. ज्या ठिकाणी ही शाळा सुरू करण्यात आली तेथे शाळा नव्हती काय ते विद्यार्थी कोणत्या वर्गातील होते त्या विद्यार्थ्यांची पर्यायी व्यवस्था कोठे करण्यात आली होती, अशी विचारणा केली असता, विभागीय समाज कल्याण अधिकारी यांनी, विद्यार्थी इयत्ता तिसऱ्या, चौथ्या वर्गातील होते. ज्यावेळी अडसरे येथील निवासी शाळेचे स्थळ बदलले त्यावेळी शाळा सुरू झाली होती. शाळेत १२ विद्यार्थी होते, त्यांचे दुसरीकडे स्थलांतर करण्यात आले. तसेच अंमळनेर येथे दुसरी शाळा असून तेथे २२ विद्यार्थी होते. ज्यावेळी स्थलांतर झाले त्या वेळी जागा उपलब्ध नव्हती. आता जागा उपलब्ध झाली आहे. काही विद्यार्थ्यांना जळगांव येथील शैक्षणिक संस्थेत आणि काही विद्यार्थ्यांना चाळीसगांव येथील शाळेत शिफ्ट केले होते, अशी माहिती समितीला दिली. समितीने पुढे चिखलोली येथे शाळा सुरू झालेली आहे काय, तसेच अमरावती येथील

शाळेचे बांधकाम कोणत्या स्तरावर आहे, अशी विचारणा केली असता, विभागीय प्रतिनिधी यांनी विभागीय मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने त्याला परवानगी दिली असून पुढे असे स्पष्ट केले की, समितीने मंजूर १२ निवासी शाळापैकी १० निवासी शाळा कार्यरत आहेत. २ निवासी शाळा शासनाने इतरत्र स्थलांतरित केलेल्या आहेत. १० निवासी शाळांपैकी ९ शाळांसाठी जागा प्राप्त आहे. फक्त १ निवासी शाळा चाळीसगावकरिता शासकीय जागा उपलब्ध नाही. यासाठी जागेसंदर्भात वर्तमानपत्रात दोन वेळा जाहिरात देऊन सुद्धा एकच प्रस्ताव प्राप्त झाला, यावर विचार करण्यात आला. परंतू सदरील जागा ग्रीन झोनमध्ये आहे. त्यावर समितीने जागेबाबत शासनाने कोणते प्रयत्न केले याची सद्य:स्थिती काय आहे, याबाबत खुलासा विचारला असता, विभागीय समाजकल्याण अधिकारी यांनी चाळीसगाव येथील निवासी शाळेचा प्रस्ताव मागच्या आठवड्यात आलेला आहे. सदर बैठकीत दर निश्चित झाल्यावर जागा खरेदी केली जाणार आहे, असा खुलासा केला.

समितीने अनुसूचित जातीमधील विद्यार्थ्यांसाठी बांधण्यात आलेल्या वसतिगृहामध्ये शासन निर्णयानुसार ८० टक्के जागा अनुसूचित जाती व इतर २० टक्के प्रमाणे १०० टक्के मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रवेश दिलेला आहे का, अशी विचारणा केली असता, विभागीय प्रतिनिधी यांनी अनुसूचित जाती ८० टक्के, अनुसूचित जमाती ३ टक्के, विमुक्त जाती व भटक्या जमाती ५ टक्के, आर्थिक व मागास प्रवर्ग आणि दारिद्र्य रेषेखालील लोकांसाठी ५ टक्के, विशेष मागास प्रवर्गासाठी २ टक्के, अपंगांसाठी ३ टक्के, अनाथालयासाठी २ टक्के अशा प्रकारे १०० टक्क्यांचे विगतवारी करण्यात आली असल्याचे सांगितले.

मागासवर्गीय वसतिगृहांची दुरावस्था यासंदर्भात समिती नेमली होती. समितीचा अहवाल प्राप्त झाला आहे काय, अशी समितीने विचारणा केली असता, विभागीय प्रतिनिधी यांनी दिनांक १६ मे १९८४ मध्ये शासनाच्या मागासवर्गीय वसतिगृहांना अधिक प्रमाणात सोयी-सुविधा देण्यासाठी समितीने अनेक सुधारणा सुचविल्या आहेत. दिनांक २६ जुलै २०११ रोजी शासन निर्णय निर्गमित केलेला असून त्यामध्ये मागासवर्गीय वसतिगृहांना अधिक सोयी-सुविधा देण्यात आलेल्या आहेत. सदर शासन निर्णयात आमुलाग्र बदल करण्यात आले आहेत. यामध्ये नव्याने ३९ अधिक सोयी-सुविधा दिलेल्या आहेत, याची प्रत समितीला दिली जाईल असे स्पष्ट केले.

समितीने वसतिगृहाची पहाणी कोणते अधिकारी करीत असतात, त्यांनी गेल्या वर्षी किती वसतिगृहांची पहाणी केली याबाबत विचारणा केली असता, विभागीय प्रतिनिधी यांनी प्रादेशिक समाजकल्याण अधिकारी आकस्मिकरित्या वसतिगृहांची पाहणी करीत असतात. तसेच याबाबत स्वत: ८ ते १० वेळा वसतिगृहांची पाहणी केलेली आहे. यासंदर्भात सन २०११-२०१२ चा अहवाल आहे. वसतिगृहाला सहायक लेखाधिकारी, नाशिकचे समाजकल्याण अधिकारी, जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी दिनांक २१ जुलै २०११ पासून ते दिनांक २१ डिसेंबर २०११ पर्यंत वेळोवेळी भेटी दिलेल्या आहेत. सदर भेटीत प्रवेशिकांची संख्या तपासली जाते. जेवणाचा दर्जा तपासला जातो. शेरे बुक असून त्यामध्ये तक्रारी असल्याची त्याची नोंद घेतली जाते. शेरेबुकावर जेवणाचा दर्जा चांगला असल्याचे अभिप्राय नमूद केले असल्याचे स्पष्ट केले.

समितीने शासनाची अनेक वसतिगृहे ही भाड्याच्या जागेत चालविली जातात यासाठी किती खर्च येतो व वसतीगृहासाठी जास्तीतजास्त किती क्षेत्रफळाची जागा असते, अशी विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधी यांनी प्रत्येक ठिकाणी वेगवेगळया निकषाप्रमाणे भाडे आकारले जाते. प्रत्येक वर्षी किती भाडे असावे याचे वेगवेगळे निकष आहेत. वसतिगृहे भाडे चौ.फू.प्रमाणे पीडब्ल्यूडी ठरविते. इमारत जुनी असेल तर कमी भाडे व इमारत नवीन असेल तर अधिक भाडे आकारले जाते. लासलगाव येथील ४५०० चौ.फू.च्या वसतिगृहाचे भाडे ३० हजार रुपये आहे. मालेगाव येथील वसतिगृहाचे भाडे ३१९१५ रुपये आहे. वसतिगृहासाठी जास्तीतजास्त ५५०० चौ.फू. क्षेत्रफळाची जागा घेतो, अशी माहिती दिली.

उपरोक्त सर्व बाबी लक्षात घेता समितीने सरासरी खर्च प्रत्येक विद्यार्थ्यामागे ४१११ रुपये आणि विद्यार्थीनीमागे ३७९४ रुपये दर्शविण्यात आला आहे. त्यामध्ये गार पाण्यासाठी कूलर, वॉटर हिटर, जलशुध्दीकरण यंत्र इत्यादी बाबी नमूद केल्या आहेत. परंतु, खाजगी जागेतील वसतिगृहांत अशा सोयी कुठेही आढळून येत नाहीत. विद्यार्थ्यांना पाण्याचे पिंप मिळत नाही आणि जलशुध्दीकरण यंत्र दिसून येत नसल्याने याबाबत खुलासा करण्यास सांगितले. त्यावर विभागीय समाजकल्याण अधिकारी यांनी भाड्याच्या इमारतीमध्ये गरम पाणी आढळून येणार नाही. कारण तेथे सौर ऊर्जेवरील यंत्र बसविलेले नाहीत. कारण ते यंत्र बसविण्यासाठी घरमालक परवानगी देत नाही. जलशुध्दीकरण यंत्र मिळाले आहे. येत्या २-३ महिन्यांत त्याचे इन्स्टॉलेशन होईल. नवीन वसतिगृहांमध्ये अद्याप सुविधा नाही, जुन्या वसतिगृहांमध्ये ती असल्याची माहिती दिली.

समितीने वसतिगृहातील मुले व मुलींना देण्यात येणाऱ्या खर्चाच्यासंदर्भात मुलांसाठी ४१११ रुपये व मुलींसाठी ३७९४ रुपये इतका दाखविण्यात आला आहे, यामध्ये एवढी तफावत का आहे, याबाबत स्पष्टीकरण करण्यास सांगितले असता, विभागीय समाजकल्याण अधिकारी यांनी आरोग्य विभागाच्या स्केलनुसारच हे कॅल्क्युलेशन केले आहे. आरोग्य विभागाच्या निकषांप्रमाणेच मुलींचा सरासरी खर्च कमी दाखविला आहे. गव्हाचे प्रमाण मुलांसाठी ४०० ग्रॅम व मुलींसाठी ३०० ग्रॅम असे ठरविले आहे. मुलीचा तेवढा इनटेक नाही, आपण तसे केले तर शासनाचा खर्च होणार आहे. तसेच मुलींना तेलासाठी निर्वाह भत्ता दिला जातो असे स्पष्ट केले. त्यावर समितीने मुला-मुलींच्या भोजनाच्या प्रमाणात एवढी तफावत का आहे, मुलाला व मुलीला मोजमाप करून आहार दिला जातो का, दोघांचा सरासरी खर्च समान करण्यास काय हरकत आहे, मुलींना केसाला लावण्यासाठी तेल जास्त लागते. त्याचा खर्च काढला आहे का, मुले व मुली यांच्या सरासरी खर्चामध्ये तफावत करायला नको, मुला-मुलींसाठी आहाराचे प्रमाण समान ठेवावे, असे समितीने स्पष्ट केले असता विभागीय प्रतिनिधी यांनी आहाराच्या संदर्भातील प्रमाण आरोग्य विभागाकडून ठरवून देण्यात आले आहे. समितीच्या निदेशानुसार पुन्हा या संदर्भात तपासून घेण्यात येईल, असे समितीला आश्वासित केले.

समितीने प्राप्त माहितीवरून एकूण ४६ वसतिगृहांपैकी २८ वसतिगृहे शासकीय इमारतींमध्ये आहेत व १८ वसतिगृहे भाड्याच्या इमारतींमध्ये आहेत. त्याबाबत कोणते उपाययोजले आहेत अशी विचारणा केली

असता, विभागीय समाजकल्याण अधिकारी यांनी असे स्पष्ट केले की, भाड्याच्या १८ इमारतींमध्ये जी वसतिगृहे कार्यरत आहेत, त्यातील ९ वसतिगृहांना शासकीय जमीन प्राप्त झाली आहे. उर्वरित ९ वसतिगृहांसाठी जमीन उपलब्ध होण्याबाबत विभागातील सहायक आयुक्तांनी वर्तमानपत्रांमध्ये जाहिरात देऊन, खाजगी मालकांच्या जमीनीबाबत पाठपुरावा सुरू केला आहे.

समितीने साक्री येथील गृहपाल व स्वयंपाकी यांच्या विरुद्ध तक्रारी आल्या होत्या. त्यासंबंधात आपण कोणती कारवाई केली आहे काय, अशी पृच्छा केली असता, विभागीय प्रतिनिधी यांनी त्यांची दोन वेतनवाढी रोखण्यात आल्या असून विभागीय चौकशी सुरू आहे, असे सांगितले.

अभिप्राय व शिफारशी

नाशिक विभागीय समाजकल्याण अंतर्गत मुलांच्या एकूण १२ निवासी शाळा मंजूर करण्यात आल्या होत्या त्यापैकी जागेची अडचण असल्याने दोन निवासी शाळा चिखलोली, जिल्हा ठाणे व आर्णी, जिल्हा यवतमाळ येथे हस्तांतरित केल्याबाबत समितीने आक्षेप नोंदविला असून निवासी शाळा स्थलांतरीत केल्याने तेथील स्थानिक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार असून विद्यार्थ्यांना दूरवर शिक्षणासाठी जावे लागणार आहे, याबाबत समितीने चिंता व्यक्त केली. स्थानिक विद्यार्थ्यांची शैक्षणिक सोय व्हावी या हेतूने अडसरे व अमळनेर मध्ये निवासी शाळा सुरू होणार होती. तथापि, ती होऊ शकली नाही याबाबत समिती तीव्र नाराजी व्यक्त करीत आहे. खेड्यापाड्यातील लोक नोकरीच्या निमित्ताने शहरामध्ये येत असतात तसेच ऊस तोड कामगार स्थलांतर करीत असतात, अशा लोकांची मुले शिक्षणापासून वंचित राहू नयेत म्हणून शासनाने प्रत्येक तालुक्यात निवासी शाळा बांधण्याचा प्रस्ताव केला होता. त्यानुसार निवासी शाळेचे बांधकाम करणे करीता जागा मिळणेसाठी प्रयत्न करून तातडीने बांधकाम करावे व स्थानिक विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधेसाठी निवासी शाळा उपलब्ध करून देण्यात याव्यात, अशी समिती शिफारस करीत आहे.

मागासवर्गीय वसतिगृहांच्या दुरावस्थेसंदर्भात नेमण्यात आलेल्या समितीने दिलेल्या अहवालानुसार शासन निर्णयात आमुलाग्र बदल करून ३९ नव्याने सोयी सुविधा दिल्या असल्याचे समितीला सांगण्यात आले. परंतु मागासवर्गीय विद्यार्थ्यांना वसतिगृहात देण्यात येणाऱ्या आहाराचा दर्जा योग्य नसणे, उन्हाळ्यात पिण्यासाठी गार पाण्याची व्यवस्था नसणे, हिवाळ्यात आंघोळीसाठी गरम पाण्याची व्यवस्था नसणे, जलशुध्दीकरण यंत्र नसणे, विद्यार्थ्यांना वेळेवर गणवेष व शैक्षणिक साहित्य दिले जात नाही. समाजकल्याण अधिकारी वसतिगृहाला भेट देऊन तपासणी करून अहवाल वेळेवर देत नाहीत, इत्यादी अनेक त्रुटी समितीला आढळून आल्या आहेत. अनुदानित वसतिगृहातील प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी दरमहा ६३० रुपये दिले जातात. त्याप्रमाणात शासनाच्या अनुदानित रकमेचा वापर योग्य होत नसून खर्च, वीज, पाणी, कपडे व पुस्तके इ. सुविधा विद्यार्थ्यांना व्यवस्थित पुरविण्यात येत नाहीत. त्यामुळे विद्यार्थ्यांची हेळसांड होत आहे. अनुदानित वसतिगृहास प्रत्येक विद्यार्थ्यासाठी दरमहा ६३० रुपये देण्यात येऊन सुध्दा जर योग्य प्रकारच्या

सुविधा विद्यार्थ्यांना मिळत नसतील तर शासनाने या रकमेत अजून २०० रुपयांची वाढ करावी, अशी समिती शिफारस करीत आहे.

शासनाची सेवा करताना दायित्वाची भावना मनामध्ये असणे आवश्यक आहे. या व्यवस्थेकडे समाजकल्याण अधिकाऱ्यांनी गांभीर्याने लक्ष देण्याची आवश्यकता असून ज्या उद्देशासाठी या विभागाची स्थापना झालेली आहे. तो उद्देश पूर्ण करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याची आवश्यकता असल्याचे समितीचे मत आहे. यासंदर्भात विभागीय समाजकल्याण अधिकारी यांनी याप्रकरणी काळजीपूर्वक लक्ष घालून जे अधिकारी विद्यार्थ्यांना देय असलेल्या सोयी-सुविधा पासून त्यांना वंचित ठेवण्याचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या प्रयत्न करताना आढळल्यास त्यांच्यावर त्वरित कारवाई करावी, अशा प्रकरणी केलेल्या कारवाईची माहिती समितीला देण्यात यावी. अशी समिती शिफारस करीत आहे.

वसतिगृहातील मुलामुलींच्या अंदाजित सरासरी खर्चामध्ये मुलांसाठी ४१११ रुपये व मुलींसाठी ३७९४ रुपये असा फरक असल्याने अशी तफावत ठेवणे योग्य नाही. मुलामुलींच्या आहाराचे मोजमाप करून मुले व मुली यांच्या भोजनामध्ये फरक ठेवणे बरोबर नसल्याने मुलामुलींचे आहाराचे प्रमाण समान ठेवावे. मुले व मुली दोघांचा सरासरी खर्च समान ठेवण्यात यावा. असे समितीचे मत आहे.

याबाबत संबंधितांनी लक्ष घालून विद्यार्थ्यांना "मागासवर्गीय वसतिगृहाच्या दुरावस्थेच्या संदर्भात" शासनाने नियुक्त केलेल्या समितीने केलेल्या शिफारशीनुसार योग्य त्या सोयी-सुविधा पुरविण्याबाबत कार्यवाही करावी, अशी समिती शिफारस करीत आहे.

(ब) जात वैधता प्रमाणपत्र

समितीने नाशिक विभागीय समाजकल्याण कार्यालयातंर्गत असलेल्या समाजकल्याण विभागात जात पडताळणी संदर्भात एकूण किती प्रकरणे प्रलंबित आहेत. याकरिता दिनांक १७ जानेवारी २०११ रोजी संबंधित अधिकारी यांच्याकडून माहिती जाणून घेण्यासाठी त्यांची साक्ष घेतली.

समितीने सन २००७-२००८, २००८-२००९ आणि २००९ ते मार्च २०१० पर्यंत जात पडताळणीची एकूण किती प्रकरणे प्राप्त झाली तसेच राजकीय, शैक्षणिक आणि नोकरी संबंधातील किती प्रकरणे जात पडताळणी समितीकडे प्राप्त झालेली आहेत यासंबंधीची माहिती विचारली असता, विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी जात पडताळणी समिती यांनी राजकीय, शैक्षणिक आणि नोकरीसंबंधी एकूण १२८८० प्रकरणे प्राप्त झाली. त्यापैकी १०३०२ प्रकरणे निकाली निघालेली आहेत. सद्यःस्थितीत २५५८ प्रकरणे प्रलंबित आहेत. दोन-तीन महिन्यामध्ये ही सर्व प्रकरणे निकाली निघतील. जात पडताळणीच्या प्रकरणांमध्ये अतिशय दक्ष राहून निर्णय घ्यावा लागत असल्याने या प्रकरणी वेळ लागत असल्याचे स्पष्ट केले. समितीने नाशिक जिल्ह्यांमध्ये हिंदू खाटीक समाज मोठ्या प्रमाणावर आहे. या समाजाची जात पडताळणीची अनेक प्रकरणे जात पडताळणी समितीकडे प्रलंबित आहेत. हिंदू खाटीक समाजाच्या संदर्भात शासनाने जे गॅझेट प्रसिध्द केलेले आहे त्यामध्ये खाटीक समाजाची सांबरे, बागडे, चंदेल, भिलोरे, परेवाल, चवळे, नावरे, भुरे अशी

आडनावे आहेत. या ठिकाणी नोकरी धंद्याच्या निमित्ताने खाटीक समाजाचे लोक आले, त्यांना परदेशी म्हणून संबोधले जाऊ लागले आणि त्यांचे आडनाव परदेशी झाले. खरे तर त्यांची मूळ आडनावे, सांबरे, बागडे, चंदेल, भिलोरे, परेवाल, चवळे अशीच आहेत. या हिंदू खाटीक समाजातील लोकांची अनेक प्रकरणे प्रलंबित आहेत. येत्या ८-१० दिवसांमध्ये एक विशेष बैठक घेऊन हिंदू खाटीक समाजाची प्रलंबित प्रकरणे निकाली काढावीत अशी सूचना केली. कास्ट-ट्राईब संबंधातील पुस्तकामध्ये हिंदू-खाटीकची व्याख्या दिलेली आहे. जे कातडी कमावतात आणि विकतात ते खाटीक अशी " खाटीक " ची व्याख्या आहे, अशी समितीने सूचना केली असता, विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी अशी ग्वाही दिली की, हिंदू खाटीक समाजातील काही लोकांची नोंद धनगर अशी झालेली आहे. धनगर जातीचा भटक्या जमातीमध्ये समावेश झालेला आहे. भटक्या जमातीचा समावेश अनुसूचित जातीमध्ये होत नाही अन्य जमातीमधील लोकांची अनुसूचित जातीमध्ये इन्क्रोचमेण्ट होऊ नये याची दक्षता घ्यावी लागते. दक्षता पोलीस गावामध्ये जाऊन शहानिशा करतात. धनगर समाजातील व्यक्तीला अनुसूचित जातीचा लाभ देणे चुकीचे आहे. धनगर-खाटीक अशी नोंद असलेल्या प्रकरणी जात पडताळणी समितीने दिलेला निर्णय हायकोर्टाने देखील ग्राह्य धरलेला आहे.

समितीने जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करण्याच्या संदर्भात शासनाने वेळोवेळी परिपत्रके काढलेली आहेत. निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारास निवडणुकीच्या नंतर निवडून आल्यानंतर जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करण्यास सांगितलेले होते. आता तर जात पडताळणी प्रमाणपत्र सादर केल्या शिवाय उमेदवारास निवडणुकीचा फॉर्म भरता येत नाही. जात प्रमाणपत्र पडताळणीचे निकष आता सुटसुटीत करून ठेवलेले आहेत. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये अनुसूचित जातीचे २ लाखा पेक्षा जास्त अर्ज प्रलंबित आहेत. जात पडताळणी करताना वेगवेगळ्या त्रुट्या काढल्या जातात. एका त्रुटीचा दर, दोन त्रुटीचा दर ठरलेला आहे असे सांगितले जाते, हा फार संवेदनशील विषय आहे. जात पडताळणीच्या अर्जांना क्रमांक दिले जात नाहीत. काहींची प्रकरणे एक-दोन दिवसात निकाली निघतात तर काही प्रकरणे ही वर्षानूवर्षे प्रलंबित आहेत. आर्थिक व्यवहार केल्या शिवाय प्रकरणे निकाली निघत नाहीत, असे समितीच्या निदर्शनास आले असल्याने याबाबत कोणी संशयित आढळल्यास त्यावर कारवाई करण्यात यावी, असे समितीने निर्देश दिले.

विभागीय सचिवांची साक्षः-

समितीने नाशिक येथील विभागीय समाजकल्याण कार्यालयास दिलेल्या भेटीच्या वेळी समितीला आश्वासित केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीची माहिती जाणून घेण्यासाठी विभागीय सचिवांची साक्ष दिनांक २३ जानेवारी, २०१३ रोजी घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने जात पडताळणी समिती संदर्भातील स्थिती काय आहे ? अशी विचारणा केली असता संशोधन अधिकारी, जात पडताळणी समिती,

नाशिक यांनी जात पडताळणी समितीने सन २००७ ते सन २०१० पर्यंतच्या प्रलंबित असलेल्या २५५८ प्रकरणांच्या संदर्भातील कार्यवाही पूर्ण केली आहे. २५५८ प्रकरणांपैकी ८४० प्रकरणे शैक्षणिक कारणांशी संबंधित असल्याचे सांगितले तसेच विभागीय प्रतिनिधी यांनी या संदर्भात मोहिम घेतली होती. त्यामुळे एवढ्या प्रकरणांचा निपटारा झाला आहे. शासनाने जात पडताळणी समितीसाठी १५ पदे मंजूर केली आहेत, जी ॲडिशनल कलेक्टर रँकची पदे आहेत. आतापर्यंत राज्यात १ लाख ८१ हजार जात पडताळणीची प्रकरणे प्रलंबित आहेत. शासनाने जात पडताळणी समितीसाठी राज्यात मंजूर केलेल्या १५ पदांपैकी १२ पदे रिक्त आहेत. या संदर्भात शासनाला विनंती केली आहे. महसूल खात्यांकडून देखील या संदर्भातील नस्ती सादर झाली आहे. यथावकाश या संदर्भात निर्णय होईल. समितीमार्फत या संदर्भात शिफारस करण्यात यावी. जेणेकरून ही बाब लवकर मार्गी लागेल. जात पडताळणी प्रमाणपत्रावर सही करायला देखील अध्यक्ष नाहीत. महसूल विभागाचे अधिकारी थांबत नाहीत. आदिवासी विकास विभागाकडे त्यांची समिती आहे, तेथे सर्व आदिवासी विकास विभागाचे अधिकारी आहेत. सिलेक्शन ग्रेड जॉईंट सेक्रेटरी रँकचे ॲडिशनल कलेक्टर दीड-दोन वर्षात आयएएसला जातात. त्यांना लगेच आयएएस होण्याचे वेध लागतात. त्यामुळे त्यांना जिल्हा परिषद सीईओ हे पद ॲडव्हान्समध्ये दिले जाते. त्यामुळे पदे रिक्त राहण्याचे प्रमाण वाढते. या संदर्भात ॲण्टी करप्शन ब्युरोला ज्याप्रमाणे एक स्टेप अहेड वेतनश्रेणी देऊन दर्जा वाढवून दिला जातो. त्याप्रमाणे जात पडताळणी काम करणाऱ्यालाही एक स्टेप आहे. वेतनश्रेणी देऊन त्यांचा दर्जा वाढवावा. उच्च न्यायालयाचे आदेश असल्यामुळे त्यांच्या दर्जापेक्षा कमी दर्जाच्या अधिकाऱ्यांना हे काम देणे शक्य नाही. त्यामुळे अधिकाऱ्यांचा दर्जा वाढवूनच हे काम होऊ शकेल. सिलेक्शन ग्रेड जॉईंट सेक्रेटरी रँकचे अधिकारी पाहिजेत. राज्यात सध्या फक्त ३ अधिकारी काम करीत आहेत. त्यांना जागेवर देखील बसता येत नाही, अशी स्थिती आहे. या संदर्भात शासनाकडे मागणी केली असल्याचे स्पष्ट केले.

अभिप्राय व शिफारशीः-

नाशिक विभागीय समाजकल्याण विभागांतर्गत असलेल्या प्रादेशिक विभागातील जात प्रमाणपत्राचे पडताळणीची सन २००७ ते २०१० पर्यंतची प्रलंबित असलेल्या २५५८ प्रकरणांचा निपटारा झाला आहे. आतापर्यंत राज्यात १ लाख ८१ हजार जात प्रमाणपत्राची पडताळणीची प्रकरणे प्रलंबित असल्याचे दिलेल्या माहितीत समितीला दिसून आले. राज्यात अलीकडे जातीची बनावट प्रमाणपत्रे सादर करून अभ्यासक्रमासाठी प्रवेशाकरिता तसेच नोकरीमध्ये अनुसूचित जातीच्या उमेदवारांसाठी राखीव असलेल्या जागा बळकावण्याचे प्रकार निदर्शनास येत असून या बाबीकडे विभागाचे दुर्लक्ष होत असल्याचे समितीचे मत आहे.

नाशिक जिल्ह्यामध्ये हिंदू खाटीक समाज मोठ्या प्रमाणावर आहे या समाजाची जात पडताळणीची अनेक प्रकरणे जात पडताळणी समितीकडे प्रलंबित आहेत. नोकरीच्या निमित्त्याने खाटीक समाजाचे लोक इतर ठिकाणी स्थलांतरीत होऊ लागल्याने त्यांना परदेशी संबोधण्यात येत आहे. हिंदू खाटीक समाजाच्या संदर्भात शासनाने प्रसिद्ध केलेल्या गॅझेट मध्ये सांबरे, बागडे, चंदेल, भिलोरे, परेवाल, चवळे, नावरे, भुरे अशी एकूण

८४ गोत्र नावाचे समावेश आहे. ह्यातील बऱ्याचशा लोकांनी परदेशी हे आडनाव धारण केलेले आहे. ह्या लोकांची गोत्रनावाची शहानिशा करून जात वैधता प्रमाणपत्रे देण्यासंदर्भात योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. तसेच काही ठिकाणी धनगर खाटीक अशी जात लावून अनुसूचित जातीत समाविष्ट होण्याचा प्रयत्न केलेला असून त्याबाबत उच्च न्यायालयाने मनाई केली आहे. सबब, नाशिक जिल्ह्यातील धनगर खाटीक या समाजातील लोकांची योग्य त्या यंत्रणेमार्फत शहानिशा करण्यात यावी व ते जर अनुसूचित जातीत मोडत असतील तर अशांना तातडीने जात वैधता प्रमाणपत्रे देण्यात यावी, अशी समिती शिफारस करीत आहे.

शासनाने जात प्रमाणपत्राच्या पडताळणीचे निकष सुटसुटीत केले असताना देखील जात पडताळणी करताना त्यामध्ये वेगवेगळ्या त्रुटी जात पडताळणी कार्यालयांकडून काढल्या जातात. अशा त्रुटी काढून संबंधित जात प्रमाणपत्र धारकास वेठीला धरून त्यांच्याकडून त्रुटी निहाय विशिष्ट दर आकारण्यात येत असल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे काही जात पडताळणी अर्जाना क्रमांक दिले जात नाहीत. काहींची प्रकरणे एक-दोन दिवसात निकाली काढण्यात येतात तर काही प्रकरणे वर्षानुवर्षे प्रलंबित आहेत, अशा प्रकारच्या अनियमितता दिसून येतात. आर्थिक व्यवहार झाल्याशिवाय प्रकरणे निकाली निघत नाहीत, अशी अनेक लोकांची तक्रार असते. त्यामुळे याबाबत समाजकल्याण अधिकाऱ्यांनी लक्ष घालून कोणी संशयित आढळल्यास त्यावर कारवाई करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस देण्यात यावी व जात प्रमाणपत्र पडताळणीची प्रकरणे तातडीने निकाली काढावी, अशी समिती शिफारस करीत आहे.

शासनाने जात प्रमाणपत्र पडताळणी समितीसाठी एकूण मंजूर केलेल्या १५ पदांपैकी १२ पदे रिक्त आहेत त्यामुळे यासंदर्भात शासनाला तसेच महसूल खात्याला नस्ती सादर करूनही सदरची पदे भरती करण्याकडे शासनाचे दुर्लक्ष होत आहे. मागासवर्गीयांच्या जात पडताळणीची प्रकरणे वर्षानुवर्षे प्रलंबित रहात असल्याने याप्रकरणी शासनाने लक्ष घालून जात पडताळणी समितीसाठी राज्यात मंजूर असलेल्या १५ पदांपैकी रिक्त असलेली १२ पदे तातडीने भरण्याची कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यात सादर करण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.

(क) शासनाच्या धोरणानुसार नाशिक विभागातील प्रत्येक जिल्ह्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनाच्या बांधकामाबाबतः-

समितीने नाशिक येथील विभागीय समाजकल्याण कार्यालयास दिनांक १७ जानेवारी, २०११ रोजी भेट देऊन खालील मुद्यासंदर्भात तेथील संबंधित अधिकाऱ्यांची खालील विषयासंदर्भात साक्ष घेतली.

समितीने नाशिक विभागातील प्रत्येक जिल्ह्यातील आंबेडकर भवनची सद्यःस्थिती काय आहे, धुळे जिल्ह्यातील आंबेडकर भवनाचे बांधकाम करण्याचा दृष्टीने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रसीमेमधील जागेची सद्यःस्थिती काय आहे, अशी विचारणा केली असता, विभागीय समाजकल्याण अधिकारी यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या पलिकडील जागेची निवड करण्यात आली होती. ती जागा रद्द करून

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रसीमेमधील जागा द्यायचे ठरले होते. अशी माहिती दिली. त्यावर समितीने तत्कालीन जिल्हाधिकारी यांनी तो प्रस्ताव मान्य केला होता. १२ एकर जागा मिळविली, त्याबाबतही त्रुटी काढण्यात आल्या. १०० कोटी रुपये खर्च करण्याचे ठरविले होते. तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांनी जो निर्णय घेतला तो प्रस्ताव तुम्ही पुढे आणावा, अशी सूचना केली असता, विभागीय समाजकल्याण अधिकारी यांनी जिल्हाधिकारी, कार्यालया मागील जागा पाहिली आहे. परंतु पाटबंधारे विभागाने ती जागा पूररेषेत येत असल्याने त्याबाबत देखील अडचण निर्माण झाली आहे. नाशिक विभागामध्ये धुळे वगळता पाच ठिकाणी भवन तयार आहे. नाशिक, नंदूरबार व जळगाव येथील भवन सुरू झाले असल्याचे स्पष्ट केले.

विभागीय सचिवांची साक्ष

शासनाच्या धोरणाप्रमाणे प्रत्येक जिल्ह्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन बांधण्यात यावे त्यानुसार नाशिक विभागातील प्रत्येक जिल्ह्यात भवनाच्या बांधकामासंदर्भात विभागीय समाजकल्याण कार्यालय, नाशिक येथे भेट देऊन तेथील संबंधित अधिकाऱ्यांची साक्ष घेतली. त्यावेळी उपस्थित झालेल्या मुद्यासंदर्भात माहिती जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक २३ जानेवारी, २०१३ रोजी संबंधित विभागीय सचिवांची साक्ष घेतली.

साक्षीच्या वेळी समितीने शासनाच्या धोरणाप्रमाणे प्रत्येक जिल्ह्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन बांधण्यात यावे त्यानुसार नाशिक विभागातील प्रत्येक जिल्ह्यात तसेच राज्यातील अनेक जिल्ह्यात सामाजिक न्याय विभागाने किती भवने बांधलेली आहेत. परंतु, अनेक भवनांची बांधकामे पूर्ण झाली असून त्यांची उद्घाटने झालेली नाहीत याची यादी समितीला देण्यात यावी, त्यावर विभागीय प्रतिनिधी यांनी एकूण ३३ जिल्ह्यांमध्ये आंबेडकर भवनांची कामे सुरू केली आहेत. ३३ पैकी १९ आंबेडकर भवनाचे कामे पूर्ण झालेली आहेत. तसेच २ ठिकाणी अजून जागा मिळालेली आहे. ४ ठिकाणी जागा आहे, पण भवनाचे बांधकाम सुरू झालेले नाही, अशी समितीला माहिती दिली. त्यावर समितीने १९ आंबेडकर भवनाचे उद्घाटने झाली आहेत का, असे विचारले असता, विभागीय प्रतिनिधी यांनी समितीने १८ आंबेडकर भवनाचे कामे पूर्ण झालेली आहेत, असे उत्तर दिले. यासंदर्भात समितीने आक्षेप घेऊन अशा प्रकारे उत्तरे देऊन समितीची दिशाभूल करण्याचा प्रयत्न संबंधित अधिकाऱ्यांनी करू नये. १९ ठिकाणी आंबेडकर भवनाची कामे झालेली आहेत, असे आताच संबंधित अधिकाऱ्यांनी उत्तर दिलेले असून, ती कोणत्या जिल्ह्यात झालेली आहेत तसेच प्रत्येक भवनाकरिता किती खर्च करण्याचे अपेक्षित आहे, याची माहिती समितीला द्यावी. यावर विभागीय प्रतिनिधी यांनी सामाजिक न्याय भवनाची प्रत्येकी किंमत ४ कोटी २४ लाख रुपये इतकी आहे. तथापि, किती आंबेडकर भवनाची कामे पूर्ण झाली याची माहिती सद्यः स्थितीत नसल्याने याची बिनचूक यादी समितीला नंतर दिली जाईल. प्रत्येक जिल्ह्यात शासनाच्या धोरणाप्रमाणे आंबेडकर भवन याप्रमाणे किती जिल्ह्यात भवन मंजूर झालेली आहेत, यापैकी किती पूर्ण झालेली आहेत याची इत्यंभूत माहिती समितीला देण्यात यावी, असे समितीने निर्देश दिले. समितीने पुढे अशी विचारणा केली की, मागासवर्गीयांसाठी असणारी वसतिगृहे आजही भाडयाच्या जागेवर का सुरू आहेत.

शासनाची स्वतःची इमारत असताना सुध्दा अजूनपर्यंत त्याचे स्थलांतर का झालेले नाही, त्यावर समितीला कोणतेही उत्तर देण्यात आले नाही. समितीने हातकणंगले तालुक्यातील वसतिगृहाचे बांधकाम पूर्ण झाले असून त्यास कंम्पाऊंड केलेले नसल्यामुळे सुरक्षिततेच्या कारणास्तव अजून ते स्थलांतरित केलेले नाही. असे अभिप्राय व्यक्त करून यासंदर्भात सद्यःस्थितीची माहिती घेऊन ती समितीला अवगत करावी, असे निर्देश दिले.

अकोला व धुळे येथील आंबडेकर भवन संदर्भात समितीला विभागीय प्रतिनिधीमार्फत असा खुलासा करण्यात आला की, अकोला येथे आंबेडकर भवन बांधण्यासाठी गृह विभाग जागा देण्यास तयार आहे. त्या ठिकाणी विभागाने सर्व्हे देखील केलेला आहे. यासंदर्भात समाजकल्याण विभागाच्या अधिकाऱ्यांनी रिपोर्ट दिलेला आहे. धुळे येथे देखील आंबडेकर भवन बांधण्यासाठी जागा मिळालेली असून राज्यातील बहुतांश प्रकल्प शासनस्तरावर मंजुरीसाठी प्रलंबित आहेत, उर्वरित जागांचा बहुतांशी प्रश्न सुटलेला आहे. धुळे येथील आंबेडकर भवनाच्या संबंधात बैठक झाली असून लोकांची संख्या, व्हिजिटर इत्यादी सर्व बाबी तपासून प्रस्ताव तयार करण्यात आला असून टेंडर प्रोसेसमध्ये आहे. आंबेडकर भवनामध्ये महामंडळ, सामाजिक न्याय विभाग, जात पडताळणी समिती इत्यादी शासकीय कार्यालये येणार आहेत. त्यामुळे त्यांच्या कार्यालयीन उपयोगासाठी फर्निचरचा उपयोग करण्यात येणार असल्याबाबत समितीला माहिती दिली.

अभिप्राय व शिफारशी

शासनाच्या धोरणाप्रमाणे राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन बांधण्याच्या निर्णयानुसार एकूण ३३ पैकी १९ आंबेडेकर भवनाची कामे पूर्ण झाली आहेत. उर्वरित १४ आंबेडकर भवनाच्या बांधकामाकरिता जागा प्रस्तावित असून बहुतांश प्रकल्प शासन स्तरावर प्रलंबित असणे. यासंबंधीची यादी देण्याबाबत समितीला आश्वासित केल्याप्रमाणे माहिती न देणे. तसेच ज्या भवनाची बांधकामे पुर्ण झाली आहेत, अशी बांधकामे पुर्ण झालेल्या भवनाची उद्घाटने झाली आहेत का, या प्रश्नाचे साक्षीच्यावेळी कोणतेही उत्तर देण्यात न येणे. यावरून समितीच्या असे निदर्शनास आले की, शासनाचे कोट्यवधी रुपये खर्च करून बांधण्यात आलेल्या बऱ्याचशा आंबेडकर भवनाची कामे पूर्ण होऊनही त्यांचा वापर वेळीच होत नसल्याने तशीच पडून आहेत. राज्यात प्रत्येक जिल्ह्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन बांधून पूर्ण झाल्यास सदर भवन तीन इमारतींमध्ये विभागून त्यापैकी मध्य भागातील इमारत ही सांस्कृतिक सभागृहाकरिता व एका इमारती मध्ये सामाजिक न्याय विभागामार्फत असणारी सर्व महामंडळे, सामाजिक न्याय जिल्हा कार्यालय, जात प्रमाण पडताळणी कार्यालय व इतर प्रशासकीय कार्यालय आणि दुसऱ्या इमारतीमध्ये वाचनालय, संगणक केंद्र, सभागृह, सायबर कॅफे, कला दालन, प्रदर्शनीय दालन तसेच सांस्कृतिक कार्यक्रमासाठी असल्यामुळे मागासवर्गीयांना शासकीय कामे एकाच ठिकाणी करणे सोईचे होणार आहे. तथापि, आंबडेकर भवनाची कामे तातडीने पूर्ण करण्याच्या दृष्टीने कोणतेही प्रयत्न केले जात नाहीत, असे समितीच्या निदर्शनास आले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनाची कामे अपूर्ण असल्याने मागासवर्गीयांना शासकीय कामानिमित्त दूरदूरवर फिरावे लागत आहे. त्यामुळे मागासवर्गीयांना मिळणाऱ्या सोयी सुविधांपासून त्यांना वंचित राहावे लागत असल्याने समिती तीव्र नाराजी व्यक्त करीत आहे. तरी या प्रकरणी शासनाने लक्ष घालून शासन स्तरावर प्रलंबित असलेल्या उर्वरित १४ आंबेडकर भवनाच्या बांधकामाकरिता प्रस्तावित जागेस मान्यता देऊन मागासवर्गीय लोकांच्या सोयी करिता आंबेडकर भवनाची कामे प्रत्येक जिल्ह्यात पुर्ण करून तातडीने उपलब्ध करून देण्यात यावीत व बांधकाम पूर्ण झालेल्या इमारतीत तातडीने कामकाज सुरू करण्याबाबत शासनाने कार्यवाही करावी आणि केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला देण्यात यावी, अशी शिफारस समिती करीत आहे.

(३) आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक

सेवाप्रवेश नियमावलीप्रमाणे अनुसूचित जाती करीता राखीव असलेल्या पदांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष :-

समितीने आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक यांच्याकडून अनुसूचित जातीच्या उमेदवारांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष यासंदर्भात खालील मुद्यांवर माहिती मागविली.

नाशिक येथील आदिवासी विकास आयुक्तालयातंर्गत येणाऱ्या विभागांमध्ये तांत्रिक/अतांत्रिक स्वरुपाची वर्ग अ ते ड मधील एकूण किती पदे मंजूर आहेत त्यापैकी अनुसूचित जातीच्या उमेदवारासाठी राखीव असलेली किती पदे प्रत्यक्षात भरण्यात आलेली आहे व अद्याप किती पदे रिक्त आहेत. पदे रिक्त असण्याची कारणे काय आहे व रिक्त पदे भरण्याची आतापर्यंत कोणते प्रयत्न करण्यात आलेले आहेत, तसेच अनुसूचित जातीच्या उमेदवारांसाठी राखीव असलेल्या वर्ग अ ते ड मधील तांत्रिक व अतांत्रिक पदे सरळसेवा भरतीद्वारे व पदोन्नतीने भरतांना शासनाने विहित केलेल्या टक्केवारीचे प्रमाण किती आहे व टक्केवारीनुसार पदे भरण्यात आली आहेत काय.

उपरोक्त मुद्यासंदर्भात आदिवासी विकास आयुक्ताल नाशिक यांनी पुढीलप्रमाणे माहिती दिली.

आदिवासी विकास विभागातंर्गत तांत्रिक स्वरुपाची पदे मंजूर नाहीत. सर्व पदे ही अतांत्रिक स्वरुपाची आहेत.

आदिवासी विकास विभागाचे नाशिक/ठाणे/अमरावती व नागपूर हे ४ विभाग आहेत. या प्रत्येक विभागात अपर आयुक्त आदिवासी विकास हे नियंत्रक अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. अपर आयुक्त यांस गट क मधील पद भरतीचा अधिकार देण्यात आलेला आहे. सदर अपर आयुक्तांच्या अधिनस्त प्रकल्प अधिकारी कार्यरत आहेत. त्यांना गट ड मधील पद भरतीचा अधिकार देण्यात आलेला आहे. या व्यतिरिक्त गट अ व ब मधील पद भरतीचा अधिकार शासनास आहे.

आजमितीस खालीलप्रमाणे अपर आयुक्त निहाय अ ते ड अंतर्गत मंजूर भरलेल्या रिक्त पदांचा तपशील

अ.क्र.	विभागाचे नांव	संवर्ग	एकूण मंजूर पदे	एकूण भरलेली पद	रिक्त पदे	अनु. जाती साठी राखीव पदे	अन.जाती ची भरलेली पदे	अनु. जाती ची भरण्यात न आलेली पदे	शेरा
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)	(९)	(१०)
१	नाशिक	अ	२१	०९	१२	०	०	०	गट अ व ब
		ब	४७	२५	२२	०	०	०	ची अनु.जाती
		क	३९८३	२७६६	१२१७	५२१	२६२	२५९	आरक्षणाची
		ड	३६१७	२७०३	९१४	५८८	४११	१७७	माहिती शासनाकडून प्राप्त करून समितीस सादर करण्यात येईल.

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)	(९)	(१०)
२	ठाणे	अ	११	११	००	०	०	०	
		ब	२१	१०	११	०	०	०	
		क	२१७४	१९०९	२६५	२७३	२५०	२३	
		ड	१८९९	१६०१	२९८	२१५	१९५	२०	
३	अमरावती	अ	१०	९	१	०	०	०	
		ब	२३	८	१५	०	०	०	
		क	१९२५	१६४३	२८२	२४०	२०८	३२	
		ड	१७७०	१२११	५५९	३३६	२१०	१२६	
४	नागपूर	अ	१२	९	३	०	०	०	
		ब	२७	१३	१४	०	०	०	
		क	१९५३	१४८८	४६५	२५२	१९३	५९	
		ड	१६०५	१४१५	१९०	१९३	१६४	२९	
५	एकूण	अ	५४	३८	१६	०	०	०	
		ब	११८	५६	६२	०	०	०	
		क	१००३५	७८०६	२२२९	१२८६	९१३	३७३	
		ड	८८९१	६९३०	१९३१	१३३२	९८०	३५२	
	एकूण		१९०९८	१४८३०	४२६८	२६१८	१८९३	७२५	

आजमितीस राज्यात वरीलप्रमाणे ४२६८ रिक्त पदे आहेत. सदर पद भरती बाबत अपर आयुक्त व प्रकल्प अधिकारी यांस निर्देश देण्यात आलेले आहेत. त्यांचेकडून भरतीची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. तुर्तास वित्त विभाग शासन निर्णय, दिनांक ५ जून २०१० अन्वये एक वर्षाकरिता शिक्षक व्यतिरिक्त अन्य पद भरतीस स्थगिती आहे. त्यामुळे सदर पदांची भरती स्थगिती नंतर करण्यास येईल. त्यामध्ये अनुसूचित जातीसाठी असलेला अनुशेष प्राधान्याने भरण्यात येईल. सद्यस्थितीत शिक्षक संवर्ग पदे भरतीची कार्यवाही करण्यात येत आहे. त्यामध्ये देखील अनुसूचित जातीसाठी असलेला अनुशेष प्राधान्याने भरण्यात येईल. शासन स्तरावरून गट अ मधील १६ पदे भरण्यासाठी पदोन्नती समितीच्या संवर्ग निहाय बैठका झालेल्या आहेत. व गट ब मधील २६ पदे भरण्यासाठी विभागा मार्फत पदोन्नती समिती बैठक घेण्यात आली असून त्यानुसार पदोन्नती बाबत पुढील कार्यवाही सुरू आहे. तसेच गट ब मधील २८ पदे सरळसेवेने भरण्याबाबत महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत मुलाखत घेण्यात आलेली असून अल्पावधीतच अंतीम निवड सूची प्राप्त होणे अपेक्षित आहे. सदर गट अ व ब मधील पद भरती बाबत करण्यात आलेल्या सदर कार्यवाहीत अनुसूचित जातीच्या उमेदवारांचे विहित आरक्षण विचारात घेण्यात आलेले आहे.

सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय, दिनांक १८ऑक्टोबर १९९७ व दिनांक २३ मार्च १९९७ अन्वये सर्व मागासवर्गीय व सर्वसाधारण उमेदवारांसाठी आरक्षण निश्चित करण्यात आलेले आहे. त्यापैकी अनुसूचित जातीसाठी सर्व पदांकरिता १३% हे प्रमाण निश्चित करण्यात आलेले आहे त्याप्रमाणे आदिवासी विकास विभागाचे वरील सर्व नियुक्ती अधिकारी नियुक्तीची कार्यवाही करत आहेत.

आजतागायत विभागामध्ये असलेल्या एकूण १९०९८ मंजूर पदांपैकी अनुसूचित जातीसाठी २६१८ पदे राखीव ठेवण्यात आली असून त्यापैकी अनुसूचित जातीची १८९३ पदे भरण्यात आली आहेत. तसेच ७२५ पदे रिक्त आहेत. सदर रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही सुरू आहे. त्यानुसार अनुसूचित जातीची ७२५ रिक्त पदे भरण्यात येतील.

समितीला प्राप्त झालेल्या उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक १७ जानेवारी २०११ रोजी नाशिक येथील आदिवासी विकास आयुक्तालयास भेट देऊन तेथील संबंधित अधिकाऱ्यांची साक्ष घेतली.

सदर साक्षीच्या वेळी समितीला सहायक आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय यांनी उपरोक्त मुद्यासंदर्भात अशी माहिती दिली की, आदिवासी विकास विभागाचे नाशिक, ठाणे, अमरावती व नागपूर असे ४ प्रादेशिक विभाग आहेत. या चारही विभागामध्ये २४ एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालये आहेत. आदिवासी विकास आयुक्तालयांतर्गत येणाऱ्या प्रादेशिक विभागात "क" आणि "ड" वर्गातील एकूण मंजूर पदे १८९२६ असून १४७३६ पदे भरलेली आहेत. ४१९० पदे रिक्त आहेत. अनुसूचित जातीसाठी २६१८ पदे राखीव आहेत. त्यापैकी १८९३ पदे भरलेली असून ७२५ पदांचा अनुशेष आहे. नाशिक विभागामध्ये वर्ग "क" आणि "ड" मधील पदांचा अनुशेष ४३६ आहे. ठाणे विभागामध्ये ४३ पदांचा, अमरावती विभागामध्ये १५८ पदांचा आणि नागपूर विभागामध्ये ८८ पदांचा अनुशेष आहे. आदिवासी विभागातील वर्ग-अ आणि वर्ग-ब ची पदे शासन स्तरावरून भरली जातात. वर्ग "क" मधील पदे भरण्याचे अधिकार अपर आयुक्तांना दिलेले आहेत आणि वर्ग "ड" मधील पदे भरण्याचे अधिकार प्रकल्प अधिकाऱ्यांना दिलेले आहेत.

वर्ग "अ" आणि "ब" मधील ५० टक्के पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आणि ५० टक्के पदे विभागाच्या पदोन्नती समिती मार्फत भरली जातात. "क" वर्गातील ५० टक्के पदे विभागाच्या प्रादेशिक निवड समिती मार्फत आणि ५० टक्के विभागाच्या प्रादेशिक पदोन्नती समिती मार्फत भरली जातात. वर्ग "ड" मधील शंभर टक्के पदे विभागाच्या प्रकल्पस्तरीय निवड समिती मार्फत भरली जातात.

पदोन्नतीची साखळी - अधिकारी संवर्गात वर्ग-२ ते वर्ग-१ (श्रेणी २), वर्ग-१ (श्रेणी २) ते वर्ग-१ (श्रेणी १), वर्ग-१ (श्रेणी १) ते सहआयुक्त, कार्यालयीन संवर्गात कनिष्ठ लिपिक ते वरिष्ठ लिपिक, वरिष्ठ लिपिक ते उपलेखापाल/आदिवासी विकास निरीक्षक, उपलेखापाल/आदिवासी विकास निरीक्षक ते कार्यालय अधीक्षक, कार्यालय अधीक्षक/गृहपाल ते वर्ग-२ अधिकारी तसेच आश्रमशाळा संवर्गात एसएससी पास असलेल्या वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांमधून कनिष्ठ लिपिक, प्राथमिक शिक्षक मधून माध्यमिक शिक्षक/ पदवीधर प्राथमिक शिक्षक/प्राथमिक मुख्याध्यापक/केंद्रप्रमुख पदवीधर प्राथमिक शिक्षक ते शिक्षण विस्तार अधिकारी/माध्यमिक शिक्षक माध्यमिक शिक्षक ते माध्यमिक मुख्याध्यापक/ सहायक प्रकल्प अधिकारी (शिक्षण) याप्रमाणे पदोन्नतीची साखळी आहे.

वर्ग-१ व वर्ग-२ पदांवर पदोन्नती देण्यासाठी पदोन्नती समितीच्या बैठका घेण्यात आलेल्या आहेत. पदोन्नतीची कार्यवाही शासनाकडून लवकरच अपेक्षित आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून वर्ग-२ पदांवर २८ उमेदवारांची नामनिर्देशनाने निवड झालेली आहे. पदस्थापनेची प्रक्रिया सुरू आहे. त्यामध्ये अनुसूचित जातीच्या ४ उमेदवारांचा समावेश आहे. वर्ग-३ मध्ये केवळ शिक्षण संवर्गातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही अपर आयुक्तांमार्फत करण्यात येत आहे. तसेच वर्ग-४ ची रिक्तपदे भरण्याची कार्यवाही फक्त गडचिरोली जिल्ह्यातील प्रकल्प अधिकारी यांच्याकडून करण्यात येत आहे. या भरती प्रक्रियेमध्ये अनुसूचित जातीचा अनुशेष भरला जाईल. दिनांक ५ जून २०१० च्या शासन निर्णयानुसार शिक्षक संवर्ग वगळता अन्य पदांच्या भरतीस स्थगिती देण्यात आलेली आहे.

सन २००५-०६ मध्ये वर्ग-२ च्या ११ अधिकाऱ्यांना वर्ग-१ पदावर तदर्थ पदोन्नती देण्यात आली आहे. त्यामध्ये अनुसूचित जातीचे २ उमेदवार आहेत. सन २००६-०७ मध्ये वर्ग ३ च्या २२ कर्मचाऱ्यांना वर्ग-२ पदावर तदर्थ पदोन्नती देण्यात आली आहे. त्यामध्ये अनुसूचित जातीचे ५ उमेदवार आहेत. तसेच सन २०१०-११ मध्ये वर्ग-३ मधून २४ उमेदवारांना वर्ग-२ पदावर पदोन्नती देण्यासाठी पदोन्नती समितीची बैठक घेण्यात आली आहे. यामध्ये अनुसूचित जातीचे ३ उमेदवार आहेत. तसेच याच बैठकीत वर्ग-१ पदावरून १४ उमेदवारांना वर्ग-१ मधील श्रेणी-१ पदावर पदोन्नती देणे प्रस्तावित आहे. त्यामध्ये अनुसूचित जातीच्या ४ उमेदवारांचा समावेश आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, वर्ग-२ च्या पदांवर २८ उमेदवारांची निवड गुणवत्तेप्रमाणे झालेली आहे काय, गुणवत्तेत आलेल्या मागासवर्गीय उमेदवाराला खुल्या प्रवर्गात दाखविण्यात येते की आरक्षण संवर्गात दाखविण्यात येते, त्यावर उपायुक्त यांनी असा खुलासा केला की, एमपीएससी कडून २८ लोकांची यादी आलेली आहे. पोलीस व्हेरिफिकेशन झाल्यानंतर नियुक्तीचे आदेश निघतील. एकूण ८ मागासवर्गीय उमेदवार आहेत. त्यामधील ४ जणांची खुल्या प्रवर्गातून तर ४ जणांची आरक्षित प्रवर्गातून निवड झालेली आहे, त्यावर समितीने वर्ग-क आणि वर्ग-ड मधील ७२५ पदांचा अनुशेष भरण्यासंबंधी आयुक्तांनी अपर आयुक्त व प्रकल्प अधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत किंवा कसे याबाबत विचारणा केली असता, आयुक्तांनी वर्ग-क ची पदे अपर आयुक्त कार्यालय स्तरावर भरली जातात. राज्यामध्ये ४ ठिकाणी अपर आयुक्त कार्यालये आहेत. त्यांना अनुशेष भरण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. नाशिक मधील अपर आयुक्तांनी पदे भरण्यासंबंधीची जाहिरात दिली होती. परंतु शासनाने त्यास स्थगिती दिल्यामुळे नाशिक विभागाचा अनुशेष भरलेला नव्हता. शिक्षक संवर्गातील पदे भरण्यासंबंधी अपर आयुक्त कार्यालयाकडून जाहिरात दिली जाते. भरतीला स्थगिती दिल्यामुळे अनुशेष भरण्यास अडचण असल्याची माहिती दिली. समितीने पुढे अशी विचारणा केली की, वर्ग-क आणि वर्ग-ड मध्ये अनुसूचित जातीचा एकूण ४३६ पदांचा अनुशेष आहे. ४३६ पैकी शिक्षकांची पदे किती आहेत, त्याबाबत असा खुलासा करण्यात आला की, कनिष्ठ माध्यमिक शिक्षक २२, माध्यमिक शिक्षक ३०, प्राथमिक शिक्षक ७५ आणि पदवीधर प्राथमिक शिक्षक २१ आहेत. (उदा. प्राथमिक शिक्षकांची १२१० पदांपैकी अनुसूचित जातीची १५७, अनुसूचित जमातीची ८५ पदे राखीव होती.) शासनाने अनुसूचित जमातीची ५० टक्के पदे भरावीत असा शासन निर्णय काढला होता. त्यामुळे ५० पदे अनुसूचित जातीची भरली गेली आणि ५४४ पदे अनुसूचित

जमातीची भरली गेली. एकंदरीत २४२ अनुशेषातील पदांच्या बदल्यात ५९४ पदे शिक्षकांची भरली गेली. त्यामुळे अनुशेष निरंक झाला असल्याचे सांगितले. जानेवारी अखेरपर्यंत जाहिरात देऊन दोन ते तीन महिन्यांचा कालावधी शिक्षकांची सर्व पदे भरण्यात येतील, असे समितीला आश्वासित केले. शिक्षकांची पदे रिक्त राहण्याचे कारण म्हणजे महानगरपालिका किंवा नगरपालिकेच्या शाळेत नोकरी मिळाल्यास आदिवासी विकास विभागातील शिक्षक नोकरी सोडून जात असल्याचे समितीला स्पष्ट केले. त्यावर समितीने तीन महिन्यात ही पदे भरण्याची कार्यवाही पूर्ण करावी आणि त्यासंबंधीचा अहवाल समितीला सादर करावा, असे निर्देश दिले.

विभागीय सचिवांची साक्ष :-

नाशिक येथील आदिवासी विकास आयुक्तालय कार्यालयातील अनुसूचित जातीच्या उमेदवारांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेषासंदर्भात तेथील संबंधित अधिकाऱ्यांशी दिनांक १७ जानेवारी, २०११ रोजी साक्ष घेतली होती. त्यावेळी समितीला आश्वासित केलेल्या मुद्यासंदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी दिनांक २४ जानेवारी, २०१३ रोजी विभागीय प्रतिनिधीची साक्ष आयोजित करण्यात आली होती, परंतु बैठकीला आदिवासी विकास विभागाचे प्रधान सचिव काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित नव्हते त्यामुळे समितीने आदिवासी विकास विभागाचे उप सचिवांना सदर बैठकीत माहिती विचारली असता ते समितीला समाधानकारक माहिती देवू न शकल्याने समितीची साक्ष पुढे ढकलण्यात आली.

समितीने सदर मुद्यांबाबत पुन्हा दिनांक २२ मे, २०१३ रोजी आदिवासी विकास आयुक्तालयाशी संबंधित विभागीय सचिवांची साक्ष आयोजित केली. सदर साक्षीच्या वेळी समितीने आदिवासी विकास आयुक्तालयात वर्ग-२ च्या पदावर २८ उमेदवारांची निवड गुणवत्तेप्रमाणे झालेली आहे काय, अशी विचारणा केली असता, विभागीय प्रतिनिधीं यांनी वर्ग-२ च्या पदांवर २८ उमेदवारांची निवड एम.पी.एस.सी.च्या माध्यमातून गुणवत्तेवर केली होती. निवड झालेल्या २८ उमेदवारांपैकी २७ उमेदवार रुजू झाले. उर्वरित एक उमेदवार रुजू झाला नाही. त्या उमेदवाराला संधी देऊन सुध्दा तो रुजू न झाल्यामुळे त्याची उमेदवारी रद्द करण्यात आली, असल्याचे समितीला सांगितले. त्यावर समितीने २७ उमेदवार केव्हा रुजू झाले, यामध्ये अनुसूचित जातीचे किती उमेदवार आहेत, अशी विचारणा केली असता, सचिवांनी २७ उमेदवारांमध्ये अनुसूचित जातीचे ९ उमेदवार आहेत. उपलब्ध माहिती नुसार दि. १५ जुलै, २०११ रोजी १९, दि. ४ नोव्हेंबर, २०११ रोजी ७ आणि दि. २८ जानेवारी, २०१३ रोजी १ अशा प्रकारे २८ पैकी एकूण २७ उमेदवार रुजू झाले आहेत. अन्य एका उमेदवाराला रुजू होण्याची संधी देऊन सुध्दा तो रुजू न झाल्यामुळे त्याची नियुक्ती रद्द केली आहे. आरक्षणाप्रमाणे अनुसूचित जातीचे ४ उमेदवार असायला पाहिजे होते. तथापि अनुसूचित जातीचे एकूण ९ उमेदवार घेतलेले आहेत. त्यापैकी अनुसूचित जातीचे ४ उमेदवार असून ५ उमेदवार खुल्या प्रवर्गातून गुणवत्तेवर आलेले आहेत.

समितीने "क" वर्गात एकूण किती पदे रिक्त आहेत व त्यामध्ये अनुसूचित जाती करिता किती आरक्षित पदे आहेत याचा खुलासा करण्यास सांगितले असता, सचिवांनी "क" वर्गात १६२३ पदे रिक्त असून

अनुसूचित जातीची राखीव पदे १९६ इतकी आहेत, अशी माहिती दिली. त्यावर समितीने अनुसूचित जातीच्या राखीव १९६ पदापैकी किती रिक्त पदे आहेत, यासंदर्भात आपल्याकडे एकंदरीत माहिती अपूर्ण आहे असे समितीला दिसून येत असून वर्ग "क" मध्ये एटीसीनिहाय माहिती देण्याची गरज होती. तसेच वर्ग "ड" मध्ये प्रकल्पनिहाय माहिती देण्याची गरज होती. मंजूर पदांवर आरक्षण निश्चित करण्यात येते. जाहिरातीवर आरक्षण निश्चित करण्यात येत नाही. यावरुन संबंधित अधिकारी समितीला अपेक्षित माहिती देत नाहीत, असे दिसून येते. "क" वर्गात आणि "ड" वर्गात एकूण किती मंजूर पदे आहेत, या प्रश्नाचे उत्तर मिळल्याशिवाय समितीला पुढील कामकाज करता येणार नाही, असे मत समितीने व्यक्त केले. तथापि, यासंदर्भात समितीला कोणतेही उत्तर देण्यात आले नाही. तद्नंतर समितीने मुळ प्रश्नावलीतील ३७३ पदे रिक्त आहेत. ही पदे कधीपर्यंत भरण्यात येतील आणि फेब्रुवारी, २०१३ अखेर ६८० पदांची भरती प्रक्रिया केव्हा पूर्ण होईल. याबाबत समितीस दिलेल्या लेखी माहितीप्रमाणे जाहिरातीनुसार भरली जाणारी एकूण पदे ८७५ असून अनुसूचित जातीची भरली जाणारी पदे १५१ आहेत, असे नमूद केले आहे. अनुसूचित जातीसाठी १३ टक्क्यांचे आरक्षण आहे, या टक्केवारीनुसार ही आकडेवारी बरोबर आहे का, अशी समितीने विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधी यांनी यापूर्वी जी भरती प्रक्रिया झाली, त्यामध्ये ४४१ पदे भरण्यात आली आहेत. २३९ पदे समांतर आरक्षणातील आहेत व त्यामधील उमेदवार मिळू शकले नाहीत. त्यासाठी आता आम्ही जाहिरात देणार आहोत. तसेच टक्केवारीनुसार ही आकडेवारी बरोबर आहे. आदिवासी विकास आयुक्तालयातील एकूण मंजूर पदानुसार आरक्षण निश्चित केले जाते. त्याचप्रमाणे जाहिरात देण्यापूर्वी मागासवर्ग कक्षाकडून आरक्षण तपासले जाते व त्यांच्याकडून प्रमाणित केल्यानंतरच जाहिरात देण्यात येते. यासंदर्भात आदिवासी विकास आयुक्तालयांतर्गत एकूण किती पदे मंजूर आहेत, त्यातील अनुसूचित जातीसाठी किती पदे राखीव आहेत, राखीव पदांपैकी किती पदे भरलेली आहेत व किती रिक्त आहेत या बाबतची सविस्तर माहिती समितीला सादर करावी असे आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय यांना सांगितले. समितीने सर्वोच्च न्यायालयाकडून दोन आठवड्यांपूर्वी रोस्टरच्या बाबतीत मार्गदर्शक तत्त्वे जारी करण्यात आलेली आहेत. पाच वर्षे सातत्याने जाहिरात देऊनही उमेदवार मिळत नसेल तर ते पद अनुशेषात दाखवावे या बाबतचा तो विषय आहे, असे मत मांडले असता, परंतु या ठिकाणी ज्या पदांची वारंवार जाहिरात देऊनही उमेदवार मिळाला नाही अशी पदे भरण्यात आलेली आहेत. त्यामुळेच भरलेली पदे १३ टक्क्यांच्या वर असल्याचे दिसून येत असल्याची माहिती आयुक्तांनी समितीला दिली.

शिक्षकांच्या अनुशेषा बाबतीत सद्यःस्थिती काय आहे, अशी समितीने विचारणा केली असता आयुक्तांनी प्राथमिक शिक्षक-७४६, माध्यमिक शिक्षक-१३७ आणि उच्च माध्यमिक शिक्षक-२३८ अशा प्रकारे एकूण ११२१ पदे भरण्यात येणार आहेत. त्यामध्ये अनुसूचित जाती प्रवर्गाची आरक्षणानुसार १६७ पदे भरावयाची आहेत, ६०२ पदांची जाहिरात दिली होती. त्या अंतर्गत शिक्षकांची ३८ पदे भरलेली आहेत, असे सांगितले. त्यावर समितीने आक्षेप घेतला या ठिकाणी आयुक्तांचे म्हणणे संशयास्पद वाटते. या समितीचा उद्देश

एवढाच आहे की, अनुसूचित जाती प्रवर्गातील उमेदवारांना योग्य तो न्याय मिळाला पाहिजे. आयुक्तांनी अभ्यास केलेला दिसत नाही. अगोदर एक उत्तर देत आहात आणि नंतर एक उत्तर देत आहात. आपल्या उत्तरांमध्ये विसंगती आहे. या ठिकाणी प्रत्येक प्रश्नाला उत्तर देताना केवळ वेळ मारुन नेली जात असल्याचे निदर्शनास येत आहे, ही बाब फारच गंभीर स्वरूपाची आहे. समितीला अपेक्षित माहिती देता आलेली नाही, यामुळे समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली.

आदिवासींना न्याय देण्याची जबाबदारी आयुक्त म्हणून आपली असताना सुध्दा आपण ती बाब गांभीर्याने घेत नाही. रिक्त पदांची माहिती मंत्रालय स्तरावर कोण संकलित करतो, त्यांनी विभागातील भरती प्रक्रियेचा आढावा घेतला आहे काय, समितीसमोर विभागाचे सचिव साक्षीसाठी येतात. त्यामुळे आस्थापना शाखेच्या उप सचिवांनी भरती प्रक्रियेची सविस्तर व वस्तुस्थितीदर्शक माहिती घेऊन ती विभागाच्या सचिवांना द्यावयास पाहिजे. आदिवासी विकास विभागात मोठ्या प्रमाणावर घोळ आहे. या सर्व बाबींकडे दुर्लक्ष केल्यामुळे आदिवासी विकास आयुक्त हेच कारवाईस पात्र आहेत. अनुसूचित जाती आणि आदिवासी प्रवर्गातील व्यक्तींना शिक्षण आणि रोजगारापासून वंचित ठेवण्याचे काम आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय आणि उप सचिव, आदिवासी विकास विभाग (आस्थापना) यांनी केले आहे, असे समितीचे स्पष्ट मत आहे. समितीला माहिती अवगत करून न देणे किंवा माहिती दडवून ठेवणे ही बाब अतिशय गंभीर असून या प्रकरणी ते शिक्षेस पात्र ठरतात. अशा प्रकारे दिरंगाई व दुर्लक्षितपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांवर प्रशासकीय कारवाई करण्याचे निर्देश समितीने दिले. त्यावर विभागीय प्रतिनिधी यांनी रिक्त पदे भरण्यासाठी नियोजित वेळेचा कार्यक्रम आखून, या भरती प्रक्रियेच्या संदर्भात एक महिन्याच्या आत या बाबतची कार्यवाही पूर्ण करतो, असे समितीला आश्वासित केले.

आदिवासी विकास आयुक्तालयाला जानेवारी-२०११ मध्ये भेट दिली होती. समितीला आश्वासन देऊन सुध्दा गेल्या अडीच वर्षात त्या अनुषंगाने कार्यवाही केलेली नाही. भरती प्रक्रिया पूर्ण करण्यास अडीच वर्षांचा कालावधी लागतो काय, ज्या फाईलमध्ये हित असते त्या लवकर पूर्ण केल्या जातात आणि आदिवासी किंवा मागासवर्गीयांच्या कल्याणाच्या फाईल्स वर्षानुवर्षे तशाच प्रलंबित ठेवल्या जातात, असे परखड मत समितीने व्यक्त केले.

विभागीय प्रतिनिधी यांनी समितीच्या मताशी सहमती दर्शवून "क" संवर्गात एकूण १० हजार ३५ पदे मंजूर आहेत. यामध्ये अनुसूचित जातीसाठी १२८६ पदे राखीव आहेत. यापैकी ९१३ पदे भरलेली आहेत. तर अनुसूचित जातीची न भरण्यात आलेली पदे ३७३ इतकी आहेत. याठिकाणी प्राथमिक शिक्षकांची संख्या १३२, माध्यमिक शिक्षकांची संख्या १३२ तर उच्च माध्यमिक शिक्षकांची संख्या १५ अशी आहे. काही ना काही कारणास्तव पदे सतत रिक्त राहत असतात, अशी समितीला माहिती दिली. त्यावर समितीने ही पदे केव्हापासून रिक्त आहेत ? अशी पृच्छा केली असता, आयुक्तांनी सन २००९-२०१० पासून ८७५ पदांची भरती प्रक्रिया सुरू होती. तसेच आता ६०२ पदांची भरती प्रक्रिया सुरू होणार असून लवकरच जाहिरात दिली जाणार असल्याचे सांगितले. "क" संवर्गातील शिक्षकांची ३७३ पदे रिक्त आहेत. ही पदे किती

वर्षापासून, किती महिन्यापासून किंवा किती दिवसांपासून रिक्त आहेत ? यासंबंधी समितीने स्पष्टीकरण करण्यास सांगितले असता विभागीय प्रतिनिधी यांनी मध्यंतरीच्या काळात पदे भरण्यासंदर्भातील स्थगिती होती. सदर स्थगिती असली तरी देखील एससीची पदे मुक्त केली असल्याचा खुलासा केला.

अभिप्राय व शिफारशी:-

आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक येथे दिनांक १७ जानेवारी, २०११ रोजी भेट देऊन तेथील संबंधित अधिकाऱ्यांशी समितीने चर्चा केली होती. सदर चर्चेच्यावेळी उपस्थित झालेले मुद्दे व समितीला आश्वासित केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने झालेली कार्यवाही जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक २४ जानेवारी, २०१३ रोजी विभागीय प्रतिनिधीची साक्ष आयोजित केली होती. आदिवासी विकास विभागाचे प्रतिनिधी म्हणून आदिवासी विकास विभागाचे उप सचिव व आदिवासी विकास आयुक्तालयाचे आयुक्त साक्षीस हजर होते. साक्षीच्या वेळी समितीला त्यांना समाधानकारक उत्तरे देता न आल्याने नाईलाजास्तव समितीने साक्ष पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला.

(त्यानुसार समितीची साक्ष बैठक पुढे ढकलण्यात आली आहे./होती)

विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी उपस्थित राहणाऱ्या अधिकारी वर्गाने प्रकरणाची पुर्ण तयारी व अभ्यास करून येणे आवश्यक होते. समितीने विचारलेल्या प्रश्नाला अभ्यासपूर्वक व समाधान कारक उत्तरे देणे अपेक्षित होते. विधानमंडळ समित्या ह्या विधानमंडळ सभागृहाच्या कामकाजाचाच एक भाग असून समितीच्या कामकाजाबाबत आयुक्त दर्जाचे वरिष्ठ अधिकारी गंभीर नसल्याचे समितीला दिसून आले, ही फारच गंभीर बाब आहे. यासंदर्भात समिती तीव्र नाराजी व्यक्त करीत आहे.

अनुसूचित जाती कल्याण समितीच्या दिनांक २४ जानेवारी २०१३ रोजी साक्षीच्या वेळी समितीला देण्यात आलेली उत्तरे अपूर्ण व असमाधानकारक असल्याने पुढे ढकलण्यात आलेली संबंधित विभागीय सचिवाची साक्ष पुन्हा दिनांक २२ मे २०१३ रोजी घेण्यात आली. त्यावेळी समितीला दिलेल्या माहितीत रिक्त पदांचा अनुशेष भरला नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले. समितीने नाशिक येथील आदिवासी विकास आयुक्त कार्यालयास भेट देऊन अडीच वर्षांहून अधिक कालावधी होऊनही त्यावेळी रिक्त पदाचा अनुशेष भरण्याबाबत निर्देश देऊनही अद्याप अनुसूचित जातीकरिता राखीव असलेल्या रिक्त पदांचा अनुशेष भरून काढण्यात आलेला नसल्याची बाब समितीच्या निदर्शनास आली असून, ही फारच दुर्देवी गोष्ट असल्याची खंत समिती व्यक्त करीत आहे. यावरुन आदिवासी विकास आयुक्तालयाचे अधिकारी जाणूनबुजून या बाबीकडे दुर्लक्ष करीत असल्याचे समितीला नमूद करावेसे वाटते. तसेच या संदर्भात आदिवासी विकास विभागाचे आयुक्त यांना समितीला योग्य व परिपूर्ण माहिती देता आलेली नाही. एकाच प्रश्नाला उत्तर देताना प्रत्येक वेळी विसंगत उत्तरे देऊन समितीची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला आहे. समितीला परिपूर्ण माहिती अवगत करून न देणे किंवा माहिती दडवून ठेवणे ही अतिशय गंभीर बाब आहे, याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.

आदिवासी विकास विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी मंत्रालयीन स्तरावर व नाशिक येथील आदिवासी विकास आयुक्तालय यांनी राखीव असलेल्या रिक्त पदांचा सविस्तर व वस्तुस्थितीदर्शक आढावा घेऊन साक्षीच्या बैठकीस येण्यापूर्वी सदर माहिती विभागाच्या सचिवांना द्यावयास पाहिजे होती व ती संपूर्णतः

जबाबदारी त्यांची होती, असे असतानासुद्धा त्यांनी या सर्व बाबीकडे दुर्लक्ष केले आहे. परिणामी समितीला माहिती न देणे किंवा माहिती दडवून ठेवण्याचा प्रयत्न करणारे अधिकारी हे कारवाईस पात्र ठरतात. अशाप्रकारे दिरंगाई व दुर्लक्ष करणाऱ्या, जबाबदारीची जाण नसलेल्या संबंधित अधिकाऱ्यांवर प्रशासकीय कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला तीन माहिन्यांत सादर करण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.

नाशिक येथील आदिवासी आयुक्तालयातंर्गत असलेल्या विभागातील वर्ग `क' आणि वर्ग `ड' चा अनुशेष पाहता नाशिक विभागात ४३६ पदे, ठाणे विभागात ४३ पदे, अमरावती १५८ पदे आणि नागपूर विभागात ८८ पदे अशा एकूण ७२५ पदांचा अनुशेष असून या संदर्भात समितीला माहिती देताना `क' वर्गामध्ये एटीसी निहाय व `ड' वर्गामध्ये प्रकल्पनिहाय माहिती देण्याची गरज असताना समितीला चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली. शिक्षक पदांच्या अनुशेषाबाबत दिलेली माहिती स्पष्ट नसून संशयास्पद असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. समितीला माहिती देताना आयुक्तांनी अभ्यासपूर्वक उत्तर देणे अपेक्षित होते. तथापि, आयुक्तांनी विसंगत उत्तरे दिल्याने समिती तीव्र नाराजी व्यक्त करीत आहे.

समितीला राखीव पदांच्या अनुशेषाबाबत तसेच शिक्षक पदांच्या भरती संदर्भात परिपूर्ण माहिती देण्यात आली नाही, याबाबत शासनाने लक्ष घालून नाशिक येथील आदिवासी विकास आयुक्तालयाअंतर्गत येणाऱ्या कार्यालयातील भरती, बढती, अनुशेष व आरक्षणाच्या बाबतीत आढावा घेण्यात यावा व वर्ग `अ' ते `ड' मधील पदांचा अनुसूचित जातीकरिता राखीव असलेला अनुशेष तातडीने भरण्यात यावा. या संदर्भातील केलेल्या कार्यवाहीची परिपूर्ण माहिती समितीला तीन महिन्यांच्या आत सादर करावी, अशी समिती शिफारस करीत आहे.

(४) जिल्हा परिषद, नाशिक

(अ) जात वैधता प्रमाणपत्र

समितीने जिल्हा परिषदेअंतर्गत असलेल्या विविध विभागांतील मागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांची जात पडताळणी करण्यात आली आहे किंवा नाही याबाबत माहिती जाणून घेण्यासाठी जिल्हा परिषद नाशिक येथे दिनांक १८ मार्च २०११ रोजी भेट देऊन तेथील संबंधित अधिकाऱ्याची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी जात पडताळणी समितीकडे जात प्रमाणपत्र पडताळणीची एकूण किती व केव्हापासून प्रलंबित असलेल्या प्रकरणांची माहिती विचारली असता उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.) परिचर या संवर्गातील ४४ प्रकरणे आहेत. वरिष्ठ सहायक लिपिकाची ३ प्रकरणे जात पडताळणी समितीकडे प्रलंबित असून त्याबाबत पत्रव्यवहार देखील केला आहे. अद्याप त्यांच्याकडून उत्तर अप्राप्त आहे. सदरची प्रकरणे सन २००८, २००९ व २०१० मधील प्रलंबित प्रकरणे असल्याचे सांगितले. या संदर्भात अधिक माहिती देताना विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी असे स्पष्ट केले की, २४५ प्रकरणे निकाली काढण्यात आली. व १५ प्रकरणांमध्ये त्रुटी असल्याने प्रलंबित आहेत. त्यावर समितीने आक्षेप घेऊन समितीला कालच्या बैठकीत सेवा भरतीसंबंधीची जात प्रमाणपत्र पडताळणीची सर्व प्रकरणे निकाली काढली असल्याचे सांगितले होते. आज समितीला उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.) आणि विशेष जिल्हा

समाजकल्याण अधिकारी यांनी दिलेल्या माहितीत विसंगती असल्याची कारणे विचारली असता त्यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.) यांनी जात पडताळणीकरिता यादी पाठविली असून त्या यादीप्रमाणे अजून वैधता प्रमाणपत्रे प्राप्त झालेली नाहीत. तरीही पुन्हा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकाऱ्यांकडून माहिती घेऊन जिल्हा परिषद कार्यालयातील कर्मचाऱ्याला तेथे पाठवून किती प्रकरणे प्रलंबित आहेत याची माहिती घेण्यात येईल. असे समितीस आश्वासित केले.

विभागीय सचिवांची साक्ष

नाशिक येथील जिल्हा परिषदेंतर्गत असलेल्या विभागातील मागासवर्गीय अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या जात पडताळणी संदर्भात समितीने जिल्हा परिषद, नाशिक येथे दिनांक १८ जानेवारी २०११ रोजी भेट देऊन तेथील संबंधित अधिकाऱ्यांची साक्ष घेतली होती. त्यावेळी उपस्थित झालेले मुद्दे व आश्वासित मुद्यांसंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक २४ जानेवारी २०१३ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाकडील परिचर संवर्गातील ४४ पैकी २२ कर्मचाऱ्यांची जात वैधता प्रमाणपत्रे प्राप्त करून घेण्यात आली असून त्यामध्ये अनुसूचित जातीच्या कर्मचाऱ्यांची संख्या किती आहे तसेच उर्वरित २२ परिचर कर्मचाऱ्यांची जात वैधता प्रमाणपत्रासाठी केव्हा पाठपुरावा करण्यात आला आहे, याबाबत विचारले असता, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ४४ कर्मचाऱ्यांपैकी २२ कर्मचाऱ्यांची जात वैधता प्रमाणपत्रे मिळालेली आहेत. उर्वरित २२ कर्मचाऱ्यांपैकी अनुसूचित जातीचे ८ कर्मचारी आहेत, त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे संपर्क साधला होता. त्यांच्या कार्यालयाचे असे म्हणणे आहे की, त्यांचे कार्यालय दोन वेळा स्थलांतरीत करावे लागले आहे. त्यामुळे रेकॉर्ड अस्ताव्यस्त झाले आहे. या संदर्भात विभागीय प्रतिनिधी यांनी अधिक माहिती देताना असे स्पष्ट केले की, विभागीय जात पडताळणी कार्यालय स्थलांतरीत झाल्यामुळे रेकॉर्ड अस्ताव्यस्त झालेला असला तरी जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी पाठपुरावा करावा असे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना सांगितले. त्यावर समितीने अशी सूचना केली की, अनुसूचित जाती कल्याण समिती ८ उमेदवारांच्या जात वैधता प्रमाणपत्रासाठी आग्रही आहे असे लेखी कळवून त्यांच्याकडून प्रमाणपत्राची पडताळणी करून घ्यावी. त्यावर याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीच्या सूचनेची नोंद घेऊन जात प्रमाणपत्र पडताळणी समितीला पत्र पाठविण्यात येईल, असे समितीला आश्वासित केले.

अभिप्राय व शिफारशी

नाशिक येथील जिल्हा परिषदेतंर्गत असलेल्या विविध विभागातील मागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांची जात प्रमाणपत्र पडताळणीकरिता विभागीय समाजकल्याण कार्यालयात किती प्रकरणे प्रलंबित आहेत. असे समितीने विचारलेला माहिती संदर्भात उत्तर देताना समितीला जात पडताळणीची सर्व प्रकरणे निकाली काढली असल्याचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.) यांनी माहिती दिली होती. तथापि या संदर्भात दुसऱ्या दिवशी बैठकीच्या वेळी विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी २४५ प्रकरणे निकाली

काढण्यात आली व १५ प्रकरणांत त्रुटी असल्याचे सांगितले त्यामुळे या उत्तरावर समितीने आक्षेप घेतला असून उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.) आणि विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी समितीला दिलेल्या माहितीमध्ये विसंगती आढळून आली. जात पडताळणी प्रकरणांची गांभीर्याने दखल न घेता समितीला अशाप्रकारे विसंगत उत्तरे दिल्याने याबाबत समिती नाराजी व्यक्त करीत आहे. तरी या प्रकरणी अधिकारी वर्गाने लक्ष घालून जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्याची एकूण किती प्रकरणे प्रलंबित आहेत त्यांची माहिती घेऊन ती तातडीने निकाली काढण्यासाठी त्याबाबत संबंधितांकडे पाठपुरावा करावा.

नाशिक येथील विभागीय जात पडताळणी समितीचे कार्यालय दोन वेळा स्थलांतरीत करावे लागले आहे. विभागीय जात पडताळणी कार्यालय स्थलांतरीत झाल्यामुळे रेकॉर्ड अस्ताव्यस्त झाल्याने जात प्रमाणपत्र याची पडताळणी प्रलंबित असणे हे कारण योग्य नाही. जात पडताळणी कार्यालयाने ही बाब गांभीर्याने लक्षात घेऊन या प्रकरणी कार्यवाही करावी. जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागातील परिचर संवर्गातील मागासवर्गीय ४४ कर्मचाऱ्यांपैकी २२ कर्मचाऱ्यांची जातवैधता प्रमाणपत्रे मिळालेली आहेत. उर्वरित २२ कर्मचाऱ्यांपैकी अनुसूचित जातीचे ८ कर्मचारी आहेत, ८ उमेदवारांच्या जात वैधता प्रमाणपत्रासाठी अनुसूचित जाती कल्याण समिती आग्रही आहे, असे जात पडताळणी कार्यालयास लेखी कळवून त्यांच्याकडून प्रमाणपत्राची पडताळणी करून घ्यावी. यासंबंधी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यांत सादर करण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.

(ब) जिल्हा परिषद, नाशिक यांच्या अंतर्गत असलेल्या प्राथमिक/माध्यमिक शाळा व वसतिगृहे

जिल्हा परिषद, नाशिक अंतर्गत असलेल्या प्राथमिक/माध्यमिक शाळा व वसतिगृहे यांमध्ये अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांकरिता पुरविण्यात आलेल्या सोयीसुविधा संदर्भात माहिती जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक १८ जानेवारी २०११ रोजी जिल्हा परिषदेस भेट देऊन तेथील संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली. समितीने नाशिक जिल्ह्यामध्ये किती शाळा आहेत व विद्यार्थी संख्या किती आहे, अशी विचारणा केली असता, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी जिल्ह्यामध्ये ३३५२ शाळा आहेत. इयत्ता १ ली ते ७ वी च्या विद्यार्थ्यांची संख्या ३,१२,७७२ आहे. शाळांची वारंवार तपासणी केली जाते. ज्या काही त्रुटी आढळतात त्यांची पूर्तता करण्याच्या सूचना दिल्या जात असल्याचा खुलासा केला.

या संदर्भात समितीलाच्या निदर्शनास आल्यानुसार चांदवड तालुक्यात इयत्ता १ ली ते ४ थी वर्गाची विद्यार्थ्यांची पटसंख्या मोठी आहे. तेथे एकच शिक्षक असून ते वांरवार प्रशिक्षणासाठी जात असल्याने सरपंचानी शिक्षकाची वारंवार मागणी करून देखील शिक्षक देण्यात आलेला नाही. अशी शाळेची अवस्था असेल तर विद्यार्थ्यांना कशाप्रकारचे शिक्षण मिळत असेल याची कल्पना न केलेली बरी, असे समितीने मत व्यक्त केले त्यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी त्या शाळेतील शिक्षकांना गट शिक्षण अधिकाऱ्यांनी ट्रेनिंगला पाठवावयास नको होते. पंचायत समितीच्या गट विकास अधिकाऱ्यांनी शिक्षकांच्या बदल्या केल्या. त्याबाबतीत कारवाई झालेली आहे, अशी समितीला ग्वाही दिली.

समितीने नाशिक जिल्हा परिषदेमार्फत मागासवर्गीय मुला/मुलींसाठी किती वसतिगृहे चालविण्यात येत आहेत, या वसतिगृहांची नियमित तपासणी केली जाते काय, वसतिगृहातील मुला/मुलींच्या काय तक्रारी आहेत, वसतिगृहातील मुलांना देण्यात येणाऱ्या आहाराचा नित्कृष्ट दर्जा असून त्यामध्ये अळ्या, साप सापडल्याचा घटना निदर्शनास आल्या आहेत, तसेच अनेक वसतिगृहांमध्ये मुलींसाठी प्रसाधनगृहाची पाण्याची सोय नसल्याचे आढळून आले आहे. त्याबाबत वसतिगृहास पुरविण्यात येणाऱ्या सोयीसुविधा संबंधीची माहिती समितीला देण्यात यावी, त्यावर समाजकल्याण अधिकारी यांनी नाशिक जिल्ह्यामध्ये मुलांची ९० आणि मुलींची ३७ अशी एकूण १२७ वसतिगृहे आहेत. वसतिगृहातील मुलांची संख्या ६३९६ आणि मुलींची संख्या ४७२२ आहे. वसतिगृहातील मुलांना १० महिन्यांसाठी ६३०० परिपोषण भत्ता दिला जातो. आजपर्यंत एकही तक्रार प्राप्त झालेली नाही. समाजकल्याण निरीक्षक वसतिगृहांना भेटी देऊन तपासणी करीत असतात. काही वसतिगृहांमध्ये शौचालयांची संख्या पाहिजे त्या प्रमाणात दिसून न आल्याने तेथे शौचालयांची संख्या वाढविण्याच्या सूचना दिल्या आहेत. ज्या वसतिगृहांमध्ये शौचालय व बाथरुम नाही त्यांच्या मान्यता रद्द करण्यात आल्या आहेत.

तसेच वसतिगृहातील विद्यार्थ्यांना उपस्थितीनुसार परिपोषण भत्ता दिला जातो. वर्षातील उपस्थितीची सरासरी काढून परिपोषण भत्ता दिला जातो. अशी माहिती समितीला दिली.

विभागीय सचिवांची साक्ष

समितीने नाशिक येथील जिल्हा परिषदेअंतर्गत असलेल्या प्राथमिक/माध्यमिक शाळा व वसतिगृहे यामध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या सोयीसुविधा संदर्भात समितीने दिनांक १८ जानेवारी, २०११ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी समितीला आश्वासित केलेल्या मुद्यांसंदर्भात माहिती जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक २४ जानेवारी २०१३ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली.

साक्षीच्या वेळी समितीने जिल्हा परिषदेंतर्गत असलेल्या वसतिगृहात शौचालये व स्नानगृहे पुरेशा प्रमाणात आढळून आली नाहीत अशा १६ वसतिगृहांवर शासन निर्णय १६ मार्च १९९८ अन्वये नियमानुसार दंडात्मक कार्यवाही करण्यात आली आहे काय, असल्यास ती वसतिगृहे कोणती आहेत, अशी विचारणा केली असता, सहायक आयुक्त (मावक) यांनी नाशिक जिल्ह्यातील खाली नमूद केलेल्या एकूण १६ वसतिगृहांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली असल्याची माहिती पुढीलप्रमाणे दिली :—

अ.क्र.	वसतिगृहाचे नाव	दंडात्मक रक्कम
		(रुपये)
१.	विद्यार्थी वसतिगृह, चिंचवड	४०००.००
२.	विद्यार्थी वसतिगृह, हरसूल	४०००.००
३.	विद्यार्थी वसतिगृह, मांजरे	५०००.००
४.	कन्या छात्रालय, त्र्यंबकेश्वर	३०००.००
५.	विद्यार्थी वसतिगृह, त्र्यंबकेश्वर	३०००.००
६.	आदि जनता विद्यार्थी वसतिगृह, जाजूवाडी, पंचवटी	८०००.००

अ.क्र.	वसतिगृहाचे नाव	दंडात्मक रक्कम
		(रुपये)
७.	कन्या छात्रालय, पांडाणे	१०००.००
८.	विद्यार्थी वसतिगृह, नांदूर, शिंगोटे	५०००.००
९.	सिद्धार्थ विद्यार्थी आश्रम, चांदवड	५०००.००
१०.	विद्यार्थी वसतिगृह, चाचडगाव	४०००.००
११.	विद्यार्थी आश्रम, पिंपळपाडा	४०००.००
१२.	विद्यार्थी वसतिगृह, सप्तश्रृंगीगड	५०००.००
१३.	विद्यार्थी वसतिगृह, मोहपाडा	३०००.००
१४.	लोकनेते व्यंकटराव हिरे विद्यार्थी वसतिगृह, कळवाडी	४०००.००
१५.	आदिवासी विद्यार्थी वसतिगृह, कळवाडी	५०००.००
१६.	विद्यार्थी वसतिगृह, कोकरतळे	५०००.००
	एकूण ...	६८०००.००

अभिप्राय व शिफारशी

समितीच्या मते शिक्षणाच्या प्रगतीसाठी सर्वशिक्षा अभियान, समाजकल्याण विभागाच्या विविध योजना, गणवेष वाटप, लेखनसाहित्य इत्यादीसाठी शिक्षण विभाग, समाजकल्याण विभाग, महिला व बाल कल्याण विभाग, आदिवासी विकास विभागांकडून जिल्हा परिषदेला अनुदाने दिली जातात. परंतु या योजनांची अंमलबजावणी परिणामकारकरित्या न झाल्यामुळे शिक्षणाची दयनीय अवस्था झाली असून जिल्हा परिषदेच्या शाळांमधील शिक्षणाचा दर्जा खालावला आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील मुले शिक्षणासाठी शहरी भागात येतात. याबाबत गांभीर्याने लक्ष घालणे आवश्यक आहे. असे समिती मत व्यक्त करीत आहे.

नाशिक येथील जिल्हा परिषदअंतर्गत असलेल्या वसतिगृहातील मागासवर्गीय मुलां/मुलींना वसतिगृहांत देण्यात येणाऱ्या आहारामध्ये अळ्या सापडणे तसेच आहार नित्कृष्ट दर्जाचा असणे, पिण्याचे पाण्याची व्यवस्था नसणे, मुलींसाठी असलेली प्रसाधनगृहे पुरेशी नसणे तसेच प्रसाधनगृहात पाण्याची सोय नसणे, आंघोळीकरिता गरम पाणी नसणे, काही ठिकाणी दिवाबत्तीची सोय नसणे, तसेच वसतिगृहाला भेट देऊन संबंधित अधिकाऱ्यांनी चौकशी न करणे, अशा अनेक त्रुटी असल्याचे समितीला आढळून आल्याने याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करते.

उपरोक्त त्रुटी लक्षात घेऊन आहाराचा दर्जा सुधारणे, मुलींसाठी पुरेशी प्रसाधनगृहे उपलब्ध करणे, पिण्याच्या पाण्याची तसेच आंघोळीसाठी गरम पाण्याची व्यवस्था अशा इतर बाबी संबंधित अधिकाऱ्यांनी वसतिगृहास भेट देऊन तपासणी करून पुरविण्याची व्यवस्था करण्यात यावी तसेच वसतिगृहात मागासवर्गीय मुलां/मुलींकरिता शासन नियमानुसार देय असलेल्या सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात, अशी समिती शिफारस करीत आहे.

(क) जिल्हा परिषदेच्या प्राथमिक/माध्यमिक शाळेतील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना गणवेष व लेखन साहित्य

नाशिक येथील जिल्हा परिषद अंतर्गत असलेल्या प्राथमिक/माध्यमिक शाळेतील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या गणवेषात लेखनसाहित्य या संदर्भात माहिती जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक १८ जानेवारी २०११ रोजी जिल्हा परिषद, नाशिक येथे भेट देऊन तेथील संबंधित अधिकाऱ्यांबरोबर चर्चा केली.

सदर चर्चेच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, समाजकल्याण विभागाचा निधी खर्च केला जात नाही, निधी पडून असल्याचे समितीला निदर्शनास आले असून विद्यार्थ्यांना गणवेषाचे वाटप अद्याप का झालेले नाही, याबाबत सहायक आयुक्त (मावक) यांनी समितीला अशी माहिती दिली की, गणवेषासाठी मिळणारे अनुदान अल्प असते. गणवेषाचे अनुदान ग्राम शिक्षण समितीला देण्यात येते. सन २००९-२०१० मध्ये गणवेषाचे वाटप झालेले आहे. सन २०१०-२०११ मध्ये मिळालेले अनुदान ग्राम शिक्षण समितीला दिलेले आहे. त्यांनतर त्या संदर्भात अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी गणवेष आणि शिष्यवृत्तीसाठी रुपये १३.३५ लाख प्राप्त झाले. या रकमेचे वाटप झाले असल्याचे स्पष्ट केले तसेच शासनाने गणवेषाचा कमाल दर शर्ट व पँटसाठी रु.५७.२१ आणि ब्लाऊज व स्कर्टसाठी रु.६९.७५ असा ठरवून दिला होता. ही रक्कम पुरेशी नसल्यामुळे वाढवून द्यावी असा अधिकाऱ्यांनी प्रस्ताव दिलेला आहे. अल्पसंख्याक विभागाने १०० रुपये दर मंजूर केला आहे. त्या धर्तीवर शिक्षण विभागाला १०० रुपये दर मंजूर करावा असा आम्ही प्रस्ताव पाठविला आहे. जनरल बॉडीचा ठरावही झालेला आहे, असे समितीला विषद केले. त्यावर समितीने पुढे प्रत्येक विद्यार्थ्यामागे लेखन-साहित्यांवर किती रक्कम खर्ची पडते व आतापर्यंत किती विद्यार्थ्यांना लेखनसाहित्य वाटप केले आहे? अशी विचारणा केली असता, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी ८० टक्के रक्कम गणवेषासाठी खर्च केली जाते. लेखन साहित्य खरेदी करून लाभार्थी संख्येनुसार शाळांना वितरित केले असल्याचे सांगून पुढे असे स्पष्ट केले की, सन २००९-२०१० मध्ये ९४१० लाभार्थी होते. २० रुपयांप्रमाणे एकूण रुपये १.८० लाख खर्च करण्यात आले. मागील वर्षी खरेदी केली होती. यावर्षी अद्याप लेखन साहित्य खरेदी केलेले नाही. गणवेषाची खरेदी जिल्हा परिषद करीत नाही. गणवेषासाठी अनुदान शासनाकडून दिले जाते, अशी माहिती दिली. त्यावर समितीने असे स्पष्ट केले की, फक्त गणवेष दाखविले जातात. तुम्ही लेखन साहित्याचे वाटप केलेलेच नाही. कागदोपत्री खरेदी केल्याचे दाखविले जाते. साहित्याची खरेदी केली असेल तर समितीला लेखन साहित्य आणून दाखवावे.

माध्यमिक विभागाच्या ९४७ शाळा आहेत. दोन शिक्षणाधिकारी आहेत. परंतु ते शाळांना भेटी देत नाहीत. या शाळांमधील रोस्टरची तपासणी झालेली आहे की नाही हे समितीला जाणून घ्यायचे होते. शिष्यवृत्तीची रक्कम वाटप केली जात नाही. विद्यार्थ्यांपर्यंत लाभ पोहोचत नाही. गरीब कुटुंबातील मुलांना फायदा मिळत नाही. अधिकाऱ्यांची मुले इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिकतात.२-५ लाख रुपये डोनेशन देऊन प्रवेश घेतला जातो. गरीबांच्या मुलांवर मात्र अन्याय केला जात असल्याची खंत समितीने व्यक्त केली. एकूण लाभार्थ्यांमध्ये मुले व मुलींची संख्या किती होती, प्रत्येक विद्यार्थ्यांमागे गणवेषासाठी व लेखन

साहित्यासाठी किती रक्कम खर्ची पडली, लेखन साहित्य लाभार्थी विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचले का, या संदर्भातील संपूर्ण माहिती स्पष्ट होत नसेल तर समितीला विभागीय सचिवांची साक्ष घ्यावी लागेल, त्यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी एकूण तरतूद उपलब्ध असते त्यानुसार लेखन साहित्यावर प्रत्येक विद्यार्थ्यांमागे २० रुपये खर्च होतो. सन २००९-२०१० करिता गणवेषासाठी रुपये ७.४० लाख प्राप्त झाले. गणवेषासाठी शासनाने ठरवून दिलेला दर आहे तेवढी रक्कम वजा करून उर्वरित निधी प्रत्येक विद्यार्थ्यासाठी २० रुपये याप्रमाणे लेखन साहित्यासाठी अनुदान दिले जाते. ९४१० विद्यार्थ्यांसाठी २० रुपये दराने पाट्यांची खरेदी करण्यात आली व त्या पाट्या विद्यार्थ्यांना वाटप केलेल्या आहेत. तसेच ९१३५ विद्यार्थ्यांना गणवेष वाटप केले आहेत, अशी माहिती समितीला दिली.

विभागीय सचिवांची साक्ष

नाशिक जिल्हापरिषदेअंतर्गत असलेल्या प्राथमिक/माध्यमिक शाळेतील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या गणवेष व लेखनसाहित्य संदर्भात समितीने दिनांक १८ जानेवारी २०११ रोजी भेट देऊन तेथील संबंधित अधिकाऱ्यांची साक्ष घेतली होती. त्यावेळी उपस्थित झालेल्या मुद्यांसंदर्भात केलेली कार्यवाही जाणून घेण्यासाठी दिनांक २३ जानेवारी २०१३ रोजी संबंधित विभागीय सचिवांची साक्ष घेतली.

साक्षीच्या वेळी समितीने लेखन साहित्य खरेदी करण्यासंबंधी काय पद्धत आहे, यासंबंधी विचारले असता, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी महाराष्ट्र शासनाचे उद्योग संचालनालय, नवीन प्रशासन इमारत, मुंबई येथे आहे. उद्योग संचालनालयाने दर करार निश्चित केलेला असतो. त्या दर करारानुसार लेखन साहित्य खरेदी करावे लागते. ८० टक्के तरतूद ही विद्यार्थ्यांच्या गणवेषावर, तर २० टक्के तरतूद ही लेखन साहित्यावर खर्च करण्यात येते. ग्रामशिक्षण समिती विद्यार्थ्यांच्या आवश्यकतेनुसार योग्य ते व्यवस्थापन करीत असते असे समितीस स्पष्ट केले.

समितीने जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभाग अंतर्गत गणवेश व लेखन साहित्य मिळणेसाठी एकूण लाभार्थी विद्यार्थी संख्या २५१६७१ इतकी असून प्रत्यक्षात किती लाभार्थ्यांना त्याचा फायदा झालेला आहे. शिक्षण विभाग (प्राथमिक) जिल्हा परिषद यांच्या अंतर्गत २४५६ पात्र लाभार्थ्यांना गणवेषाचा लाभ मिळवून देण्यासंदर्भातील काय कार्यवाही करण्यात आली, तसेच शिक्षण विभाग जिल्हा परिषद यांच्या तर्फे १ ते ४ थीच्या विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या गणवेष वाटपासंदर्भात प्रत्येक विद्यार्थ्यांमागे असलेली रक्कम वाढविण्यासंदर्भात शासनाने कार्यवाही केली आहे काय, अशी विचारणा केली असता, त्यावर विभागीय प्रतिनिधी यांनी या संदर्भात व्यक्तिशः खात्री केल्यानंतरच खरीखुरी माहिती समितीला कळविण्यात येईल, असे समितीला आश्वासित केले. समितीने गणवेष निधी वाढवून देण्यासंदर्भातील प्रस्तावाची सद्यःस्थिती काय असल्याबाबत विचारणा केली असता, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी गणवेष निधी अद्यापही वाढवून दिलेला नाही. सर्व शिक्षा अभियानांतर्गत विद्यार्थिनींकरिता ६९.७५ रुपये प्रति गणवेष तरतूद करण्यात आलेली आहे. विद्यार्थ्यांच्या गणवेषाकरिता प्रति गणवेष ५७.२१ रुपये याप्रमाणे तरतूद करण्यात आलेली आहे.

ग्रामीण पातळीवर ग्राम शिक्षण समितीमध्ये गणवेषाकरिता असलेली तरतूद वाढविण्यासंबंधी निर्णय झाला होता. विद्यार्थ्यांना वितरित करण्यात येणाऱ्या गणवेषांचा दर्जा व सारखेपणा टिकविण्याकरिता

यापेक्षा अधिक काम करता येईल. या संदर्भातील शिफारशी समितीमध्ये मांडण्यात येत आहेत, असे समितीला सांगितले. त्यावर समितीने विशेषतः वीकर्स सेक्शनमध्ये येणाऱ्या शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेष व लेखन साहित्य वितरित करण्यासंदर्भात तातडीने निर्णय घेणे आवश्यक आहे. हा विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा व भवितव्याचा प्रश्न आहे. तसेच, वीकर्स सेक्शनमधील गरीब विद्यार्थ्यांना स्वच्छ व नवीन गणवेष घातल्यानंतर शिक्षण घेण्याकरिता जो उत्साह व आनंद मिळेल त्यातूनही सर्व शिक्षा अभियानाचा उद्देश साधणे शक्य होईल, अशी समितीची भावना आहे. या सर्व बाबीमध्ये आपल्याला जर काही अडचण असेल तर समितीच्या माध्यमातून शिफारस करू. विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या गणवेषाचा दर्जा पडताळणी विभागाच्या माध्यमातून होणे आवश्यक आहे. गणवेष वितरणासंदर्भात भेदभाव करता उपयोगी नाही. गणवेष दर्जा मानक संदर्भात शासनाने काही मार्गदर्शक सुचना दिलेल्या असतील त्याचे पालन होणे आवश्यक आहे. तसेच, गणवेषाच्या निविदा ग्लोबलाईज करणे आवश्यक असल्याचे मत समितीने व्यक्त केले.

अभिप्राय व शिफारशी

नाशिक जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागांतर्गत शाळांमधील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना गणवेष व लेखन साहित्य वेळेवर वाटप केले जात नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. लेखन साहित्याची कागदोपत्री खरेदी केल्याचे दाखविले जाते. तथापि, विद्यार्थ्यांना त्याचे विहित वेळेत वाटप होत नाही. लेखन साहित्य खरेदीमध्ये मोठ्या प्रमाणात निधी खर्च केला जातो. परंतु खरेदी केलेले लेखन साहित्य निकृष्ट दर्जाचे असते तसेच ते गरजुपर्यंत पोहचत देखील नाही, याबद्दल समिती तीव्र नाराजी व्यक्त करते.

यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व समाज कल्याण अधिकारी यांनी लेखन साहित्य खरेदी प्रकरणी लक्ष घालून विद्यार्थ्यांना दर्जेदार गणवेष व लेखन साहित्य विहित वेळेत पुरविण्याबाबत काळजी घ्यावी, अशी समिती शिफारस करीत आहे.

अनुसूचित जातीच्या मागासवर्गीय मुलांच्या गणवेषाचा प्रश्न अत्यंत गंभीर असल्याचे समितीच्या निदर्शनास आले असून मुलांसाठी शर्ट व पॅन्ट या गणवेषासाठी रुपये ५७.२१ व मुलींसाठी स्कर्ट, १ ब्लाऊज या गणवेषासाठी रुपये ६९.७५ हा दर अल्प असल्याने ही बाब विचारात घेता शासनाने गणवेषाच्या दरात शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.एसएसए २०११/प्र.क्र. ३८/ प्राशि ४, दिनांक ४ फेब्रुवारी २०११ नुसार प्रति विद्यार्थी दोन गणवेषाकरिता रु. ४०० इतकी रक्कम खर्च करण्यास मान्यता दिली आहे. परंतुसद्यःस्थितीत या दरामध्ये सुध्दा बाजारातील कपड्यांच्या व शिलाईच्या दराच्या किमती विचारात घेतल्या तर एवढ्या कमी किमतीमध्ये चांगल्या प्रतीचे कापड खरेदी करून शिलाई करणे कठीण आहे. याबाबत शासनाने सदरच्या गणवेषाकरिता रकमेत अधिक वाढ करून गणवेष चांगल्या प्रतिचे पुरविण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात यावी, अशी समिती शिफारस करीत आहे.

(भाग-दोन)
महाराष्ट्र राज्यात दिवसेंदिवस दलितांवर होत असलेल्या अत्याचारास प्रतिबंध घालण्याबाबत....

महाराष्ट्र राज्यात दिवसेंदिवस दलितांवरील अत्याचारात होत असलेली वाढ यासंदर्भात अनुसूचित जाती कल्याण समितीने दिनांक २१ मे २०१४ रोजीच्या बैठकीत दलितांवरील घडलेल्या अत्याचारांबाबतच्या खालील घटनांवर अनौपचारीक चर्चा केली.

१. अहमदनगर जिल्ह्यातील खर्डा (ता. जामखेड) या गावामध्ये नितीन आगे या दलित तरूणाची दिनांक २८ एप्रिल २०१४ रोजी केलेली हत्त्या.

२. नाणेगाव (ता. बदलापूर, जि. जालना) या गावांतील मातंग समाजातील दलित सरपंच श्री. मनोज कसाब या तरुणावर दिनांक ३ एप्रिल २०१४ रोजी करण्यात आलेला हल्ला व त्यातच त्याचा दिनांक ५ मे २०१४ रोजी झालेली मृत्यू.

३. देवपूर (ता. कन्नड, जि. औरंगाबाद) या पिशोर पोलीस हद्दीच्या गावातील उमेश आगळे या मातंग समाजातील तरुणाचा दिनांक २६ एप्रिल २०१४ रोजी तीक्ष्ण हत्याराने खून करून विहिरीत फेकून देणे.

४. चिखली (ता. हवेली, जि. पुणे) येथील माणिक उदागे या बौध्द तरुणाची दिनांक १ मे २०१४ रोजी दगडाने ठेचून हत्या करणे.

५. अडोली (ता. वाशिम) या विदर्भातील गावातील बौद्धांनी दिनांक १५ एप्रिल २०१४ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त काढलेल्या मिरवणुकीवर जातीयवाद्यांनी केलेली दगडफेक त्यात चार लहान मुलासह १८ जण जखमी होणे.

६. गोंदियामधील कवलेवाडा येथील बौद्ध समाजातील संजय खोब्रागडे यांना दिनांक १७ मे २०१४ रोजी जमिनीच्या वादावरून रॉकेल ओतून जिवंत जाळले.

समितीने उपरोक्त सर्व प्रकरणांची गंभीर दखल घेतली असून राज्यात दलित व मागासवर्गीय समाजावर जे अन्याय व अत्याचार होत आहेत त्याला तातडीने आळा घालण्याची आवश्यकता असल्याचे मत समितीने व्यक्त केले व यासंदर्भातील माहिती घेण्यात येऊन त्याबाबत समितीच्या शिफारशीचा अहवाल दोन्ही सभागृहास सादर करण्यात यावा, असा निर्णय घेण्यात आला.

राज्यात घडलेल्या दलित अत्याचाराच्या घटना व त्यांचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन समितीने त्याबाबत आपल्या तीव्र भावना व्यक्त करून राज्यातील घडलेल्या घटनासंदर्भात राज्यशासनास अहवालाच्या माध्यमातून तातडीने शिफारस करण्याचा निर्णय समितीच्या बैठकीत घेतला आहे. सदर विषयाचे सार्वजनिक महत्त्व व तातडी लक्षात घेऊन शासनाने त्यावर तातडीने कार्यवाही करावी, अशी शासनास शिफारस करण्याचा निर्णय समितीने घेतला आहे.

राज्यात दिवसेंदिवस दलितांवरील अत्याचारात होत असलेल्या होत असलेल्या वाढीसंदर्भात वर्तमानपत्रात रोजच नव्याने बातम्या छापून येणे त्यामुळे दलित व मागासवर्ग समाजात मोठ्या प्रमाणात निर्माण झालेला असंतोष. अशातच पोलिसांकरवी याबाबत अनुसूचित जाती/जमाती प्रतिबंधक (ॲट्रॉसिटी ॲक्ट) कायद्यान्वये

गुन्ह्यांची नोंद करण्यास टाळाटाळ करणे, गुन्हे करणारे व गुन्हेगारांना पाठीशी घालणाऱ्या जातीयवादी, वर्णद्वेषी व धनदांडग्यांना तसेच अशा गुन्ह्यांना समर्थन देणाऱ्या व्यक्तीविरूद्ध पोलिसांमार्फत कोणतीही कठोर कारवाई होत नसल्याची शंका नागरिकांच्या मनात निर्माण होते. हल्लेखोर, आरोपी व त्यांना समर्थन देणाऱ्याचे त्यामुळे मनोधैर्य वाढले आहे. कायद्याची कुठलीही पर्वा न करता अशा प्रकारचे गंभीर गुन्हे करण्याचे धाडस लोकांमध्ये वाढत चालल्यामुळे कायदा व सुव्यवस्थेची गंभीर परिस्थिती राज्यात निर्माण झाली असल्याची जनतेत भीती निर्माण होणे, अशा गुन्ह्यांना कायद्यान्वये वेळीच पायबंद घालणे आवश्यक आहे. आजमितीस सन २०१३ पर्यंत महाराष्ट्रात दलित अत्याचारावरील सरासरी ७०१९ खटले न्याय मिळण्यापासून प्रलंबित आहेत. त्यातील केवळ ७९३ खटले निकाली काढण्यात आले असून त्यात फक्त ६० खटल्यांत आरोपींना शिक्षा होणे. पोलिसांमार्फत अशा गुन्ह्यासंदर्भात आवश्यक ते पुरावे गोळा न करणे तसेच तपासातील त्रुटीमुळे वेळप्रसंगी गुन्ह्यांबाबत आरोप सिद्ध होऊ शकत नसल्याने न्यायालयीन प्रक्रियेत असे आरोपी संशयाचा फायदा मिळून बरेच निर्दोष सुटतात, असे स्पष्ट मत समितीने व्यक्त केले.

अभिप्राय व शिफारस

राज्यात दलितांवर होत असलेल्या अत्याचारांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असल्याने समितीने याची गांभीर्याने दखल घेऊन यासंदर्भात काही ठोस उपाय योजना तातडीने करण्याची आवश्यकता निर्माण झाल्याने समितीने दलितांवर होणाऱ्या अत्याचारांच्या प्रकरणावर विचार विनिमय केला असून राज्यात दलित व मागासवर्गीय समाजावर जे अन्याय, अत्याचार होत आहेत ते थांबविण्याची नितांत आवश्यकता आहे. राज्यात दलितांवर होणाऱ्या अत्याचारांच्या घटना वारंवार घडत असून यासंदर्भात ठोस कारवाई होत नाही. राज्यात अशा घटना घडण्याचे प्रमाण पहाता राज्यात कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती अतिशय गंभीर असल्याची भावना नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे. तसेच या गुन्ह्यांचा तपास तातडीने, गांभार्याने होत नसल्यामुळे याप्रकरणातील गुन्हेगार न्यायालयीन प्रक्रियेत पुराव्याअभावी निर्दोष सुटतात ही फारच खेदाची बाब आहे.

समितीने या सर्व प्रकरणाची गंभीर दखल घेतली असून या संदर्भात पुढील शिफारस करीत आहे. राज्यात उपरोक्तप्रमाणे घडलेल्या अनेक गंभीर घटना पाहता शासनाने या संदर्भात विशेष उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता आहे. विशेषतः या सर्व प्रकरणी गुन्ह्यांची नोंद करणे त्यावर योग्य तो तपास करणे, कुठल्याही त्रुटी या तपासात न ठेवणे तसेच आरोपींना जास्तीत जास्त शिक्षा मिळेल यासाठी प्रयत्न करणे तसेच ही सर्व प्रकरणे तातडीने निकाली काढणे.

राज्यात दिवसेंदिवस दलितांवर होत असलेल्या अन्याय व अत्याचारांच्या प्रकरणी न्यायालयाकडून उशिराने न्याय मिळाल्यास तो न्याय नाकारल्यासारखाच होईल. सदर बाब लक्षात घेता अशा प्रकरणी तातडीने न्याय मिळणेसाठी तपासणी अधिकारी मागासवर्गीय असावा. तसेच प्रलंबित खटले निकाली काढण्यासाठी विशेष न्यायालयाची स्थापना करून जलदगतीने निर्णय होण्यासाठी मागासवर्गीय प्रवर्गातील न्यायाधीश असावा. राज्यातील प्रत्येक दलित वस्तीमध्ये पोलीस चौकी असावी. तरच राज्यातील दलितांवरील होत असलेल्या अन्याय-अत्याचारांच्या घटनांमध्ये वाढ होणार नाही असे समितीचे अभिप्राय आहे.

याचवरोबर या सर्व घटनांमध्ये अत्याचार झालेल्या व्यक्तीचे तसेच त्यांच्या कुटुंबियांचे पुनर्वसन करणे, शासनाच्या अनेक योजनांमधून त्यांना घरे मिळवून देणे, त्यांना आर्थिक मदत करणे. या कुटुंबातील गरजुंना शासकीय नोकरीत सामावून घेणे. शासनाच्या अस्तित्वात असलेल्या अनेक योजनांचा त्यांना लाभ मिळवून देणे. कुटुंबियांचे संगोपन, मोफत शिक्षण, आर्थिक पाठबळ तसेच उदरनिर्वाहासाठी जमिनी उपलब्ध करून देण्याचीही नितांत आवश्यकता असून यासंदर्भात शासनाने तातडीने कारवाई करावी. शक्य असेल तेवढी जास्तीत जास्त मदत त्यांना करावी, तसेच आरोपींना कठोर शासनही व्हावे व भविष्यात असे गुन्हे करण्याचे धाडसही होणार नाही याचीही काळजी शासनाने घेण्याची नितांत आवश्यकता असल्याचे समितीचे मत असून त्याअनुषंगाने शासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात व केलेल्या कारवाईची माहिती समितीस तातडीने देण्यात यावी, अशी समिती शिफारस करीत आहे.

या विषयासंदर्भात असलेल्या दक्षता समित्यांच्या माध्यमातून तालुक्यांमध्ये तसेच जिल्ह्यांमध्ये सामंजस्य टिकवण्यासाठी, दोन समाजामध्ये प्रेमाची भावना निर्माण होण्यासाठी, दलित व सवर्णामध्ये जागरुकता निर्माण करण्यासाठी तसेच या समाजातील लोकांना नैतिक आधार देऊन सहानुभूती मिळण्यासाठी दर महिन्याला बैठका घेणे आवश्यक आहे. दलित व मागासवर्गीय व्यक्तींवर होत असलेल्या अत्याचारातून त्यांना मुक्त करून शासनाने ठोस अशी भूमिका घेऊन या समाजाला उपरोक्त प्रकरणी न्याय मिळेल यासाठी तातडीने योग्य ती पावले उचलली पाहिजेत. दलितांवर अत्याचार करणाऱ्यांवर अनुसूचित जाती/ जमाती प्रतिबंधक (ॲट्रॉसिटी ॲक्ट) कायद्यान्वये कारवाई करण्यात यावी, अशी समिती शिफारस करीत आहे.

(५) परिशिष्ट
समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त

पहिली बैठक

अनुसूचित जाती कल्याण समितीची बैठक दिनांक १७ जानेवारी २०११ रोजी नाशिक महानगरपालिका सभागृह, नाशिक येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते :–

उपस्थिती

(१) **श्री. चंद्रकांत हंडोरे, वि.स.स.** तथा **समिती प्रमुख**
(२) श्री. रावसाहेब अंतापूरकर, वि.स.स.
(३) श्री. हरिष पिंपळे, वि.स.स.
(४) श्री. लखन मलिक, वि.स.स.
(५) श्री. संतोष सांबरे, वि.स.स.
(६) श्री. ज्ञानराज चौगुले, वि.स.स.
(७) प्रा. वसंतराव खोटरे, वि.प.स.
(८) श्री. सुभाष चव्हाण, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

(१) श्री. डी. पी. येवला, अवर सचिव (समिती),
(२) श्री. रविंद्र जगदाळे, कक्ष अधिकारी.

नाशिक महानगरपालिका अधिकारी :–

(१) श्री. बी. डी. सानप, आयुक्त,
(२) डॉ. प्रविणकुमार देवरे, उप आयुक्त (प्रशासन),
(३) श्री. सतीश खडके, उप आयुक्त,
(४) श्री. बहिराव, उप आयुक्त (अतिक्रमण),
(५) श्री. शामराव जाधव, उप आयुक्त (कर निर्धारण),
(६) श्री. हरीभाऊ फडोळे, सहायक आयुक्त,
(७) डॉ. कोंडीराम पवार, आरोग्य अधिकारी.

सदरहू बैठकीत समितीने नाशिक महानगरपालिका यांच्या सेवेतील अनुसूचित जातीचे अधिकारी/कर्मचारी यांच्या भरती, बढती, अनुशेष व आरक्षण तसेच अनुसूचित जातीच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या योजना व विशेष घटक योजना याबाबत संबंधित अधिकाऱ्यांबरोबर चर्चा केली.

दुसरी बैठक

अनुसूचित जाती कल्याण समितीची बैठक दिनांक १७ जानेवारी २०११ रोजी विभागीय समाजकल्याण अधिकारी कार्यालयातील सभागृह, नाशिक येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते :–

उपस्थिती

(१) **श्री. चंद्रकांत हंडोरे, वि.स.स.** तथा **समिती प्रमुख**
(२) श्री. रावसाहेब अंतापूरकर, वि.स.स.
(३) श्री. हरिष पिंपळे, वि.स.स.
(४) श्री. लखन मलिक, वि.स.स.
(५) श्री. संतोष सांबरे, वि.स.स.
(६) श्री. ज्ञानराज चौगुले, वि.स.स.
(७) प्रा. वसंतराव खोटरे, वि.प.स.
(८) श्री. सुभाष चव्हाण, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

(१) श्री. डी. पी. येवला, अवर सचिव (समिती)
(२) श्री. रविंद्र जगदाळे, कक्ष अधिकारी.

विभागीय समाजकल्याण अधिकारी कार्यालय, नाशिक :–

(१) श्री. राजेंद्र कलाल, विभागीय समाजकल्याण अधिकारी,
(२) श्री. जितेंद्र वळवी, विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी,
(३) श्री. सुरेश पाडवी, जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जि.धुळे,
(४) श्रीमती वैशाली हिंगे, जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जि. धुळे,
(५) श्री.व्ही.ए.पाटील, विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जि. अहमदनगर,
(६) श्री. मोहन शेल्टे, विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी (जात पडताळणी समिती),
(७) श्री. एम. वाय. पटेल, विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी (जात पडताळणी समिती),
(८) श्री. झिरपे, सहा. संचालक, लेखा,
(९) श्री. धनंजय निकम, सहायक आयुक्त (मागासवर्ग कक्ष).

सदरहू बैठकीत समितीने विभागीय समाजकल्याण अधिकारी कार्यालय, नाशिक यांच्या सेवेतील अनुसूचित जातीचे अधिकारी/कर्मचारी यांच्या भरती, बढती, अनुशेष व आरक्षण तसेच अनुसूचित जातीच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या योजना व विशेष घटक योजना याबाबत संबंधित अधिकाऱ्याबरोबर चर्चा केली.

तिसरी बैठक

अनुसूचित जाती कल्याण समितीची बैठक दिनांक १७ जानेवारी, २०११ रोजी आदिवासी विकास आयुक्तालय कार्यालयातील सभागृह, नाशिक येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते :–

उपस्थिती

(१) **श्री. चंद्रकांत हंडोरे, वि. स. स.** तथा **समिती प्रमुख**
(२) श्री. रावसाहेब अंतापूरकर, वि. स. स.
(३) श्री. हरिष पिंपळे, वि. स. स.
(४) श्री. लखन मलिक, वि. स. स.
(५) श्री. संतोष सांबरे, वि. स. स.
(६) श्री. ज्ञानराज चौगुले, वि. स. स.
(७) प्रा. वसंतराव खोटरे, वि.प.स.
(८) श्री. सुभाष चव्हाण, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) श्री. डी. पी.येवला, अवर सचिव (समिती),
(२) श्री. रविंद्र जगदाळे, कक्ष अधिकारी.

आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक :–

(१) श्री. डी. एस. राजूरकर, आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक,
(२) श्री. व्ही. जे. वरवंटकर, अप्पर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती,
(३) श्री. एम. डी. राघोते, उपायुक्त, आ.आ, नाशिक,
(४)श्री. सुखदेव डेटे, उप आयुक्त, आ.वि (शिक्षण),
(५)श्री. गिरीश देशमुख, उप आयुक्त, (वित्त),
(६) श्री. एस. एच. पाटील, उप आयुक्त, आ.वि, ठाणे,
(७)श्री. आर.टी.पगार, सहायक प्रकल्प अधिकारी,
(८) श्री. धनंजय निकम, सहा आयुक्त, (मागास वर्ग कक्ष),

सदरहू बैठकीत समितीने आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक यांच्या सेवेतील अनुसूचित जातीचे अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच अनुसूचित जातीच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या योजना व विशेष घटक योजना याबाबत संबंधित अधिकाऱ्यांबरोबर चर्चा केली.

चौथी बैठक

अनुसूचित जाती कल्याण समितीची बैठक दिनांक १८ जानेवारी, २०११ रोजी जिल्हा परिषद सभागृह, नाशिक येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते :-

उपस्थिती

(१) **श्री. चंद्रकांत हंडोरे, वि. स. स.** तथा **समिती प्रमुख**
(२) श्री. रावसाहेब अंतापूरकर, वि. स. स.
(३) श्री. हरिष पिंपळे, वि. स. स.
(४) श्री. लखन मलिक, वि. स. स.
(५) श्री. संतोष सांबरे, वि. स. स.
(६) श्री. ज्ञानराज चौगुले, वि. स. स.
(७) प्रा. वसंतराव खोटरे, वि.प.स.
(८) श्री. सुभाष चव्हाण, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) श्री.डी. पी. येवला, अवर सचिव (समिती),
(२) श्री. रविंद्र जगदाळे, कक्ष अधिकारी.

जिल्हा परिषद, नाशिक :–

(१) श्री. भालचंद्र गंभीरराव वाघ, मुख्य कार्यकारी अधिकारी
(२) श्री. अनिल बाळाजी लांडगे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
(३) श्री. गोकूळ बंडोबा बेहळे, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकाय यंत्रणा
(४) श्री. वासुदेव पांडुरंग सोळंके, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र)
(५) श्री. अनंत मोतीराम महाजन, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.प्र)
(६) श्रीमती अनामिका अ. इंगोले, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण)
(७) डॉ. विजय नथ्थूजी डेकोटे, प्रमुख-जलस्वराज
(८) श्री. नरेंद्र दिगंबर महाजन, मुख्य लेखा व वित्त अधिकारी
(९) श्री. बबन कुंडलिक दहिफळे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
(१०) श्री. जगन्नाथ कौतिक देवरे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
(११) श्री. बापुराव पोपटराव साळुंके, कार्यकारी अभियंता (सा.बां.वि.क्र.१)

(१२) श्री. बाळकृष्ण कौतिकराव झोडगे, कार्यकारी अभियंता (सा.बां.वि.क्र.२)
(१३) श्री. योगेश बाळकृष्ण कुलकर्णी, कार्यकारी अभियंता (सा.बां.वि.क्र.३)
(१४) श्री. प्रकाश इंगोले, कार्यकारी अभियंता (प्रधानमंत्री ग्रामसडक योजना)
(१५) श्री. श्रीकांत दगुजी कातकाडे, कार्यकारी अभियंता (लपा-पूर्व)
(१६) श्री. रानबा लिंबाजी सोनाळे, कार्यकारी अभियंता (लपा-पश्चिम)
(१७) श्री. पुरुषोत्तम रामदास ठाकूर, कार्यकारी अभियंता (ग्रामीण पुरवठा)
(१८) श्री. अंकुश दामोदर मोरे, कृषी विकास अधिकारी
(१९) डॉ.नरेंद्र विनायक निकम, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी
(२०) डॉ. प्रदीप कणीकर राठोड, जिल्हा आरोग्य अधिकारी
(२१) श्रीमती प्राची अर्जून वाजे, समाजकल्याण अधिकारी
(२२) श्री. मोहन माधव भट, उप अभियंता (जीएसडीए-यांत्रिकी).

सदरहू बैठकीत समितीने नाशिक जिल्हा परिषद सभागृह, नाशिक यांच्या सेवेतील अनुसूचित जातीचे अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच अनुसूचित जातीच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या योजना व विशेष घटक योजना याबाबत संबंधित अधिकाऱ्यांबरोबर चर्चा केली.

पाचवी बैठक

अनुसूचित जाती कल्याण समितीची बैठक बुधवार, दिनांक २३ जानेवारी, २०१३ रोजी विधान भवन, (समिती कक्ष क्रमांक ७११) मुंबई येथे घेण्यात आली. सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते :–

उपस्थिती

(१) श्री. रमेश बागवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. योगेंद्र भोये, वि.स.स.
(३) श्री. विष्णू सावरा, वि.स.स.
(४) डॉ. सुजित मिणचेकर, वि.स.स.
(५) श्री. ज्ञानराज चौगुले, वि.स.स.
(६) श्री. सुभाष चव्हाण, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) श्री. भा. ना. कांबळे, अतिरिक्त सचिव,
(२) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव,
(३) श्री. सुभाष नलावडे, अवर सचिव.

विभागीय अधिकारी :—

सामान्य प्रशासन विभाग (मावक)

(१) श्री. पी. एस. मीना, अप्पर मुख्य सचिव.

नगरविकास विभाग

(२) श्री. श्रीकांत सिंह, प्रधान सचिव.

सामाजिक न्याय विभाग

(१) श्री. आर. डी. शिंदे, सचिव,
(२) श्री. उ. शी. लोणारे, उप सचिव .

महानगरपालिका, नाशिक

(१) श्री. संजय खंदारे, आयुक्त,
(२) श्री. कासार, उप आयुक्त,
(३) श्री. राजेंद्र कलाल, प्रादेशिक उप आयुक्त.

सदरहू बैठकीत समितीने नाशिक महानगरपालिका यांच्या सेवेतील अनुसूचित जातीचे अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच अनुसूचित जातीच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या योजना व विशेष घटक योजना या संदर्भात विभागीय सचिवांची साक्ष घेतली.

सहावी बैठक

अनुसूचित जाती कल्याण समितीची बैठक बुधवार, दिनांक २३ जानेवारी, २०१३ रोजी विधान भवन, (समिती कक्ष क्रमांक ७११) मुंबई येथे घेण्यात आली. सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते :–

उपस्थिती

(१) श्री. रमेश बागवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. योगेंद्र भोये, वि.स.स.
(३) श्री. विष्णू सावरा, वि.स.स.
(४) डॉ. सुजित मिणचेकर, वि.स.स.
(५) श्री. ज्ञानराज चौगुले, वि.स.स.
(६) श्री. सुभाष चव्हाण, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) श्री. भा. ना. कांबळे, अतिरिक्त सचिव,
(२) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव,
(३) श्री. सुभाष नलावडे, अवर सचिव.

विभागीय अधिकारी :—

सामाजिक न्याय विभाग :

(१) श्री. आर. डी. शिंदे, सचिव,
(२) श्री. उ. शि. लोणारे, उप सचिव, विभागीय समाजकल्याण कार्यालय, नाशिक विभाग,
(३) श्री. राजेंद्र कलाल, विभागीय समाजकल्याण अधिकारी,
(४) श्री. जितेंद्र वळवी, विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी,
(५) श्री. सुरेश पाडवी, जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जि. धुळे,
(६) श्रीमती वैशाली हिंगे, जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जि. धुळे,
(७) श्री. व्हि. ए. पाटील, विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जि. अहमदनगर,
(८) श्री. मोहन शेल्टे, विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी (जातपडताळणी समिती),
(९) श्री. एम. वाय. पटेल, विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी (जातपडताळणी समिती),
(१०) श्री. झिरपे, सहा. संचालक, लेखा,
(११) श्री. धनंजय निकम, सहायक आयुक्त (मागास वर्ग कक्ष).

सदरहू बैठकीत समितीने विभागीय समाजकल्याण अधिकारी कार्यालय, नाशिक यांच्या सेवेतील अनुसूचित जातीचे अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच अनुसूचित जातीच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या योजना व विशेष घटक योजना या संदर्भात विभागीय सचिवांची साक्ष घेतली.

सातवी बैठक

अनुसूचित जाती कल्याण समितीची बैठक गुरुवार, दिनांक २४ जानेवारी, २०१३ रोजी विधान भवन, (समिती कक्ष क्रमांक- ७११) मुंबई येथे घेण्यात आली. सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते :–

उपस्थिती

(१) श्री.रमेश बागवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. मिलिंद (अण्णा) कांबळे, वि.स.स,
(३) श्री. लखन सहदेव मलिक, वि.स.स,
(४) श्री. सुभाष चव्हाण, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) श्री. भा. ना. कांबळे, अतिरिक्त सचिव,
(२) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव.
(३) श्री. सुभाष नलावडे, अवर सचिव.

विभागीय अधिकारी :—

ग्रामविकास विभाग

(१) श्री. एस. एस. संधू, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग.

सामान्य प्रशासन विभाग

(१) श्री. दि. रा. डिंगळे, उप सचिव,

सामाजिक न्याय विभाग

(१) श्री. आर. डी. शिंदे, सचिव,
(२) श्री. उत्तम लोणारे, उप सचिव.

जिल्हा परिषद, नाशिक

(१) श्री. रणजीत कुमार, मुख्य कार्यकारी अधिकारी,
(२) श्री. वासुदेव सोळंके, उप मुख्य कार्यकारी अधिकारी,
(३) श्री. आर. एस. मोगल, शिक्षणाधिकारी (प्रा.),
(४) श्री. ज्ञा. रा. बोऱ्हाडे, कृषी विकास अधिकारी,
(५) श्रीमती प्राची वाजे, जिल्हा समाजकल्याण अधिकारी.

विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक

(१) श्री. अरुण अभंग, सहायक आयुक्त (मावक), आयुक्त कार्यालय, नाशिक

सदरहू बैठकीत समितीने नाशिक जिल्हा परिषद, नाशिक यांच्या सेवेतील अनुसूचित जातीचे अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच अनुसूचित जातीच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या योजना व विशेष घटक योजना या संदर्भात विभागीय सचिवांची साक्ष घेतली.

आठवी बैठक

अनुसूचित जाती कल्याण समितीची बैठक गुरुवार, दिनांक २२ मे, २०१३ रोजी विधान भवन, (समिती कक्ष क्रमांक- ७११) मुंबई येथे घेण्यात आली. सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते :–

उपस्थिती

(१) श्री. रमेश बागवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. मिलिंद (अण्णा) कांबळे, वि.स.स.

(३) श्री. लखन सहदेव मलिक, वि.स.स.

(४) श्री. ज्ञानराज चौगुले, वि.स.स.

(५) श्री. सुभाष चव्हाण, वि.प.स.

(६) श्री. नागो गाणार, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) श्री. भा.ना. कांबळे, अतिरिक्त सचिव,

(२) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव,

(३) श्री. सुभाष नलावडे, अवर सचिव.

विभागीय अधिकारी :–

आदिवासी विकास विभाग

(१) श्री. प्रवीण परदेशी, प्रधान सचिव (अति. कार्यभार).

आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक

(१) श्री. संभाजी सरकुंडे, आयुक्त,

(२) श्री. कैलास भंडलकर, उप सचिव,

(३) श्री. अ. दि. सुर्यवंशी, उप सचिव,

(४)श्री. चं. ज. देशपांडे, उप सचिव.

आयुक्त कार्यालय (मावक)

(१) श्री. अरुण अभंग, सहायक आयुक्त,

(२) श्री. एस. वाय. कापसे, उपायुक्त,

(३) अप्पर आयुक्त, आदिवासी विकास कार्यालय, नाशिक.

सदरहू बैठकीत समितीने आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक यांच्या सेवेतील अनुसूचित जातीचे अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच अनुसूचित जातीच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या योजना व विशेष घटक योजना या संदर्भात विभागीय सचिवांची साक्ष घेतली.

नववी बैठक

अनुसूचित जाती कल्याण समितीची बैठक बुधवार, दिनांक ११ जून, २०१४ रोजी विधान भवन, (समिती कक्ष क्रमांक- ७१२) मुंबई येथे घेण्यात आली. सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते :–

उपस्थिती

(१) श्री. आनंदराव गेडाम, वि.स.स. तथा कार्यकारी समिती प्रमुख

(२) श्री. संतोष सांबरे, वि.स.स.

(३) श्री. ज्ञानराज चौगुले, वि.स.स.

(४) ॲड. जयदेव गायकवाड, वि.प.स.

(५) श्री. नागो गाणार, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव,

(२) श्री. सुभाष नलावडे, अवर सचिव,

(३) श्री. श्रीकांत शेटे, कक्ष अधिकारी.

समितीने प्रारूप अहवालावर विचार करून काही किरकोळ दुरुस्त्यांसह तो संमत केला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई